R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, गुरुवार २१ ऑक्टोबर, २०२१ • वर्ष-९९, अंक-२२६, पाने-८, किंमत :₹ ५
• Issue - 226 Vol.- 99 Marathi - Daily - Mumbai, 21 October - 2021 Page- 8 Price- Rs. 5/-
24x7 : www.navakal.in • संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे Email-navakal.1923@gmail.com

## फॅशन डिझायनर रितु कुमारच्या कंपनीत रिलायन्स भागीदारी



**नवी दिल्ली -** रिलायन्स इंडस्ट्रीजची सहयोगी कंपनी असलेल्या रिलायन्स रिटेल व्हेंचर्स लिमिटेडने फॅशन डिझायनर रितु कुमार यांची कंपनी रितिका प्रायव्हेट लिमिटेडचा ५२ टक्के वाटा खरेदी केला आहे. त्यामुळे आता रितिका प्रायव्हेट लिमिटेडची मालकी रिलायन्सकडे आली असून फॅशन जगातील हा एक मोठा करार मानला जात आहे. रितिका प्रायव्हेट लिमिटेडकडे रितु कुमार, लेबल रितु कुमार, आरआय रितु कुमार, आर्के आणि रितु कुमार होम अँड लिविंग या ब्रँडची मालकी आहे. ही मालकी मिळविण्यासाठी रिलायन्सने फर्म एव्हरस्टोन ग्रुपकडे असणारे ३५ टक्के शेअर्स खरेदी केले आहेत. 'रितु कुमार यांच्या ब्रँडचा विस्तार करण्यासाठी बराच वाव आहे. या ब्रँडच्या फॅशनमध्ये नावीन्य असून पुढील पिढ्यांना अधिक सुंदर आणि समृद्ध करण्याचे काम हा ब्रँड करत राहील', असे सांगत रिलायन्स रिटेल व्हेंचर्स लिमिटेडच्या संचालक ईशा अंबानी यांनी या करारामुळे आपल्याला अत्यंत आनंद झाल्याचे म्हंटले.

# फुटबॉल आणि ब्लास्ट! चॅटमधील दोन शब्दांमुळे आर्यन अडकला
# ड्रग विक्रीच्या कारस्थानाचा आरोप! आता उच्च न्यायालयात धावाधाव

■ मुंबई

**क्रुझवरील रेव्ह पार्टीतील ड्रग प्रकरणात गेल्या १३ दिवसांपासून अटकेत असलेला अभिनेता शाहरुख खानचा पुत्र आर्यन खान, अरबाज मर्चंट आणि मुनमुन या तिघांचा जामीन अर्ज आज सत्र न्यायालयाने फेटाळला त्यामुळे त्यांचा कोठडीतील मुक्काम वाढला आहे. जामिनासाठी तिघांच्या वकिलांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. आता उच्च न्यायालयातील सुनावणीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. आर्यनच्या व्हॉट्सअप चॅटमध्ये फुटबॉल आणि ब्लास्ट असे शब्द आढळले. मोठ्या प्रमाणात ड्रग्ज खरेदीचे हे सांकेतिक शब्द असून आर्यन व अरबाज हे दोघेही ड्रग्जचे सेवन करीत होते आणि अचित कुमार या ड्रग विक्री करणाऱ्याकडून ड्रग विकतही घेत होते. आर्यन व इतरांना जामिनावर सोडले तर तपासावर त्याचा प्रभाव पडेल असा युक्तिवाद एनसीबीने केला आणि कोर्टाने मान्य केला.**



**आर्यन** खान याला ३ ऑक्टोबर रोजी एनसीबीने क्रुझवरील पार्टीमधून अटक केली होती. त्याच्या सोबत अरबाज मर्चंट, मुनमुन धामेचा आणि अन्य पाच जणांना अटक करण्यात आली होती आणि तेंव्हापासून आर्यनच्या जामिनासाठी त्याचे वकील सतीश मानेशिंदे प्रयत्न करीत आहेत. या प्रकरणात आम्हाला जमीन देण्याचा अधिकार नाही असे सांगून खालच्या कोर्टाने आर्यन आणि अरबाज व मुनमुनला सत्र न्यायालयात जायला सांगितले. त्यानुसार सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल करण्यात आला. यावेळी झालेल्या सुनावणीत बचाव पक्षातर्फे आर्यनकडे कोणत्याही प्रकारचे ड्रग सापडले नाहीत किंवा त्याने ड्रग सेवनही केलेले नव्हते. त्याला केवळ क्रुझ वरील पार्टीला विशेष अतिथी म्हणून बोलावण्यात आले होते असा दावा त्यांच्या वकिलांनी केला. त्यावर सरकारी वकील अनिल सिंग यांनी कोर्टाला सांगितले आर्यनवर अमली पदार्थ विरोधी कायदा कलम २९ ए अन्वये गुन्हा दाखल आहे. त्याचे आंतरराष्ट्रीय ड्रग पेडलारसोबत संभाषण झाल्याचे चॅट आमच्या हाती आले आहेत. त्यामुळे भारतात ड्रग आणण्याचे आणि वितरीत करण्याचे एक फार मोठे कारस्थान असून आर्यन खान या कटाचा एक भाग असल्याने या संपूर्ण प्रकरणाचा छडा लावण्यासाठी आर्यन खानची अजून चौकशी होणे गरजेचे आहे. त्यामुळे त्याला जामीन देऊ नये असे सांगून त्याच्या जामिनाला विरोध केला. आर्यनचे » पान २ वर

## एसटीचे सरकारमध्ये विलिनीकरण करा
## १७ संघटनांचा बेमुदत संपाचा इशारा

■ मुंबई

**एसटी** महामंडळाची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस ढासळत आहे. राज्य सरकारी कर्मचारी आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारामध्ये कमालीची तफावत आहे. म्हणून एसटी व कर्मचाऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी तिचे सरकारी सेवेत विलिनीकरण करावे. या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांच्या १७ कर्मचारी एकवटल्या आहेत. त्यांच्या कृती समितीने या मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारण्याचा इशारा दिला आहे. कृती समितीने संपाचा निर्णय घेतला असला तरी त्याची तारीख अद्याप ठरलेली नाही, अशी माहिती एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष



संदीप शिंदे यांनी दिली. त्यामुळे ऐन दिवाळीत एसटी कर्मचारी संपावर जाण्याची शक्यता आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या तुलनेत एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन अतिशय तुटपुंजे आहे. तेही त्यांना वेळेवर मिळत नाही. आता कोरोनाची परिस्थिती निवळली आहे. तरीही त्यांना वेळेवर वेतन मिळत नाही. परिणामी आर्थिक अडचणींना त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना तोंड द्यावे लागत आहे. उसनवारी आणि डोक्यावर कर्जाचा बोजा वाढल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी गळफास घेऊन आत्महत्या केल्या आहेत. तेव्हा या कर्मचाऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि त्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी तसेच एसटीलाही आर्थिक » पान २ वर

## महापालिका निवडणुकांचे बिगुल
## आरक्षण सोडत तारखा जाहीर

**मुंबई -** मिनी विधानसभा निवडणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यातील महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. त्यात मुंबई, ठाणे आणि उल्हासनगरसह १० पालिकांच्या प्रभाग रचना आणि आरक्षण सोडतीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. २२ ऑक्टोबरला मुंबई महापालिका, २६ ऑक्टोबरला उल्हासनगर आणि उर्वरित महापालिकांची सोडत २८ ऑक्टोबरला आहे.

महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती आणि नागपूर या १० महापालिकांची मुदत मार्च-एप्रिल २०२२ मध्ये संपणार आहे.

त्यामुळे तेथे होणाऱ्या निवडणुकांसाठी प्रभाग रचना आणि प्रभाग आरक्षण निश्चितीचे वेळापत्रक राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. त्यानुसार २२ ऑक्टोबरला मुंबई, २६ ऑक्टोंबरला उल्हासनगर आणि इतर महापालिकांसाठी २८ ऑक्टोबरला सोडत आहे. या सर्व महापालिकांच्या प्रारूप प्रभागांना २२ ऑक्टोंबरपर्यंत मान्यता देण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधित तारखांना त्या-त्या महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

## जयस्वालांच्या मानेवर तेलगीचे भूत?
## राज्य सरकारचे हायकोर्टात शपथपत्र

■ मुंबई

**संपूर्ण** देशाला हादरवून सोडणाऱ्या तेलगी बनावट स्टॅम्प प्रकरणात आता राज्य सरकारने प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्यात तत्कालीन विशेष तपास पथकाचे प्रमुख आणि विद्यमान सीबीआयचे संचालक सुबोध कुमार जयस्वाल यांची याचिका तातडीने निकाली काढण्याची विनंती केली आहे. १५ वर्षांनंतर राज्य सरकारने हे प्रकरण बाहेर काढल्यामुळे केंद्रीय प्रशासकीय यंत्रणा आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्ष आता शिगेला पोहोचला आहे. मुख्यमंत्री आणि महाविकास आघाडी नेत्यांच्या कालच्या बैठकीनंतर सरकारने हे शपथपत्र दाखल केले आहे. तेलगी



प्रकरणात जयस्वाल यांच्यावर पुणे मोक्का न्यायालयाने कडक ताशेरे ओढले आहेत. त्यामुळे त्यांच्या अडचणी वाढण्याची चिन्हे आहेत. तेलगी बनावट स्टॅम्प पेपर घोटाळ्याचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली होती. या पथकाचे प्रमुख सुबोध जयस्वाल होते. या पथकाच्या तपासाबाबत पुणे मोक्का न्यायालयाने काही कठोर निरिक्षणे नोंदवली होती. त्यामुळे ती रद्द करावी, अशा मागणीची याचिका सुबोध कुमार जयस्वाल यांनी २००७ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे. त्यावर अद्याप सुनावणी झालेली नाही. २०१९ मध्ये जयस्वाल यांची राज्याच्या पोलीस महासंचालकपदी नियुक्ती झाली. » पान २ वर

## नीरव मोदीची आरोप रद्द मागणीची याचिका अमेरिकन कोर्टाने फेटाळली

■ वॉशिंग्टन

**भारतीय** बँकांना कोट्यवधींचा चुना लावून परदेशात पळून गेलेला हिरे व्यापारी नीरव मोदीला अमेरिकन अवसायन न्यायालयाने मोठा दणका दिला. आपल्या विरुद्धचे फसवणुकीचे आरोप रद्द करावेत, अशा मागणीची त्याची याचिका न्यायालयाने फेटाळली.



नीरव मोदी यांच्या मालकीच्या फायरस्टार डायमंड, फॅन्टसी इन्कॉर्पोरेट आणि ए. जॅफी या ३ कंपन्यांच्या विश्वस्तपदी रिचर्ड लेव्हिन यांची न्यायालयाने नियुक्ती केली होती. त्यांनी नीरव मोदीवर फसवणुकीचे आरोप न्यूयॉर्क न्यायालयात केले आहेत. नीरव मोदी आणि त्याचे सहकारी मिहीर भन्साळी व अजय गांधी यांच्याविरोधात लेव्हिन यांनी ही याचिका दाखल केली आहे. त्यांच्याकडून भरपाई म्हणून १० लाख ५० हजार डॉलर्स भरपाई देण्याची मागणी केली आहे. रिचर्ड लेव्हिन यांचे हे आरोप रद्द करण्याच्या मागणीची याचिका नीरव मोदी आणि त्याच्या साथीदारांनी अमेरिकन न्यायालयात दाखल केली होती. मात्र न्यायालयाने ती फेटाळली.

## जळगावाच्या पाचोऱ्यात एकनाथ शिंदेंचा दोन तासाचा गुप्त दौरा

**पाचोरा -** राज्याचे नगरविकासमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी पाचोरा येथे अचानक भेट देत आमदार किशोर पाटील यांच्याशी बंद दरवाजाआड दोन तास चर्चा केली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील काही तालुक्यांवर विशेष लक्ष केंद्रित करत तेथे करावयाच्या नियोजनाची जबाबदारी शिंदेंवर सोपवली असून त्यासाठी त्यांनी अशा गुप्त दौऱ्यांना पाचोरा येथून सुरवात केल्याचे राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. पाचोरा येथील हिवरा नदीकाठी असलेल्या प्रभू रामचंद्र मंदिर परिसरात मंगळवारी दुपारी अत्यंत गुप्तपणे झालेल्या बैठकीस मंत्री शिंदे यांच्यासह केवळ आमदार पाटील, मुकुंद बिल्दीकर व नगराध्यक्ष संजय गोहिल हे चौघेच उपस्थित होते. पालिकेअंतर्गत नगरविकास विभागाकडे प्रस्तावित असलेल्या कामांची त्यांनी माहिती घेत तत्काळ सर्व विषय मार्गी लावणार असल्याचे नियोजन केले तसेच या चर्चेचा तपशील बाहेर आला नसला, तरी या बैठकीत विविध राजकीय विषयांवर खलबते रंगली आणि पाचोरा नगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी करावयाच्या रणनीतीबाबत शिंदेनी गुप्तगू केली. या दौऱ्याबाबत अंत्यत गुप्तता पाळल्याने याची माहिती प्रमुख कार्यकर्त्यांसह माध्यम प्रतिनिधींना देखील नव्हती. त्यामुळे या भेटीबाबत विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

## फ्लेचर पटेल यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी माजी सैनिक आले

**मुंबई -राष्ट्रवादी** काँग्रेसचे प्रवक्ते नवाब मलिक यांनी फ्लेचर पटेल यांच्यावर ड्रग्ज केसमधील पाच ठिकाणी तेच पंच कसे असा आरोप केला आहे. त्या आरोपांचे खंडन करण्यासाठी आणि सैनिक फेडरेशनचा आपल्याला पाठिंबा आहे हे दर्शवण्यासाठी पटेल यांनी आज पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी फेडरेशनचे विविध भागातील पदाधिकारी उपस्थित होते. सैनिक फेडरेशनच्या आठ पदाधिकाऱ्यांनी फ्लेचर पटेल यांनाआमचा पाठिंबा असल्याचे सांगितले. त्यांच्या विरोधात कोणी गेले तर आम्ही त्याला सामूहिकरीत्या विरोध करू असा इशाराही यावेळी फेडरेशकडून देण्यात आला. फ्लेचर पटेल यांना 'नवाकाळ' ने विचारले की, प्रत्येक रेडच्या तुम्ही कसे हजर असता तेव्हा त्यांनी कारवाईतील माहिती उघड करता येत नाही असे सांगून त्यांनी उत्तर देण्याचे टाळले. पत्रकार परिषदेमध्ये बोलताना फ्लेचर पटेल म्हणाले की, मी ९८ मध्ये आर्मीत सहभागी झालो. हल्लीच निवृत्त झालो आहे. सरकारी प्रशासनात निवृत्त सैनिक नको असतो. कारण तो स्वच्छ प्रतीमेचा असतो. आमची संघटना ड्रग्ज विरोधात काम करणाऱ्यांना सहकार्य करते. माजी सैनिकांच्या प्रश्नांकडे महाराष्ट्र सरकारने कधीही लक्ष दिलेले नाही. आमच्या प्रश्नना वाचा फोडणारे कोणी नाही. तरुण वयात आम्ही सीमेवर लढायला जातो . आमच्या अंगीच देशासाठी बलिदान करण्याचा गुण आहे. त्यामुळे आम्ही निवृत्त झाल्यानंतरही देशांतगर्त असलेल्या शत्रुबरोबर लढणार आहोत. सैनिक फेडरेशनचे मोहम्मद अब्बास फौजी यांनी सांगितले की, पटेल यांच्या विरोधात पाच गुन्हे दाखल नाहीत तर त्यांना पाच मेडल मिळाले आहेत.

## पेट्रोल-डिझेल दरवाढीच्या झळा सुरूच

**मुंबई -** पेट्रोल-डिझेलच्या ग्राहकांना काल सलग दुसऱ्या दिवशी दिलासा मिळाला होता. त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये जरा चांगलं वातावरण होतं. मात्र आज पुन्हा एकदा पेट्रोल-डिझेल दरांचा भडका उडाला. राजधानी दिल्लीत आज पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रतिलिटर ३५-३५ पैशांची वाढ झाली. त्यामुळे दिल्लीत आज पेट्रोलसाठी प्रतिलिटर १०६.१९ रुपये आणि डिझेलसाठी




प्रतिलिटर ९४.९२ रुपये मोजावे लागत आहेत. तसेच मुंबईत आज पेट्रोल प्रतिलिटरमागे ३५ पैसे आणि डिझेल ३७ पैशांनी महागले, ज्यामुळे पेट्रोल ११२.११ रुपये आणि डिझेल १०२.८९ रुपये प्रतिलिटर झाले आहे. या महिन्यात केवळ १२ दिवसांत पेट्रोलचे दर ३.४८ पैशांनी महागले आहेत, तर डिझेल दरात ४.०४ पैशांची वाढ झाली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किंमतींचा परिणाम आवश्यक गोष्टींवर होतो. त्यामुळे सर्वसामान्यांचे लक्ष दररोज बदलणाऱ्या पेट्रोल-डिझेलच्या किंमतींवर असते. सध्या जगभरात कच्च्या तेलाची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. परंतु उत्पादन मात्र कमी आहे. दरम्यान, जेव्हा जगभरात कच्च्या तेलाच्या किंमती वाढतात, तेव्हा देशात पेट्रोल-डिझेलच्या किंमतींमध्ये वाढ होणे सामान्य बाब आहे. परंतु या सततच्या दरवाढीत सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसत आहे.

## उत्तर महाराष्ट्रात दिवाळीच्या फटाक्यावरील बंदी मागे

■ नाशिक

**फटाक्याशिवाय** दिवाळी ही कल्पनाच काहीशी विचित्र वाटते.मात्र प्रदूषणाचे कारण पुढे करून विभागीय आयुक्तांनी उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये फटाक्यांवर बंदी घातली होती मात्र त्याविरुद्ध फटाके व्यापारी आणि काही राजकीय पक्षांनी आवाज उठवताच नाशिकचे पालकमंत्री छगन भुजबळ यांच्या मध्यस्थीने काल फटक्या वरील बंदी मागे घेण्यात आली त्यामुळे आता खऱ्या अर्थाने उत्तर महाराष्ट्राची दिवाळी उत्साहात साजरी होणार आहे. राज्यातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी सरकारने माजी वसुंधरा योजना सुरू केली आहे या योजने अंतर्गत जल प्रदूषण,वायू प्रदूषण



आनंद द्विगुणित

रोखण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत त्याचाच एक भाग म्हणून नाशिक चे विभागीय आयुक्त राम कृष्ण गमे यांनी उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये फटाके बंदीचे निर्देश दिले होते आणि २२ऑक्टोबर पासूनच त्याच्या अंमल बजावणीचे आदेश सर्व महापालिका आणि नगरपालिकांना दिले होते त्यावर फटाके व्यापारी आणि राजकीय पक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती मनसेने तर रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते फटाके व्यापाऱ्यांनी या निर्णयाला विरोध करताना आमचे अगोदरच कोरोनाच्या काळात खूप झाले गेल्या दिवाळीसाठीचां मालं सुद्धा तसाच पडून राहिला आणि यावेळी जर बंदी घातली तर आता खरेदी केलेल्या मालाचे काय करायचे आमचे या बंदीमुळे मोठे नुकसान होईल तेंव्हा ही बंदी मागे घ्यावी अशी विनंती थेट पालकमंत्र्यांना केली होती.

## लखीमपूर दुर्घटनेतील शेतकऱ्यांच्या अस्थींचे चंद्रभागेत विसर्जन

■ पंढरपूर

**उत्तर** प्रदेशातील लखीमपूर येथील शेतकरी आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारात अनेक शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. या मृत शेतकऱ्यांच्या अस्थींचे आज पंढरपुरातील चंद्रभागा नदीत विसर्जन करण्यात आले. शेतकरी नेते विनायक पाटील यांनी पुढाकार घेऊन मृत शेतकऱ्यांच्या व एका पत्रकारांची अस्ती चंद्रभागा विसर्जनासाठी पंढरीत आणल्या होत्या.

शेतकरी आणि वारकऱ्यांनी दिंडी काढून विठू नामाच्या जयघोषात अस्थिंचं चंद्रभागेच्या पात्रात विसर्जन केलं. त्यापूर्वी या अस्थी नामदेव



पायरीवर दर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यानंतर नामदेव पायरीपासून ते चंद्रभागा घाटापर्यंत दिंडी काढण्यात आली. नंतर विधीवत या अस्थिंचं विसर्जन करण्यात आलं.

विठ्ठल हा शेतकऱ्याचं दैवत आहे. पंढरपुरात येणारा भाविक हा शेतकरीच आहे. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरोधात लढण्यासाठी शेतकऱ्यांना शक्ती मिळावी असे साकडे यावेळी शेतकऱ्यांनी विठू चरणी घातले, असं शेतकरी नेते विनायक पाटील यांनी सांगितलं. शेतकरी नेते विनायक पाटील यांच्या पुढाकारानेच या अस्थी पंढरपुरात आणण्यात आल्या होत्या.

# छोट्या जाहिराती
संपर्क करा
मोबा.८१०८११६४२३

## पाहिजेत

घरकामासाठी 12/24 तास बायका / मुली / बेबी / पेशंटकेअर / जापा / रेस्टॉरंटसाठी कुक (इंडियन, चायनीज, तंदूर) पाहिजेत. 'कुमारसर' दादर **9326923568** अंधेरी **8928055048 / 9076326174** {NCC211247}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (Thane) {NC210741}

HDFC बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भरती. 15000/- ते 35000. **7900137819** {NCC211118}

जिरे, मोहरी, धणे, सुगंधी उटणे पॅकिंग हप्त्याला 12000/- कमवा : **8425896515** {NC210759}

काजू, बदाम, चॉकलेट, सोडा , टिकली, अगरबत्ती, मेणबत्ती, ज्वेलरी पॅकिंग. : **7710018373** {NC210760}

बँकेच्या कलेक्शनसाठी DRA / NON DRA टेलिकॉलर, फिल्ड एक्झिक्युटिव्ह, टिमलिडर्स पाहिजेत. पगार (12,000-30,000) 319, अनंत लक्ष्मी चेंबर, ठाणे (पश्चिम), **7045170449** {NCC211207}

PVT. LTD. कंपनीत मुले-मुलींची अर्जंट भर्ती कमवा. 13,500 - 35,000/- राहणे फ्री + बोनस अंधेरी (West), **9967362303** {NCC211161}

सिक्युरिटी गार्ड / सुपरवायझर (MALE) 8-12 तास. पगार 16000-26000 **7738687772** {NCC211183}

कंपनीला परमनन्ट मुले-मुलींची भर्ती 18000/ - - 35000/- राहणे जेवण **8097795145** {NCC211218}

अग्रगण्य कंपनीसह कोणत्याही लक्ष्य किंवा मुदतीशिवाय काम करण्याची उत्कृष्ट कमाईची संधी वय 30 आणि वरील **9004569425 / 9869014410** {NCC211219}

मालाड (ईस्ट) स्टेशन जवळ पुरुष / स्त्री टेलीकॉलर पाहिजेत. पगार ८-१० हजार पर्यंत. मराठी बोलायला सक्षम. वय ३० खाली. **9222222248** {NC210773}

MIS सिक्योरिटीकरीता सिक्योरिटी गॉर्डची गरज पगार- सिक्योरिटी गार्ड -१७,०००/- वयोमर्यादा- ४० वर्षपर्यंत संपर्क- समीर खेडेकर - **9320644023** {NC210779}

सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. पगार 18500 कल्याण, ठाणे, अंधेरी **9702063944** {NCC211222}

## पाहिजेत

असिन पॉवर प्रा. लि. ठाणे (इलेक्ट्रिकल बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टींग) कंपनीला अनुभवी उमेदवार पाहिजेत. इलेक्ट्रीकल (फ्रेशर/सिनिअर) इंजिनिअर आणि सुपरवायझर, सेफ्टी ऑफिसर, डिझाईन आणि प्लॅनिंग इंजिनियर. संपर्क : **8108105161 / 8425816604** {NC210774}

लॉजिंगसाठी रात्रपाळीचा सिक्युरीटी गार्ड आणि हाऊसकिपींग स्टाफ अर्जासह भेटा : ''कुळकर्णी ब्रदर्स शोरुम'' पोर्तुगीज चर्चजवळ, दादर (पश्चिम) {NC210781}

कंपनीला ड्रायफुट, फरसाण, बुक, गारमेंट, पॅकिंग, हेल्पर, हाऊसकिपिंग, सिक्युरीटी, ऑफिसीयल, मुला-मुलींची परमनंट भर्ती कमवा. 12500-25000/- शिक्षण नाही. **8291353332** {NCC211223}

कांदिवली पूर्वसाठी मोटरसायकल असलेले / नसलेले डिलिव्हरीबॉईज पाहिजेत. पगार 17,000/- पर्यंत. **8007527833** {NCC211241}

साफसफाईच्या कामासाठी डेली बेसवर मुले पाहिजेत. रोज 400/- रुपये व बक्षिस. ''होम सर्विसेस'', केणी बिल्डिंग, अनमोल अपार्टमेंटच्या पाठीमागे सखाराम किर मार्ग, शिवाजी पार्क, एअरटेल गॅलरी लेन, दादर, मुंबई - 16. **9322195398** (भेटायची वेळ 9-11) {NC210797}

पाहिजेत सिक्युरिटी गार्ड / वेटर / हेल्पर. मुंबई / नवी मुंबई / ठाणे - **8097231618.** {NC210787}

घरी बसून लिखाण काम 7 दिवसांचा पगार 15000/- : - साक्षी **8591555848** {NC210740}

पॅकिंगसाठी मुले/मुली/महिला पाहिजेत पगार घणसोली - 10865 / रबाळे - 11325 / तुर्भे - 12352 / मानकोली - 11367 / आसनगाव 12000 - संपर्क - **9769575757 / 9819182176** {NC210762}

मुंबईमध्ये पेशंटसाठी वॉर्डबॉय, आया पाहिजेत. २३,०००/- - ३०,०००/-. **91368 40611 / 91363 83011 / 82918 60224** {NC210788}

5 स्टार हॉटेलमध्ये हाऊसकिपींगसाठी मुले अर्जट पाहिजेत. 9 तास - 10,500, 15 तास 18,000/- **(9920792845 / 9819200248 )** {NC210783}

इमीटेशन कामासाठी मुली पाहिजे. बोरीवली (वेस्ट), स्टेशनजवळ **9702989250 / 9372696771** {NCC211248}

## पाहिजेत

**एअरकार्गोसाठी हाऊसकिपींगसाठी मुले पाहिजेत. पगार 11700/- . संदीप 9702126571, धर्मेश 7208551929** {NC210799}

जळगाव येथे 4 कलर शिनोहरा (Shinohara) 19 x 26 मशीनसाठी ऑपरेटर, फिडरमॅन, बॉयलर त्वरित पाहिजे. संपर्क - **9371029994 / 8999075759** {NCC211250}

दहिसरला बेबीकेर व २४ तास घरकामासाठी बाई पाहिजे **7715800302.** {NC210800}

घरी बसून ऑफीसचे काम करण्याकरिता Female स्टाफ पाहिजेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक संपर्क - **9321384577** {NC210802}

हॉटेल खवय्ये ठाण्यात कुक, मांडणीवर, वेटर, हेल्पर, मोरीत आणि इतर सर्व स्टाफ हवा आहे. संपर्क **9769199770** {NCC211251}

मुलुंड येथील ऑफीसकरिता बाहेरील कामांसाठी Male स्टाफ पाहिजेत. संपर्क - **9321384577** {NC210801}

दुध वितरक पाहिजेत, अंधेरी जोगेश्वरीसाठी प्राधान्य, आकर्षक कमिशन मिळेल. संपर्क - **9820623150** {NC210801}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७ वी नापास? डायरेक्ट १०वी. ११ वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली : **9820627580 / 9820904646** {NCC211181}

## Education

DO DIRECT SSC, HSC, BA, BCOM, BSC, BTECH, B.ED **9168088740** {NCC211209}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हर्मेंट सर्टिफाईड GNM / ANM NURSING ASSISTANT, DMLT, OT, ICU, XRAY. DIALYSIS, OPTOMETRY, PHYSIOTHERAPY ''ओमइन्स्टिट्युट'' **8080502190 / 9820258768 / 7666617771** {NCC210347}

## प्रॉपर्टी विषयक

चारकोप नाका, मार्वे रोड, मालाड (प), मुंबई नं. 400095 येथील कलेक्टर जागांवर SC (schedule cast) फक्त करिता अस्मिता ज्योती को. आ. हौ. सो ली. फ्लॅट. ई1/15, मेंबर्सशीप नं. 118, 1RK ,287 carpet, पहिला मजला, उत्तम सोसायटी, फ्लॅट विकणे आहे. संपर्क **9930628028.** {NCC211249}

## गुंतवणूक विषयक

लघु उद्योगात गुंतवणूक करून रोज नफा कमवा. **9892073272** {NCC211229}

## कर्ज विषयक

LIC पॉलिसीवर ताबडतोब कॅश/कर्ज विसावा हॉटेलजवळ दादर (पश्चिम), सावंत - **9221357947** {NC210693}

दिवाळी स्पेशल सर्व प्रकारची कर्जे बिजनेस/पर्सनल/ हाऊसिंग लोन, कमी कागदपत्रे, कमी वेळेत त्वरित मिळतील. **7715968829** {NC210780}

## व्यवसाय विषयक

सीएफएल/एलईडी बल्ब जोडणीचे काम करून १ लाखापर्यंत उत्पन्न मिळवा. - **8788254775, 9422850593** {NCC210686}

!! श्री सद्गुरू कृपा !! BHHARATI AGARBATTI WORKS नेटवर्क कंपनी मार्फत वास्तुकुबेर अर्कबत्ती/अगरबत्तीची विक्री करुन महिना 22,000 नफा मिळवा. संपर्क **8422979458** {NCC211245}

छोट्याशा जागी घरच्या मनुष्यबळामध्ये रेग्युलर चालणारा व्यवसाय मिळेल. - **9930945788** {NCC211231}

## जागा विषयक

बिल्डर रिसेल प्रॉपर्टी शेरिंग १००% लोन उपलब्ध एजन्ट वेलकम -**7715096161** {NC210714}

दिवाळी स्पेशल ऑफर बैठी चाळीमध्ये घर फक्त 3,50,000/- एरिया 300 चा रेडी पझेशन ग्रामपंचायत NA जागा खुद्द सातबारा 24 तास पाणी शाळा मार्केट जवळ, टिटवाळा (पूर्व) 3 किलोमीटर अंतरावर **8082208080 / 8080189097** {NCC211227}

## व्यसनमुक्ती

दारू सोडवा तंबाखू गुटखा सिगरेट औषधे उपलब्ध डॉ नागरगोजे मो **9765609769** {NCC211128}

## ज्योतिष विषयक

''साईगणेश ज्योतिष मंगलपूजा सर्वप्रकारचे पूजापाठ कुंडली बनवून मिळतील. **7400240996** (भाईंदर) {NCC211212

सागर ज्योतिष मराठी जन्मकुंडली स्पेशलिस्ट गुण- मिलन, पुजापाठ कुंडली रु. 151/- 201/- जुईनगर (नवीमुंबई) **9870126299** {NCC211149}

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# कोल्हापुरातील एक विख्यात पहिलवान आणि कुस्तीगीर दादू चौगुले

महाराष्ट्राच्या रांगड्या मातीतले मल्ल म्हणून ओळख असलेल्या रुस्तम ए हिंद दादू चौगुले यांनी महाराष्ट्राच्या कुस्तीला आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून देण्यामध्ये मोठा हातभार लावला होता. देश-विदेशातील अनेक मल्लांशी भिडत त्यांना लाल माती आणि मॅटवर अस्मान दाखविणारे पैलवान दादू चौगुले हे कुस्तीच्या आखाड्यातले मानाचे नाव. मुलाला पैलवानच करायचं, या हट्टानं प्रसंगी पोटाला चिमटा घेत आई-वडिलांनी दादूला खुराक दिला. वयाच्या दहाव्या वर्षीच कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील अर्जुनवाडा या छोट्याशा गावातील हा धट्टाकट्टा मुलगा आखाड्यात उतरला. छोट्या छोट्या कुस्त्या मारणारा हा मुलगा वस्ताद गणपतराव आंदळकरांच्या मनात भरला. त्यांनी मोठी मेहनत करून घेत कुस्तीचे डावपेच शिकवले. पुढे हा पठ्ठा महाराष्ट्रात चमकला आणि बघता बघता सत्पालसह उत्तरेतील बुरुजबंद मल्लांशी भिडू लागला. मिळालेल्या संधीचे सोने करताना अनेक मानाच्या गदा त्याने पटकावल्या. पैलवान आंदळकर, बाळ गायकवाड, बाळू बिरे यांच्या तालमीत घडलेल्या या पैलवानाने कोल्हापूरचा जरीपटका सर्वत्र मानाने फडकवत ठेवला. दादू चौगुलेंनी लाल मातीबरोबर मॅटवरही राष्ट्रकुल स्पर्धेत भारताचा झेंडा फडकवला. १९७३ साली न्यूझीलंडमधील ऑकलंड येथे झालेल्या शंभर किलो गटातील कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. तत्पूर्वी त्यांनी महान भारत केसरी, रूस्तम ए हिंद या मानाच्या गदा कोल्हापुरात आणल्या होत्या. त्यामुळे त्यांचा कुस्तीत चांगलाच दरारा निर्माण झाला. लाल मातीतून बाहेर पडल्यानंतर कुस्तीशी नाळ कायम ठेवत बदलत्या प्रवाहानुसार कुस्तीच्या विकासासाठी झटणाऱ्या रुस्तुम ए हिंद, महान भारत केसरी, राष्ट्रकुल रौप्यपदक विजेते दादू चौगुलेंचा भारत सरकारने मानाच्या मेजर ध्यानचंद जीवन गौरव पुरस्काराने यथोचित सन्मान केला. त्यांनी कुस्तीच्या वाढीसाठी सक्रिय योगदान दिले. ते



कोल्हापूर शहर व जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष राहिले होते. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील अनेक मल्ल त्यांनी मेहनतीने घडविले. अखिल भारतीय कुस्तीगीर परिषदेशी चांगले संबंध ठेवत कोल्हापुरातील अनेक मल्लांना त्यांनी राष्ट्रीय पातळीवर नेले.

संजीव वेलणकर, पुणे

# फुटबॉल आणि ब्लास्ट! चॅटमधील दोन शब्दांमुळे आर्यन अडकला

पान १ वरून

व्हॉट्सअप चॅटही न्यायालयात सादर करण्यात आले. दोन्हीकडच्या वकिलांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यावर न्यायालयाने आज २० ऑक्टोबरपर्यंत निकाल राखून ठेवला होता. आज न्यायालयाने सरकारी वकिलांचा युक्तिवाद मान्य करून आर्यन व अरबाज आणि मुनमूनचा जामीन अर्ज फेटाळला. दुपारी ४ वाजता हा निकाल लागल्यावर आर्यनचे वकील सतीश मानेशिंदे यांनी तत्काळ सत्र न्यायालयाच्या आदेशाची प्रत मिळवून मुंबई उच्च न्यायालयात अपील केले. आर्यनच्या न्यायालयीन कोठडीची मुदत उद्या संपत आहे. अशा स्थितीत गुरुवारी आर्यनच्या जामीन अर्जावर सुनावणी होऊन त्याला जामीन मिळेल का हे उद्या स्पष्ट होईल. मात्र या प्रकरणात एनसीबीने कट कारस्थान झाल्याचा मुद्दा पुढे करून तपासाची व्याप्ती वाढवली आहे. त्यामुळेच आर्यन खान याला जामीन मिळेनासा झाला आहे. आता उच्च न्यायालयाने जर ३० ऑक्टोबरपर्यंत जामीन दिला नाही तर पुढे दोन आठवडे न्यायालयास दिवाळीची सुट्टी असल्याने आर्यनचा कोठडीतील मुक्काम आणखी वाढू शकतो.

**वर्षभरातील एनसीबीच्या ९० टक्के केस फेक! मलिकांचा गंभीर आरोप**

आर्यनचा जामीन फेटाळल्यानंतर राष्ट्रवादीचे प्रवक्ते आणि अल्पसंख्यांक मंत्री नवाब मलिक यांनी एनसीबीवर पुन्हा गंभीर आरोप केले. गेल्या वर्षभरातील एनसीबीच्या ९० टक्के केसेस या फेक आहेत. राजकीय हेतूने प्रेरित आहेत. खंडणी वसुलीचा डाव एनसीबीचा सुरु आहे. त्याचा भांडाफोड आज ना उद्या नक्की होईल, असल्याचे मलिक यांनी म्हटले आहे.

नवाब मलिक यांनी पत्रकार परिषदेत म्हटले की, या केसमध्ये परराष्ट्र मंत्रालयाचा हवाला देवून ड्रग्जचे आंतरराष्ट्रीय रॅकेट आहे. बिटकॉईन, क्रिप्टोकरन्सीचा उल्लेख कुठेतरी मीडियातून करण्यात आला. एनसीबीचा प्रत्येक केसमध्ये युक्तीवाद बदलत जातोय आणि लोकांचा जामीन कसा थांबवता येईल हे टेक्टिस एनसीबीचे आहे. बरीचशी उदाहरणे माझ्याकडे आहेत. आमच्या केसमध्ये जेव्हा एनडीपीसी न्यायालयात जामिनासाठी गेलो तेव्हा एक चॅट दाखवण्यात आले, त्यामध्ये ५ लाख रुपयांच्या देवाणघेवाणीचे पुरावे आमच्याकडे आहेत, असे सांगण्यात आले. पण आमच्या घरातील छोट्या जावयांनी मोठ्या जावयाला कर्ज देण्याबाबतचे ते चॅट होते. पण जेव्हा चार्जशीट दाखल करण्यात आले त्यामध्ये त्याचा कुठलाही उल्लेख न्हवता. लोकांना त्रास कसा द्यायचा तेवढेच आहे. जामीन मिळू नये यासाठी हे प्रयत्न सुरु असतात. सिलेक्टीव लोकांचा विरोध करायचा, काही लोकांना जामीन मिळवून देण्यासाठी मदत करायची, अशी पद्धत एनसीबीची आहे. आर्यन खानशी संबंधित केस ही फेक आहे. आता आरोपींचे वकील जामिनासाठी हायकोर्टात जाणार आहेत. काय निर्णय घ्यायचा तो त्यांचा अधिकार आहे. मी पहिल्या दिवसांपासून सांगतोय, एनसीबी कोर्टात जे फोटो, औषधे, गोळ्या दाखवत आहेत ते सर्व मुंबई एनसीबीचे झोनल डायरेक्ट समीर वानखेडे यांच्या कार्यालयातले आहेत. एनसीबीला क्रूझवर काहीच सापडलेले नाही. जर एखादा कोर्ट कमिशनर बसवला तर जे खरंय ते स्पष्टपणे समोर येईल. बनावट फोटो जारी करुन ते केस दाखवत आहेत. त्याबाबत जर चौकशी केली तर ती केस फेक आहे हे सिद्ध होईल, असा दावा यावेळी मलिकांनी केला.

ते पुढे म्हणाले की, आरोपींच्या वकिलांना आमच्याकडून पुराव्यांची गरज असेल तर निश्चितपणे आमची त्यांना मदत राहणार. एनसीबीने गेल्या एक वर्षात ज्या काही कारवाया केल्या त्यातील ९० टक्के कारवाया या फेक आहेत. त्याचे पुरावे आम्ही गोळा करतोय. आज ना उद्या काही लोक कोर्टात फेक केसबद्दल पीआयएल दाखल करतील. ते सिद्ध देखील होईल. राजकीय हेतून काही विशेष लोकांना त्रास देण्यासाठी एनसीबीचा वापर होत आहे. एनसीबीच्या माध्यमातून दहशत निर्माण करुन पैसे उकळण्याचे काम सुरु आहे. वर्सोवा पोलीस ठाण्यात एका व्यक्तीने तक्रार केली आहे. समीर वानखेडे यांच्या नावाने आमच्याकडून पैशांची मागणी केली जाते, अशी तक्रार एका व्यक्तीने एप्रिल महिन्यात केली आहे. जे पैसे खंडणीच्या रुपाने वसूल करण्याचा प्रयत्न सुरु आहे त्याचा भंडाफोड आज ना उद्या नक्की होईल. याआधी रेव्ह पार्टी जेव्हा झाली. त्यामध्ये जी लोकं सापडली त्यांची युरीन, ब्लड सॅम्पल घेण्यात आले व सोडून दिले. त्यांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. कोर्टासमोर हजर करण्यात आले. अशाप्रकारे केसेस चालल्या. पण गेल्या वर्षभरात एनसीबीने प्रत्येक व्यक्तीवर ड्रग्ज सेवन केल्याचा आरोप केला. पण कुठल्याही आरोपीचा ब्लड आणि युरीन सॅम्पल घेत नाही. तुम्हाला ते सॅम्पल सापडत नाहीत. मग तुम्ही व्हाट्सअँप चॅटच्या आधारावर सांगतात, असेही मलिक यावेळी म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, मुंबई एनसीबीचे झोनल डायरेक्टर समीर वानखेडे यांचा मोबाईल चेक करा. त्यांचे व्हॉट्सॲप चॅट, फोन रेकॉर्डिंग रिव्हील झाले तर सगळी केसेस फेक आहे, ते स्पष्ट होईल. तसेच त्यांनी काय-काय फेक काम केले आहे ते उघड होईल. भाजप, एनसीबी आणि काही गुन्हेगार मिळून मुंबईत दहशत माजवत आहेत. आम्ही त्याचे रीतसर पुरावे पुढच्या आठवड्यात देऊ. मुंबईत खंडणीचा मोठा धंदा सुरु आहे. लोकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. लोकांना बदनाम करण्याचे कटकारस्थान सुरु आहे. प्रसिद्धीसाठी कुणालाही अडकविण्याचा उद्योग एनसीबीच्या माध्यमातून सुरु आहे. एनसीबीने गेल्या वर्षभरात ज्या कारवाया केल्या आहेत त्याचा तपास करावा. त्यासाठी केंद्र सरकारने आयोग नेमावा वर्षभरातील बोगस केसेसचे पुरावे आम्ही सादर करतो.

# एसटीचे सरकारमध्ये विलिनीकरण करा

पान १ वरून

अडचणीतून बाहेर काढण्यासाठी तिचे सरकारी सेवेत विलिनीकरण करून सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांना वेतन आणि इतर लाभ द्यावेत, अशी मागणी या संघटनांनी केली आहे. तत्कालीन परिवहन मंत्री दिवाकर रावते यांच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांसाठी अनेक घोषणा झाल्या होत्या. त्यांची अंमलबजावणी करावी आणि कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, डीए व वेतनवाढ द्यावी. कोविड काळात मरण पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना ५० लाखांचे सानुग्रह अनुदान द्यावे, आत्महत्या केलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २५ लाखांचे सानुग्रह अनुदान द्यावे आणि एसटीचे राज्य सरकारमध्ये विलिनीकरण करावे, अशा मागण्या त्यांनी केल्या आहेत. त्यासाठी बेमुदत संपावर जाण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. हा निर्णय कर्मचारी संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला असून संपाची तारीख लवकरच ठरविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# राशी भविष्य

संजय मनोहर

**गुरुवार, दि. २१ ऑक्टोबर २०२१**

**मेष :** नोकरीत वादविवाद टाळावेत. काहींना अचानक धनलाभाचे योग संभवतात. प्रवास कार्यसाधक व आनंददायक ठरतील.

**वृषभ :** व्यवसायात घेतलेले निर्णय फायद्याचे ठरतील. काहींना कमी श्रमात अधिक लाभ संभवतो. धार्मिक कार्यात भाग घ्याल.

**मिथुन :** घरातील जुनी पिढी थोड्या अडचणी वाढवू शकते. कौटुंबिक स्तरावर ताणतणावाचे प्रसंग येऊ शकतात. सत्संग लाभेल.

**कर्क :** अडलेल्या कामांना गती मिळेल. व्यवसायात अपेक्षेपेक्षा अधिक फायदा संभवतो. कायदेविषयक अडचणी दूर होतील.

**सिंह :** नातेवाईकांना फुकटचे सल्ले देणे टाळावे. कोणाच्या आश्वासनांवर अवलंबून राहू नका. कर्जाची कामे मार्गी लावू शकाल.

**कन्या :** ऐनवेळेस पैशाची उपलब्धता खर्चाचे ताण कमी करेल. जोडधंद्यातून फायदा संभवतो. योग्यता ओळखून व्यवहार करावा.

**तूळ :** कामाच्या ताणतणावामुळे धावपळ वाढेल. एकंदरीत आर्थिक अनुकूलता राहील. सत्संगाचा लाभ होईल.

**वृश्चिक :** संततीशी थोडे मतभेद संभवतात. नवीन ओळखी फायद्याच्या ठरतील. गरजूंना यथायोग्य मदत करू शकाल.

**धनु :** स्वत:चा निर्णय नीट तपासून पाहाणे गरजेचे आहे. जुन्या देण्याघेण्याचे व्यवहार अडचणी वाढवू शकतात. वादविवाद टाळा.

**मकर :** जोडीदाराकडून फायदा संभवतो. काहींना कमी श्रमात अधिक लाभ होतील. थोडे मनासारखे वागाल.

**कुंभ :** पैशाच्या बाबतीत आश्वासन देताघेताना सावधानता बाळगावी. मित्राशी वादविवादाचे प्रसंग टाळावेत. प्रयत्नांना यश संभवते.

**मीन :** प्रसंगी नियोजन करणे फायद्याचे ठरणारे आहे. अनपेक्षित यश पदरात पडेल. खर्चाचे प्रमाण वाढीव राहील.

# जयस्वालांच्या मानेवर तेलगीचे भूत? राज्य सरकारचे हायकोर्टात शपथपत्र

पान १ वरून

त्यावेळी एका माजी पोलीस अधिकाऱ्याने हायकोर्टात याचिका दाखल करून एखाद्या व्यक्तीवर न्यायालयाने ठपका ठेवला असताना अशा उच्च पदावर नियुक्ती कशी काय होऊ शकते असा सवाल केला होता. त्यानंतर आता राज्य सरकारनेही हे प्रकरण उचलून धरले आहे. त्यात त्यांनी याबाबतची याचिका निकाली काढण्याची विनंती मुंबई उच्च न्यायालयाला केली आहे. त्याबाबत तातडीने शपथपत्रही दाखल केले आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री आणि महाविकास आघाडी नेत्यांच्या काल झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे केंद्रीय यंत्रणा आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्ष टीपेला पोहोचला आहे. बनावट स्टॅम्प प्रकरणात तेलगीला २००१ मध्ये अटक झाली होती. २००६ मध्ये त्याला ३० वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. २०१७ मध्ये तेलगीचा कारागृहात मृत्यू झाला. त्यानंतर या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला होता. या खटल्यात पुणे मोक्का न्यायालयाने एसआयटीच्या तपासावर अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित केली होती. जयस्वाल यांच्या तपासात अनेक त्रुटी असल्याचे निरीक्षण नोंदवले होते. ते रद्द करण्याच्या मागणीसाठी जयस्वाल यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. आता ते सीबीआयचे संचालक आहेत. अनिल देशमुख प्रकरणात त्यांनी राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे आणि पोलीस महासंचालक संजय पांडे यांना चौकशीसाठी नोटीस बजावली आहे. राज्य सरकारनेही सायबर पोलिसांमार्फत फोन टॅपिंग प्रकरणी जयस्वाल यांना चौकशीसाठी समन्स बजावले आहे. या शीतयुद्धात राज्य सरकारने तेलगी प्रकरणात हायकोर्टात शपथपत्र दाखल केले आहे.

## महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध वीकली लॉटरी

सोडत सायं. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट किं. रु.20/- • सोडत दिनांक 20/10/2021

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- GL-03 : 1562

दुसरे बक्षिस रु. 1000/- सर्व मालिकांसाठी

| दुसरे बक्षिस रु. 1000/- सर्व मालिकांसाठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | 1342 | 2044 | 2529 | 3456 |
| | 1407 | 2046 | 2550 | 3533 |
| 1060 | 1473 | 2246 | 2707 | 3636 |
| 1086 | 1521 | 2248 | 2752 | 3731 |
| 1093 | 1631 | 2269 | 2977 | 3826 |
| 1166 | 1911 | 2377 | 3035 | 3896 |
| 1240 | 1995 | 2402 | 3387 | 3932 |

जिंकले! जिंकले!! आजच्या सोडतीत रु.1000x5 = रु.5000 ची अंदाजित 23 बक्षिसे जिंकली

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## अक्षय विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत दर बुधवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 33 | सोडत दिनांक 20/10/2021

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — AK-01 - 2045

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 2045

श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई
श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई
डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1323 | 3155 | 3414 | 5129 | 5615 | 5921 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1355 | 2714 | 3497 | 4440 | 5825 | 6227 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1761 | 3136 | 3379 | 3476 | 5910 | 6553 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 2376 | 2942 | 3100 | 3679 | 6387 | 6811 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| रु. 100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1678 | 2216 | 2629 | 3181 | 3597 | 3989 | 4441 | 4844 | 5264 | 5602 | 6068 | 6546 |
| | | 1685 | 2218 | 2652 | 3183 | 3627 | 4012 | 4450 | 4846 | 5267 | 5615 | 6089 | 6547 |
| 1001 | 1265 | 1719 | 2222 | 2653 | 3187 | 3647 | 4020 | 4452 | 4851 | 5287 | 5630 | 6105 | 6560 |
| 1009 | 1266 | 1743 | 2225 | 2672 | 3192 | 3648 | 4022 | 4454 | 4856 | 5298 | 5632 | 6127 | 6569 |
| 1011 | 1271 | 1744 | 2230 | 2709 | 3194 | 3657 | 4027 | 4455 | 4879 | 5299 | 5650 | 6147 | 6585 |
| 1015 | 1274 | 1747 | 2232 | 2715 | 3202 | 3682 | 4032 | 4460 | 4889 | 5314 | 5654 | 6160 | 6586 |
| 1022 | 1287 | 1803 | 2234 | 2726 | 3230 | 3684 | 4049 | 4462 | 4894 | 5321 | 5658 | 6165 | 6591 |
| 1027 | 1297 | 1812 | 2235 | 2727 | 3233 | 3700 | 4094 | 4467 | 4896 | 5359 | 5659 | 6187 | 6614 |
| 1043 | 1311 | 1817 | 2237 | 2739 | 3238 | 3703 | 4113 | 4475 | 4941 | 5361 | 5670 | 6218 | 6636 |
| 1047 | 1319 | 1878 | 2238 | 2749 | 3250 | 3704 | 4114 | 4490 | 4964 | 5386 | 5689 | 6223 | 6650 |
| 1061 | 1340 | 1906 | 2247 | 2754 | 3276 | 3720 | 4147 | 4495 | 4966 | 5390 | 5704 | 6236 | 6657 |
| 1091 | 1364 | 1912 | 2262 | 2768 | 3279 | 3722 | 4153 | 4499 | 4974 | 5392 | 5754 | 6239 | 6661 |
| 1095 | 1386 | 1917 | 2273 | 2782 | 3283 | 3737 | 4187 | 4508 | 4997 | 5399 | 5758 | 6253 | 6668 |
| 1105 | 1387 | 1928 | 2279 | 2800 | 3307 | 3773 | 4194 | 4512 | 4999 | 5403 | 5759 | 6261 | 6669 |
| 1106 | 1411 | 1935 | 2290 | 2802 | 3316 | 3780 | 4200 | 4536 | 5000 | 5405 | 5766 | 6269 | 6677 |
| 1116 | 1412 | 1971 | 2293 | 2821 | 3317 | 3800 | 4218 | 4566 | 5017 | 5409 | 5818 | 6272 | 6682 |
| 1118 | 1416 | 1991 | 2296 | 2824 | 3341 | 3803 | 4233 | 4599 | 5045 | 5427 | 5832 | 6275 | 6685 |
| 1120 | 1425 | 2002 | 2298 | 2834 | 3347 | 3804 | 4239 | 4603 | 5050 | 5445 | 5835 | 6286 | 6696 |
| 1124 | 1431 | 2003 | 2320 | 2837 | 3368 | 3811 | 4264 | 4613 | 5051 | 5450 | 5849 | 6320 | 6712 |
| 1141 | 1439 | 2025 | 2327 | 2857 | 3394 | 3833 | 4267 | 4615 | 5052 | 5451 | 5854 | 6347 | 6739 |
| 1147 | 1441 | 2026 | 2329 | 2863 | 3397 | 3834 | 4273 | 4620 | 5085 | 5482 | 5855 | 6356 | 6742 |
| 1154 | 1449 | 2029 | 2372 | 2872 | 3420 | 3838 | 4281 | 4623 | 5095 | 5491 | 5875 | 6370 | 6769 |
| 1156 | 1459 | 2052 | 2398 | 2883 | 3425 | 3849 | 4284 | 4659 | 5097 | 5492 | 5891 | 6376 | 6776 |
| 1162 | 1483 | 2079 | 2419 | 2892 | 3433 | 3866 | 4289 | 4661 | 5098 | 5502 | 5895 | 6378 | 6806 |
| 1163 | 1497 | 2092 | 2426 | 2922 | 3460 | 3875 | 4308 | 4664 | 5105 | 5503 | 5904 | 6383 | 6826 |
| 1179 | 1502 | 2100 | 2435 | 2928 | 3467 | 3877 | 4334 | 4673 | 5154 | 5506 | 5953 | 6391 | 6862 |
| 1182 | 1510 | 2112 | 2436 | 2942 | 3470 | 3879 | 4354 | 4708 | 5185 | 5507 | 5955 | 6413 | 6863 |
| 1183 | 1571 | 2137 | 2442 | 2977 | 3517 | 3899 | 4360 | 4709 | 5187 | 5508 | 5969 | 6420 | 6865 |
| 1190 | 1579 | 2144 | 2453 | 2988 | 3534 | 3903 | 4379 | 4749 | 5204 | 5517 | 5988 | 6426 | 6868 |
| 1191 | 1583 | 2152 | 2472 | 3003 | 3552 | 3928 | 4385 | 4774 | 5205 | 5530 | 6020 | 6448 | 6906 |
| 1194 | 1591 | 2167 | 2522 | 3010 | 3557 | 3931 | 4397 | 4785 | 5216 | 5538 | 6036 | 6470 | 6962 |
| 1211 | 1596 | 2169 | 2523 | 3012 | 3568 | 3934 | 4407 | 4790 | 5237 | 5544 | 6038 | 6478 | 6964 |
| 1218 | 1601 | 2185 | 2527 | 3090 | 3576 | 3942 | 4416 | 4813 | 5245 | 5549 | 6040 | 6481 | 6980 |
| 1220 | 1612 | 2201 | 2529 | 3099 | 3580 | 3947 | 4421 | 4814 | 5253 | 5575 | 6046 | 6496 | 6981 |
| 1237 | 1660 | 2209 | 2564 | 3102 | 3583 | 3961 | 4434 | 4828 | 5255 | 5581 | 6062 | 6529 | 6987 |
| 1264 | 1662 | 2210 | 2593 | 3166 | 3588 | 3983 | 4435 | 4840 | 5263 | 5593 | 6063 | 6536 | 6996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी | सोडत संध्या. 5:00

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 33 • तिकीट किं. रु.10/- • सोडत दिनांक 20/10/2021

पहिले बक्षिस रु. 10000/- MG-02 : 5427

सर्व मालिकांसाठी • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | जिंकले | बक्षिस |
|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2430 (रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली) | रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली — किशोर लॉटरी सेंटर, सांगली (5 बक्षिसे) |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3778 (रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली) | रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली — किशोर लॉटरी सेंटर, सांगली (5 बक्षिसे) |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 6651 (रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली) | रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली — पवार लॉटरी - ठाणे (5 बक्षिसे) |

पाचवे बक्षिस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. 400/- सर्व मालिकांसाठी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1698 | 2623 | 3263 | 4217 | 5422 | 5951 | 6611 |
| | | 1818 | 2643 | 3341 | 4508 | 5511 | 6039 | 6612 |
| | | 1949 | 2665 | 3360 | 4509 | 5520 | 6058 | 6628 |
| | 1192 | 2213 | 2834 | 3538 | 4775 | 5527 | 6096 | 6646 |
| 1014 | 1290 | 2235 | 2948 | 3634 | 4784 | 5548 | 6167 | 6744 |
| 1171 | 1321 | 2278 | 3060 | 3715 | 5018 | 5550 | 6320 | 6770 |
| 1183 | 1513 | 2327 | 3109 | 3843 | 5095 | 5650 | 6382 | 6876 |
| 1190 | 1621 | 2357 | 3128 | 4076 | 5256 | 5853 | 6509 | 6969 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गौरव मंथली लॉटरी

Draw No.44th Dt: 20-10-2021 4.00 pm Ticket Rs.50/-

| Prize | Result |
|---|---|
| 35 लाख 1st Prize Rs. | G31-4188 |
| 2nd Prize Rs. 10,000/- | G10-1037 G39-1201 G41-3236 G46-4912 G49-2327 |
| 3rd Prize Rs. 5,000/- | 4787 — 15 बक्षिसे जिंकली |
| 4th Prize Rs. 3,000/- | 5871 — 15 बक्षिसे जिंकली |
| 5th Prize Rs. 2,000/- | 1245 — 10 बक्षिसे जिंकली |
| 6th Prize Rs. 1,000/- | 1802 — 5 बक्षिसे जिंकली |


7th Prize Rs. 500/- Common to all Series

1115 1206 1674 3447 3976 4389 4640 4962 5444 5944

8th Prize Rs. 100/- Common to all Series

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1014 | 1276 | 1659 | 2027 | 2406 | 2740 | 3078 | 3348 | 3596 | 3858 | 4346 | 4797 | 5055 | 5420 | 5653 |
| 1015 | 1290 | 1663 | 2040 | 2408 | 2743 | 3089 | 3363 | 3598 | 3859 | 4348 | 4806 | 5056 | 5421 | 5677 |
| 1091 | 1308 | 1671 | 2052 | 2414 | 2749 | 3100 | 3376 | 3604 | 3876 | 4379 | 4814 | 5075 | 5428 | 5685 |
| 1096 | 1319 | 1680 | 2085 | 2417 | 2750 | 3107 | 3383 | 3616 | 3893 | 4394 | 4841 | 5085 | 5439 | 5705 |
| 1098 | 1331 | 1691 | 2112 | 2421 | 2765 | 3110 | 3384 | 3619 | 3909 | 4447 | 4847 | 5091 | 5440 | 5709 |
| 1101 | 1337 | 1712 | 2114 | 2422 | 2771 | 3133 | 3388 | 3622 | 3937 | 4450 | 4863 | 5112 | 5455 | 5726 |
| 1103 | 1359 | 1716 | 2148 | 2430 | 2780 | 3152 | 3392 | 3629 | 3943 | 4456 | 4864 | 5117 | 5456 | 5738 |
| 1111 | 1391 | 1746 | 2202 | 2459 | 2782 | 3163 | 3394 | 3635 | 3950 | 4461 | 4865 | 5120 | 5463 | 5743 |
| 1127 | 1399 | 1771 | 2203 | 2471 | 2791 | 3211 | 3399 | 3653 | 3979 | 4464 | 4877 | 5140 | 5493 | 5745 |
| 1149 | 1401 | 1791 | 2205 | 2472 | 2797 | 3230 | 3406 | 3672 | 3990 | 4467 | 4885 | 5151 | 5506 | 5751 |
| 1150 | 1403 | 1798 | 2215 | 2526 | 2801 | 3237 | 3409 | 3680 | 3996 | 4482 | 4890 | 5157 | 5510 | 5757 |
| 1151 | 1407 | 1805 | 2222 | 2542 | 2802 | 3253 | 3413 | 3688 | 4025 | 4489 | 4894 | 5160 | 5516 | 5765 |
| 1152 | 1421 | 1815 | 2223 | 2560 | 2819 | 3260 | 3424 | 3690 | 4043 | 4491 | 4922 | 5221 | 5519 | 5780 |
| 1153 | 1430 | 1838 | 2227 | 2561 | 2820 | 3263 | 3430 | 3700 | 4044 | 4495 | 4941 | 5244 | 5522 | 5788 |
| 1158 | 1441 | 1849 | 2252 | 2564 | 2821 | 3270 | 3434 | 3705 | 4077 | 4549 | 4952 | 5247 | 5533 | 5795 |
| 1164 | 1481 | 1856 | 2259 | 2574 | 2874 | 3276 | 3438 | 3720 | 4098 | 4554 | 4967 | 5266 | 5543 | 5798 |
| 1166 | 1514 | 1867 | 2268 | 2576 | 2878 | 3287 | 3441 | 3729 | 4105 | 4600 | 4974 | 5269 | 5550 | 5806 |
| 1172 | 1516 | 1886 | 2278 | 2582 | 2880 | 3288 | 3464 | 3739 | 4107 | 4610 | 4978 | 5292 | 5551 | 5819 |
| 1174 | 1526 | 1893 | 2287 | 2596 | 2881 | 3291 | 3472 | 3761 | 4111 | 4632 | 4981 | 5304 | 5552 | 5821 |
| 1179 | 1540 | 1912 | 2291 | 2607 | 2927 | 3292 | 3473 | 3764 | 4114 | 4641 | 4989 | 5316 | 5557 | 5824 |
| 1183 | 1548 | 1914 | 2309 | 2628 | 2951 | 3301 | 3479 | 3768 | 4129 | 4642 | 4996 | 5319 | 5562 | 5832 |
| 1189 | 1555 | 1931 | 2320 | 2641 | 2970 | 3305 | 3482 | 3800 | 4149 | 4644 | 5005 | 5321 | 5570 | 5835 |
| 1190 | 1560 | 1957 | 2357 | 2662 | 2972 | 3306 | 3487 | 3808 | 4171 | 4648 | 5013 | 5324 | 5575 | 5870 |
| 1191 | 1576 | 1959 | 2360 | 2670 | 3003 | 3315 | 3493 | 3830 | 4194 | 4699 | 5021 | 5332 | 5579 | 5885 |
| 1196 | 1584 | 1981 | 2361 | 2680 | 3007 | 3317 | 3499 | 3831 | 4210 | 4701 | 5031 | 5362 | 5583 | 5925 |
| 1231 | 1595 | 1990 | 2371 | 2682 | 3021 | 3323 | 3510 | 3832 | 4254 | 4705 | 5033 | 5365 | 5586 | 5950 |
| 1234 | 1601 | 1998 | 2384 | 2683 | 3038 | 3333 | 3529 | 3833 | 4277 | 4725 | 5046 | 5371 | 5588 | 5956 |
| 1242 | 1606 | 2016 | 2396 | 2685 | 3039 | 3336 | 3532 | 3834 | 4280 | 4740 | 5051 | 5404 | 5595 | 5976 |
| 1247 | 1617 | 2022 | 2401 | 2693 | 3069 | 3341 | 3540 | 3853 | 4307 | 4753 | 5053 | 5409 | 5612 | 5987 |
| 1271 | 1628 | 2026 | 2404 | 2721 | 3073 | 3342 | 3571 | 3856 | 4313 | 4774 | 5054 | 5415 | 5626 | 5994 |

Check result with Official Gazette. Issued by : Director, Maharashtra State Lottery



राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज (दि. २०) उत्तराखंड येथील पवित्र तीर्थस्थान केदारनाथ मंदिर येथे भेट देऊन भगवान केदारनाथाचे दर्शन घेतले.

# अर्जेंटिनाने जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती गोठवल्या

■ ब्युनस आयर्स

**सुट्ट्यांचा** सिझन आणि नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुका लक्षात घेऊन अर्जेंटिना सरकारने १,४३२ जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गोठवल्या आहेत. ७ जानेवारी २०२२ पर्यंत त्या कायम राहणार असल्याचे अर्जेंटिना सरकारने म्हटले आहे.

**७ जानेवारी २०२२ पर्यंत किंमती कायम**

कंपन्या आणि सुपर मार्केटला ९०० पेक्षा जास्त वस्तूंचा पुरवठा केला जातो. त्यांच्या किमतीबाबत सरकार आणि कंपन्या यांच्यात काही दिवस चर्चा सुरू होती. त्यानंतर याबाबतच्या करारावर मंगळवारी स्वाक्षरी करण्यात आली. यामुळे सोयाबीन निर्यातीवर तात्पुरती बंदी घातली आहे. त्यामुळे तेथील रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. अर्जेटिनातील नागरिक सध्या बिकट परिस्थितीतून जात आहेत. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे. राष्ट्राध्यक्ष अल्बर्टो फर्नांडिस यांच्या आघाडीला पुढील महिन्यात कठीण मध्यावधी निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. त्यादृष्टीने हा निर्णय घेतला असल्याचे वाणिज्य सचिव रॉबर्टो फेलेट्टी यांनी सांगितले.

# चीनमध्ये आता मुलांच्या चुकांची शिक्षा पालकांना!



**ची**नमधील 'नॅशनल पीपल्स काँग्रेस'च्या स्थायी समितीच्या सत्रात या प्रस्तावित कायद्याच्या मसुद्यावर चर्चा होईल आणि त्यानंतर कायदा पारित करण्यात येईल. 'नॅशनल पीपल्स काँग्रेस'चे प्रवक्ते झांग तिइवेई यांनी सांगितले की, 'किशोरवयीन मुलांच्या गैरवर्तनाची अनेक कारणे असतात. त्यातील मुख्य कारण म्हणजे मुलांना कुटुंबाकडून मिळणारे अयोग्य शिक्षण किंवा कुटुंबाकडून शिक्षणच न मिळणे हे होय. मुलांना समाजाच्या दृष्टीने चांगला नागरिक म्हणून घडवणे ही कुटुंबाची जबाबदारी आहे त्यामुळे आम्ही हा कायदा करीत आहोत. या कायद्यामुळे मुलांकडून गैरवर्तवणूक होणार नाही, याची काळजी पालक घेतील. सध्या आम्ही या कायद्यासंदर्भात पालकांशी चर्चा करत आहोत. त्यानुसार विधेयकात काही आवश्यक बदल करण्यात येतील. चीनमधील संसदेच्या स्थायी समितीकडून या कायद्याची समीक्षा केली जाईल आणि या समितीने मंजुरी दिल्यानंतर याचे कायद्यात रुपांतर होईल', असेही त्यांनी सांगितले.

**मुलांच्या हातून एखादी चूक झाली तर पालक त्यांना हक्काने ओरडतात, गरज पडली तर एखादा धपाटाही घालतात. जगातील अनेक देशात असेच चित्र पाहायला मिळत असेल मात्र आता याच्या उलट चित्र चीनमध्ये बघायला मिळणार आहे. कारण चीनमध्ये जर मुले चुकली तर त्या चुकीची शिक्षा थेट पालकांना होऊ शकणार आहे. चीनमध्ये कुटुंब शिक्षण प्रोत्साहन कायद्याच्या प्रस्तावित मसुद्यात याबाबत भूमिका मांडण्यात आली आहे. यानुसार मुलांनी गैरवर्तन केल्यास पालकांना शिक्षा देण्याची तरतूद करण्याचा विचार असून या कायद्यावर सध्या चर्चा सुरू आहे.**

चीनमधील या नव्या प्रस्तावित कायद्याप्रमाणे एखाद्या मुलाने किंवा मुलीने खूप वाईट वर्तन केले किंवा गुन्हा केला तर या कृत्यासाठी पालकांच्या संगोपनाला जबाबदार धरले जाईल आणि त्यांना शिक्षा सुनावण्यात येईल. १६ वर्षांच्या वयापेक्षा कमी वयाची मुलांनी गुन्हा केला किंवा वाईट वर्तन केले तर चीनमधील सरकारी अधिकाऱ्यांना या पालकांना शिक्षा देण्याचा अधिकार असेल. गुन्ह्याच्या गांभीर्याप्रमाणे या शिक्षांचे स्वरूप ठरवण्यात येईल. गुन्ह्याचे स्वरूप जास्त गंभीर नसेल तर पालकांना ताकीद देऊन सोडण्यात येईल. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात पालकांना सुमारे १०-१५ हजारांचा दंड होऊ शकेल किंवा पाच दिवसांसाठी कोठडीत ठेवले जाऊ शकेल आणि गुन्ह्याचे स्वरूप अति गंभीर असल्यास पालकांना दंड आणि कोठडीसोबत चीनच्या शिक्षण मंत्रालयाने विकसित केलेल्या 'कुटुंब शिक्षण मार्गदर्शन कार्यक्रमात' सहभागी व्हावे लागेल.

चीनच्या सरकारने यावेळी मुलांना देण्यात येणारा गृहपाठ आणि शाळेनंतरच्या शिकवण्या याकडेही मोर्चा वळवला आहे. या दोन्हींच्या वेळांमध्ये त्यांनी मोठी कपात करण्याचे ठरवले आहे. मुलांना विश्रांती, खेळ आणि व्यायाम करण्यासाठी वेळ देता यावा यासाठी सुट्टीच्या दिवसांत किती गृहपाठ द्यावा यावर बंधने लादण्यात आली आहेत. त्याशिवाय आठवड्याच्या शेवटी आणि सुट्ट्यांमध्ये शाळेनंतर घेण्यात येणाऱ्या शिकवण्यांवरही बंदी घालण्यात आली आहे. सुट्ट्यांमधील गृहपाठ कमी केल्याने आणि शनिवार-रविवारी शिकवण्यांना सुट्ट्या देणे बंधनकारक केल्याने मुलांच्या मनावर अभ्यासामुळे येणारा ताण कमी होईल असा विचार यामागे करण्यात आल्याची भूमिका सरकारकडून मांडण्यात आली आहे.

किशोरवयीन मुलांसंदर्भात कायदे करण्याची चीनची ही काही पहिली वेळ नाही. यापूर्वीही असे अनेक कायदे बनवण्यात आले आहेत. नुकतेच चीनच्या शिक्षण मंत्रालयाने मुलांच्या ऑनलाईन गेम खेळण्यावर निर्बंध लादले होते. नव्या नियमांनुसार मुलांना केवळ शुक्रवार, शनिवार आणि रविवारीच १ तास ऑनलाईन गेम खेळता येतील असे जाहीर करण्यात आले होते.

# कोणाचाही दबाव सहन न करता अनधिकृत बांधकामांवर कारवाई करा! मुख्यमंत्र्यांचे महापालिकेला निर्देश

■ मुंबई

**अनधिकृत** बांधकामे सहन केली जाणार नाहीत. अनधिकृत बांधकामांवर मुंबई पालिकेने युद्ध पातळीवर तातडीने कारवाई करावी, यामध्ये कोणाचाही दबाव सहन करू नका, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत अशा स्पष्ट शब्दांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबई महानगरपालिकेच्या बैठकीत निर्देश दिले. पूर्व आणि पश्चिम महामार्गालगत देखील मोठ्या प्रमाणावर डेब्रिज टाकल्या जातात असे निदर्शनास आले आहे, याठिकाणी कॅमेरे लावून जे हे करीत असतील त्यांच्यावर तातडीने कारवाई करा, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. बुधवारी दूर दृश्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत पालिका आयुक्त इक्बालसिंग चहल, सहायक आयुक्त, उपायुक्त, प्रभाग अधिकारी, पालिका रुग्णालयांचे वैद्यकीय अधिष्ठाता तसेच टास्क फोर्सचे सदस्य देखील उपस्थित होते.



कोविडमध्ये आपण खूप चांगली कामगिरी केली आहे. आता रस्ते, पदपथ, स्वच्छता, नागरी सुविधांच्या बाबतीत पूर्णपणे लक्ष केंद्रित करून कालबद्ध रीतीने ती कामे पूर्ण करा आणि मुंबई शहराचा देशात आदर्श निर्माण करा. आपल्याला शहर सुंदर आणि उच्च दर्जाच्या सुविधा असलेले करायचे आहे. त्यामुळे रस्ते, पदपथ, दुभाजक, रस्त्यांच्या कडेचे कठडे, बागा-उद्याने सुंदर आणि व्यवस्थित असतील हे पाहण्याचे काम व पूर्ण करा. रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम प्राधान्याने पूर्ण झाले पाहिजे, त्यासाठी कालमर्यादा ठरवून द्या असेही मुख्यमंत्री म्हणाले.

कोविड लढाईत मुंबई मॉडेलची प्रशंसा झाली . आपल्या प्रयत्नांमुळे ते शक्य झाले आहे, टीमवर्क म्हणून आपण स्वतः:ला सिद्ध केले आहे, पण एवढ्यावर न थांबता आता आपल्याला नागरी सुविधांवर लक्ष्य केंद्रित केले पाहिजे. ज्याप्रमाणे आपण दररोजच्या स्वच्छतेसाठी प्रभागनिहाय पथके नेमलेली असतात त्याप्रमाणे डेब्रिजसाठी देखील पथके नेमावीत व बांधकामाचा कचरा, दगड-विटा माती लगेचच्या लगेच कसा उचलता येईल हे पाहावे असेही मुख्यमंत्री म्हणाले. दिवाळी येते. एकीकडे कोविडचा धोका अजूनही संपलेला नाही. युकेमध्ये कोविड संसर्गात परत वेगाने वाढ दिसते आहे. तिथे परत रुग्णालये रुग्णांनी भरत आहेत, मी तेथील काही डॉक्टर्सशी सुद्धा बोललो असून आपल्याला देखील काळजी घ्यावी लागेल. पावसाळा संपत असताना मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया या साथीच्या आजारांनी देखील डोके वर काढले असून आपण अतिशय काळजीपूर्वक हे रोग पसरण्यापासून रोखले पाहिजेत. त्यादृष्टीने सर्व प्रकारची जनजागृती देखील करा आणि डासांचा नायनाट प्रभावीपणे होईल, अस्वच्छता राहणार नाही हे पाहण्याच्या सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

# विधान परिषदेच्या ८ जागांसाठी मोर्चे बांधणी

■ मुंबई

**विधान** परिषदेवर राज्यपाल नियुक्त १२सदस्यांचा मुद्दा जरी लटकलेला असला तरी स्थानिक स्वराज्य संस्था मधून विधान परिषदेवर निवडून देण्याच्या आठ जगासाठी डिसेंबरमध्ये निवडणूक होणार असून त्यासाठी सत्ताधारी महा विकास आघाडीसह भाजपने सुद्धा मोर्चे बांधणी सुरू केली आहे.

विधान परिषदेतील स्थानिक स्वराज्य संस्था मधून निवडून गेलेल्या आठ सदस्यांची मुदत २२जानेवारीला संपत आहे यामध्ये सोलापूर,कोल्हापूर, धुळे,नंदुरबार,वाशिम,नागपूर नगर आदी आठ जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश आहे सध्या या स्थानिक स्वराज्य संस्था मधील सदस्यांची यादी तयार करण्याचे काम सुरू असून या निवडणुकीसाठी बरेच नगरसेवक इच्छुक असल्याने त्यांनी आतापासूनच फिल्डींग लावायला सुरुवात केली आहे.

सध्या या आठही स्थानिक स्वराज्य संस्था पैकी धुळे आणि नागपूर वगळता अन्यत्र महा विकास आघाडीचा वरचष्मा आहे त्यामुळे दिवाळीनंतर उमेदवार निश्चित करण्याबाबत महा विकास आघाडीतील तिन्ही पक्षांच्या नेत्यांची बैठक होईल व त्यानंतर महाविकास आघाडीतील चित्र स्पष्ट होईल

# महापालिका सभेला खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची हजेरी! गॅलरीत बसून नगरसेवकांवर 'वॉच'

■ पिंपरी, प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड** महापालिकेची आगामी निवडणूक तीन



महिन्यांवर येऊन ठेपली तरी विरोधात असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आक्रमक होत नसल्याच्या तक्रारी केल्या जात आहेत.

त्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या होत असलेल्या आजच्या ऑफलाइन सर्वसाधारण सभेला शिरूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी अचानक हजेरी लावली आणि नागरिकांच्या कक्षात बसून सभागृहात पक्षाचे नगरसेवक विरोधात बोलतात की नाही हे पाहण्यासाठी डॉ कोल्हे यांनी वॉच ठेवला.

महापालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी २०२२ मध्ये होणार आहे. त्याची आचारसंहिता डिसेंबरच्या शेवटच्या किंवा जानेवारी २०२२ च्या पहिल्या आठवड्यात लागू शकते. त्यामुळे आजची सभा धरून केवळ तीन सर्वसाधारण सभा होतील. त्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या होत असलेल्या आजच्या ऑफलाइन सर्वसाधारण सभेला शिरूरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी अचानक हजेरी लावली. त्यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे सुद्धा उपस्थित होते.

# डेंग्यूवर औषध वैज्ञानिकांना यश

**नवी दिल्ली :** वैज्ञानिकांना डेंग्यूवर देखील औषध शोधण्यात यश आलंय. लवकरच या औषधांची रुग्णांवर चाचणी होणार आहे. देशभरातल्या २० केंद्रांमध्ये जवळपास १० हजार रुग्णांवर या औषधाची चाचणी करण्यात येणार आहे. ज्यात मुंबई, ठाणे, पुणे, औरंगाबाद या केंद्रांचा समावेश आहे. मात्र मुंबईतल्या सन फार्मा कंपनीनं डेंग्यूवर यशस्वी औषधाची निर्मिती केलीय. त्याला डिसीजीआय या औषधाच्या क्लिनिकल ट्रायल हिरवा कंदील दिला आहे. डेंग्यूवर आतापर्यंत ठोस असं औषध नसल्यानं अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत. अठरा वर्षांहून अधिक वय असणाऱ्या डेंग्यूच्या रुग्णाला हे औषध देता येईल.

# ईडी हा विषय आता नेहमीचाच पटोलेंचे चंद्रकांत पाटलांना उत्तर

■ मुंबई

**नुकतेच** भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी नांदेडमधील बड्या नेत्यावर ईडीची कारवाई होणार असल्याचे वक्तव्य केले होते. त्यानंतर अशोक चव्हाण यांनी पाटलांना प्रत्युत्तर दिले होते. आता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पाटलांच्या वक्तव्याला जोरदार उत्तर देत म्हणाले की, जनतेच्या मूळ प्रश्नांना बगल देण्यासाठी हा प्रकार केला जात असून ईडी विषय आता नेहमीचा झाला आहे. त्याला घाबरण्याचे कारण नाही.

पुढे नाना पटोले म्हणाले की, काँग्रेस ईडीला घाबरणार नाही. आम्ही जनतेच्या प्रश्नावर केंद्र सरकारविरोधात लढत राहणार. स्वीस बँकेत काळा पैसा वाढला आहे. हे पैसे भाजपच्या लोकांचे आहेत का? सगळे चोर आणि हे साव अशी भूमिका भाजपवाले घेत आहेत. लोक आता त्याला हसत आहेत. अमित शहांच्या मुलाचे उत्पन्न एका वर्षात ९ हजार पटीने वाढले असेल तर मोदींच्या बाजूला बसणाऱ्या अमित शहा यांनाच भीती वाटायला हवी, तसेच राजीनाम्याबाबत सचिन सावंत यांचे पत्र मला आलेले नसून त्यांच्यासोबत चर्चा करू. त्यांची नाराजी असली तर बसून ती दूर करण्याचा प्रयत्न करू, असे पटोले म्हणाले. गेल्या ७ वर्षात देश ५० वर्षे मागे गेला आहे. आज देश धोक्यात आहे. चीनचे आक्रमण होत असताना त्याबाबत कोणतंही भाष्य सरकार करत नाही. त्यामुळे हे सरकार चीनचे दलाल आहेत का? असा खोचक सवाल पटोले यांनी केला.

# गीता गोपीनाथ आयएमएफच्या मुख्य अर्थतज्ज्ञपदाचा राजीनामा देणार

**वाशिंगटन-** अर्थशास्त्रज्ञ गीता गोपीनाथ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (आयएमएफ) मुख्य अर्थतज्ज्ञपदाचा येत्या जानेवारी महिन्यात राजीनामा देणार आहेत. याबाबत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पत्रक जारी करून माहिती दिली असून गीता या परत हार्वर्ड विद्यापीठात जाणार आहेत. त्यांचा जन्म म्हैसूरचा असून त्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मुख्य अर्थतज्ज्ञ पदावर २०१९ मध्ये रुजू झाल्या होत्या.त्यापूर्वी त्या हॉर्वर्ड विद्यापीठात जॉन इवान्स्त्र आंतरराष्ट्रीय अभ्यास आणि अर्थशास्त्राच्या प्राध्यापक होत्या. हॉवर्डने त्यांना एक वर्ष रजा वाढवून ३ वर्ष आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये सेवा देण्याची संधी दिली होती.आता आयएमएफचे व्यवस्थापकीय संचालक क्रिस्टलिना जॉर्जिएवा यांनी गीता यांच्यानंतर यापदासाठी लवकरच कर्मचाऱ्याचा शोध घेतला जाणार असल्याची घोषणा केली आहे. तसेच गीता यांच्या कामाचे कौतुक देखील केले आहे. कोरोना महामारीच्या काळात गीता यांनी महत्वपूर्ण विश्लेषणाचे काम केले.असून आयएमएफच्या सर्वोच्च अर्थतज्ज्ञ म्हणून काम करणाऱ्या त्या पहिल्या महिला आहेत.

# लस घेतलेल्यांना करात सूट लस घेतली नाही तर गावात बंदी

## सुकेणे ग्रामपंचायतीचा धाडसी निर्णय

■ नाशिक

**कोविडचा** संसर्ग रोखण्यासाठी सध्या संपूर्ण राज्यात लसीकरणावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. कारण तिसऱ्या लाटेची तीव्रता कमी असेल पण संभाव्यता अजूनही नाकारली गेली नसल्याने लसीकरण मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर कोरोना प्रतिबंधक लस जर घेतली नाही तर गावात फिरु देणार नाही, असा डॅशिंग निर्णय निफाड तालुक्यातील कसबे सुकाणे या ग्रामपंचायतीने घेतला आहे.



निफाड तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कोरोना बाधितांची संख्या वाढत असल्या कारणाने लसीकरण गरजेचे आहे. याकरता कसबे सुकेणे या ग्रामपंचायतीने हा धाडसी निर्णय घेतला असल्याचे समजते. कसबे सुकेणे या ग्रामपंचायतीने डॅशिंग निर्णय घेताना स्पष्टीकरण दिले आहे की, गावातील जे ग्रामस्थ लस घेणार नाही, त्यांना गावात फिरु दिले जाणार नाही तसेच बाहेरगावाहून येणाऱ्या नागरिकाचे सुद्धा लसीकरण अनिवार्य असल्याचे ग्रामपंचायतीने सांगितले आहे. गावातील जे नागरिक लस घेणार नाही त्यांना गावात फिरु दिले जाणार नसून गावातील ज्या कुटुंबाने आपल्या घरातील सर्व सदस्यांचे लसीकरण केले असेल अशा कुटुंबांना पाणीपट्टी व घरपट्टीच्या व्याजात व दंडामध्ये सूट देण्यात येणार आहे, असा खास निर्णयही देखील कसबे सुकेणे या ग्रामपंचायतीने घेतला आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतीने लसीबाबत जो निर्णय घेतला आहे असाच निर्णय महाराष्ट्रातील सर्वत्र घेण्यात आला तर नक्कीच कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होऊन कोरोना हद्दपार होऊ शकतो, अशा प्रतिक्रिया लोकांमधून येत आहेत

# परमबीर सिंह कुठे आहेत माहिती नाही राज्य सरकारचे उच्च न्यायालयात उत्तर

**मुंबई :** माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्यावरही एट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, परमबीर सिंह नेमके कुठे आहेत, याची माहिती कोणालाही नसल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होऊ शकलेली नाही. त्यांनतर आता राज्य सरकारने देखील यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान परमबीर सिंह यांच्यावरच्या कारवाईसंदर्भात भूमिका स्पष्ट केली आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपूर्वी तर परमबीर सिंह फरार असल्याचा संशय देखील तपास यंत्रणांना असल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे आता यासंदर्भात परमबीर सिंह यांच्यावर कारवाई न करण्याचे आश्वासन आता पाळले जाणार नसल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. त्यांच्या विरोधात समन्स बजावून देखील ते समोर आलेले नाहीत. त्यामुळे ते बेपत्ता असल्याचा निष्कर्ष राज्य सरकारने आज न्यायालयासमोर मांडला आहे. मात्र, परमबीर सिंह यांची बाजू कोर्टासमोर मांडणारे वकील महेश जेठमलानी यांनी मात्र, त्यांना अजून फरार घोषित करण्यात आलेले नसल्याचे यावेळी सांगितले आहे.

# अंधेरीच्या आझाद नगरातील पाण्याची टाकी अनेक वर्षे कोरडी! म्हाडाचे लाखो रुपये वाया

■ मुंबई

**म्हाडाने** लाखो रुपये खर्चून गेले काही वर्षांपूर्वी अंधेरी (पश्चिम) आझाद नगर क्रमांक ३ या वसाहतीतील रहिवाशांसाठी भूमिगत पिण्याच्या पाण्याची टाकी बांधली आहे. टाकीला जलवाहिन्याही जोडण्यात आल्या आहेत. पण टाकी पाण्याविना कोरडी धूळखात पडून आहे. म्हणजे या टाकीच्या बांधकामावर खर्च केलेले लाखो रुपये वाया गेले आहेत. येथील रहिवाशांना आझाद नगर क्रमांक २ मध्ये असलेल्या टाकीच्या पाण्यावर आपली तहान भागवावी लागत आहे, अशी माहिती स्थानिकांनी दिली.

या वसाहतीतील रहिवाशांना मुबलक पिण्याचे पाणी मिळावे यासाठी म्हाडाने येथे पाण्याची टाकी बांधली आहे. पण टाकी पाण्यावाचून रिकामी आहे. टाकीच्या बांधकामाची ही दयनीय अवस्था झाल्याचे दिसून येत आहे. या टाकीला पाणी पुरवठा होईल यासाठी म्हडाने इतक्या वर्षात प्रयत्न का केले नाहीत? हे न सुटणारे कोडे आहे, असे रहिवाशांचे म्हणणे आहे.

या संदर्भात म्हाडाच्या कार्यकारी अभियंता विभागाशी संपर्क साधला असता तिथून वरील माहितीला दुजोरा देत असे सांगितले की, टाकीबाबत स्थानिक आमदार साटम यांनी ही तक्रार करून म्हाडाचे लक्ष वेधले आहे. या टाकीचे पुढे काय करायचे? हा निर्णय लवकरच घेतला जाणार आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# दृष्टिकोनाचे दुर्दैवी दारिद्र्य

लोकव्यवहारामध्ये दृष्टिकोन किंवा इंग्लिशमध्ये ज्याला आपण व्हिजन म्हटले जाते हे शब्द वारंवार वापरले जातात. परंतू प्रत्यक्ष व्यवहारामध्ये त्याचे प्रत्यंतर येत नाही. एखाद्याकडे व्हिजन असणं आणि ते प्रत्यक्षात आणणं यात बराच मोठा फरक पडतो. सरकारी कारभारात तर याचा वारंवार अनुभव येतो. ज्या लोकशाही व्यवस्थेत आपण राहतो तिथे जनसामान्यांचे कल्याण किंवा त्यांच्या सोयीसुविधांची पूर्तता याला सर्वाधिक प्राधान्य दिले गेलेले आहे. मात्र याबाबतची ध्येय-धोरणे आखताना बराच गोंधळ पाहायला मिळतो. ही ध्येय-धोरणे आखण्याकरिता सनदी अधिकाऱ्यांचा मोठा फौजफाटा तैनात केलेला असतो. प्रशासन कसे करावे प्रशिक्षण देऊन त्यांच्या नियुक्त्या होत असतात. त्या प्रशासनाच्या अंमलबजावणी करिता एका विशिष्ट दृष्टिकोनाची आवश्यकता असते.

म्हणजे काय तर नियोजनपूर्वक कमी खर्चामध्ये अधिकाधिक लोकांना त्याचा लाभ होईल अशा प्रकारची दूरदृष्टी असणे हे दृष्टिकोनाचे लक्षण मानले जाते. भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे होत आहेत. परंतु जगाच्या तुलनेत आपण विकसित राष्ट्र म्हणून मान मिळवू शकलो नाही. आपण अजूनच विकसनशीलच आहोत याचे कारण सामान्य जनतेच्या विकासाचा किंवा देशाच्या उन्नतीचा समर्पक दृष्टिकोनच ठेवला गेलेला नाही.

**निरक्षरता आणि गरीबी**

दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या ४० टक्क्यांच्या वर आहे. निरक्षर लोकांची संख्या तेवढ्याच प्रमाणात अजूनही आहे. अनेक खेड्यांमध्ये किमान सोयी सुविधाही पोहोचलेल्या नाहीत. शाळा, शुद्ध पिण्याचे पाणी, आरोग्य यंत्रणा यांची मोठी कमतरता जाणवते. म्हणूनच लोक शहरांकडे धाव घेतात आणि शहरांमधील आहे त्या सोयीसुविधांवर मोठा ताण पडतो. बऱ्याच वेळेला आपण आपली तुलना अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांशी करतो. परंतु भारतातल्या झोपडपट्ट्यांची संख्या आणि खेडेगावात असलेले गरिबीचे प्रमाण अधिक चिंताजनक ठरते. शहरांमधली परिस्थिती तर आवाक्याबाहेर जाऊ लागली आहे. आज भारतातील कोणतेही शहर घ्या त्यातला ५० टक्के भाग झोपडपट्ट्यांनी व्यापला असल्याचे पाहायला मिळते. झोपडपट्ट्या आणि अस्वच्छता जागोजागी दिसून येते. अगदी मुंबईसारख्या महानगरातसुद्धा प्रचंड असणारी गर्दी आणि सोयी सुविधांवर पडणारा ताण अनेक वेळेला असह्य होतो. वाहतूक व्यवस्था, वाहनांची प्रचंड संख्या, पावसाळ्यात मुंबई जलमय होण्याचा प्रकार या सगळ्या गोष्टी दृष्टिकोनाचा अभाव असल्याचे निदर्शक ठरतात. अलीकडे मुंबईतील खड्ड्यांविषयी बरीच चर्चा ऐकायला मिळते. म्हणूनच या दृष्टिकोनाविषयी हे छोटेसे आणि सोपे उदाहरण म्हणून या खड्ड्यांच्या प्रकारांकडे पाहता येईल. गेल्या आठवड्यात महापालिकेकडून एक परिपत्रक जारी झाले आणि त्यात महिनाभरात किती खड्डे बुजवले गेले याची आकडेवारी सांगितली गेली आहे. खड्ड्यांची संख्या सांगण्यामध्ये महापालिकेची कार्यक्षमता सिद्ध होत असेल तर दृष्टिकोनाचा किती मोठा अभाव आहे हे सहज लक्षात येते. ते म्हणजे ज्या आंतरराष्ट्रीय महानगरीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे रस्ते अपेक्षित आहेत तिथे खड्डे मोजून आणि ते बुजवण्याचे सांगून महापालिका आपल्या कार्यक्षमतेचा डंका पिटत असेल तर ते दुर्दैव ठरते. ही परिस्थिती मुंबई महापालिकेची आहे. गुजरात राज्याला आपण विकासाचे मॉडेल समजतो. तिथेसुद्धा २५ टक्क्यांपेक्षा जास्त निरक्षरतेचे प्रमाण आहे. अहमदाबाद, बडोदा अशा मोठ्या शहरांच्या बकालपणाचा तोच नमुना पाहायला मिळतो. दिल्ली देशाची राजधानी मानली जाते. परंतु जुन्या दिल्लीचे चित्र डोळ्यासमोर आणले तर इतके गलिच्छ शहर आणखी असूच शकत नाही असे वाटायला लागते. त्यामानाने मुंबईची धारावी झोपडपट्टी बरी आहे असे म्हटले तरी चालू शकते. कर्नाटकासारखे राज्य केरळ सारखे राज्य साक्षरतेमध्ये आघाडीवर असल्याचे वारंवार सांगितले जाते. परंतु तिथे सुद्धा आरोग्य व्यवस्थेचे आणि सार्वजनिक स्वच्छतेचे तीन तेरा वाजतात. कर्नाटक मधील बंगलोर शहर हे आता नागरी समस्यांचे सागर बनल्याचे जग जाहीर झालेले आहे. जे शहर सिलिकॉन व्हॅली सारखे म्हणजेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात सर्वाधिक रोजगार देणारे शहर म्हणून गणले जाते, म्हणजेच जिथे दोन मिनिटात माहितीची देवाण-घेवाण होऊ शकते तिथे शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्याकरता चार ते पाच तासांचा कालावधी खर्च करावा लागतो. पर्यावरण हा जागतिक समस्येचा जरी भाग असला तरी कर्नाटकामध्ये बेकायदेशीरपणे खाण उद्योग चालवला जातो आणि सगळ्या पर्यावरणाचे तीन तेरा वाजतात ही सगळी उदाहरणे यासाठीच महत्त्वाची ठरतात.

**लोककल्याणाबाबतची उदासिनता**

आपण स्वतःला कितीही विकसनशील म्हणून घेत असलो तरी हे धोरणांच्या आखणीमध्ये नियोजनामध्ये किंवा त्याच्या अंमलबजावणीमध्ये कमालीचे मागासलेपण असल्याचे आपल्याला दिसून येते. आणि याचे महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यकर्ते असो किंवा नोकरदार असोत हे सगळे लोक धोरणांची आखणी करताना सामान्य माणसाच्या कल्याणाचा दृष्टिकोन ठेवत नाहीत. त्यांना स्वार्थ महत्त्वाचे वाटत असतात आणि या स्वार्थाच्या संकुचित विचारांमधून नको ती धोरणे आखली जातात. किंबहुना ती लादली जातात. त्याचे अनेक दुष्परिणाम लोकांना सहन करावे लागत असतात. भारतात पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याकरता लाखो कोटी रुपये खर्च होत आहेत. प्रचंड मोठे रस्ते सध्या बांधले जात आहेत. या रस्त्यांची आवश्यकता आहे हे खरे. रस्त्यांमुळे दळणवळण वेगाने होते. पर्यटनाला चालना मिळते. उद्योग व्यवसायांना एक नवी संधी प्राप्त होते. या सगळ्या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी सुद्धा या रस्त्यांच्या वापराकरिता दहा मैलावर घेतला जाणारा टोल हा प्रकार खंडणीसारखा किंवा जिझिया करासारखाच म्हणावा लागतो. यातला फरक असा आहे की महाराष्ट्रात साध्या मुंबई-पुणे एक्सप्रेस महामार्गावर तीन टोल नाके लागतात. परंतु उत्तर भारतात दिल्ली ते मेरठ या अतिशय उत्तम दर्जाच्या महामार्गावर फक्त एक टोलनाका लागतो हा फरक असल्याने इथेसुद्धा दृष्टिकोनाचा अभाव हे एकमेव कारण ठरते. ज्या नितीन गडकरींनी रस्ते बांधकामांमध्ये एक नवी दिशा दाखवली त्यांच्याच नेतृत्वाखाली देशाच्या अनेक भागांमध्ये रस्त्यांच्या वापरासंदर्भात प्रचंड फरक पाहायला मिळतो. त्यातही काही ठिकाणी घेतला जाणारा प्रचंड टोल या धोरणाची सर्वात मोठी शोकांतिका ठरते. पंचवीस पंचवीस वर्षे टोल वसूल होत राहणे हे सामान्य लोकांच्या खिशातील पैसा परवडण्यासारखे ठरते. म्हणूनच असे वारंवार सांगावे लागते की सामान्य माणसाच्या कल्याणाचा विचारच केला जात नाही आणि तो दृष्टिकोन नसल्यामुळेच आज आपण जगाच्या बरोबरीने जाऊ शकत नाही.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

समोरच्याला आदर देणं ही सर्वात मोठी भेट असते आणि समोरच्याकडून आदर मिळविणे हा सर्वात मोठा सन्मान असतो.

## पंचांग

गुरुवार २१ ऑक्टोबर, २०२१
शक १९४३ प्लवनामसंवत्सर

* आश्विन कृष्ण प्रतिपदा * नक्षत्र -अश्विनी

रवी उदय- ०६-३६,
रवी अस्त- १८-११



-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मेष

कृषिभूमी पूजन

मुद्रक, प्रकाशक **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **सौ.जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे**

संपर्क : २३८८०९८१, जाहिरात :८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५, वितरणः २३८२४४६६,
ई-मेल navakal.1923@gmail.com
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Jayshree Ramakant Khadilkar Pande**

## कविता...

### शिकवणारं मास्तर अन् मोफत शाळा हवी



नको नवी पुस्तकं, नको पाटी नवी
शिकवणारं मास्तर अन् मोफत शाळा हवी
दोन वेळचं जेवण, मिळतंय कसबसं
सरकारी शाळंत पण, मोबाईलची गरज नवी
रस्त्याच्या दिव्यावर, शिकताव सरकार मायबाप
शिकवणारं मास्तर अन् मोफत शाळा हवी
सगळं मिळतंय ऑनलाईन, भावनांना स्पर्श नाही
सुख दु:ख वाटून घ्यायला, दोस्तांची सोबत हवी
बंद खोलीत शिकली जरी, घडणार कशी पिढी
शिकवणारं मास्तर अन् मोफत शाळा हवी
झाल्या शाळा बंद, भीतीनं महारोगाच्या
काळजी जशी जीवाची, तशी शिक्षणाची हवी
गरीबीनं होते उपासमार, नका हिरावू शिक्षण
शिकवणारं मास्तर अन् मोफत शाळा हवी
नको नवी पुस्तकं, नको पाटी नवी
शिकवणारं मास्तर अन् मोफत शाळा हवी

● संदिप चव्हाण ●
कल्याण पुर्व, मो.नं. ९७०२२६६३४६



# भारताचा ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय

**टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेपूर्वीच्या ऑस्ट्रेलियाविरूद्ध झालेल्या सराव सामन्यात रोहित शर्माच्या नेतृत्त्वारवाली खेळणाऱ्या भारतीय संघाने ९ गडी राखून दणदणीत विजय मिळविला.**

■ दुबई

**विजयासाठी** भारतासमोर १५३ धावांचे लक्ष्य होते. ते त्यांनी सलामीवीर राहुलचा बळी गमावून १८व्या षटकात सहज पार केले. राहुल-रोहितने भारताला ६८ धावांची चांगली सलामी करून दिली. राहुलने ३९ धावा केल्या. कर्णधार रोहितने ६० धावा केल्यानंतर निवृत्ती पत्करली. मग यादव नाबाद ३८ आणि हार्दिक पांड्या नाबाद१४ धावा यांनी सुरेख फटकेबाजी करून भारतीय विजयावर शिक्कामोर्तब केले. या अगोदर पहिल्या सराव सामन्यात भारताने इंग्लंडला नमविले होते.



नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने २० षटकात ५ बाद १५२ धावांची मजल मारली. त्यांचा माजी कर्णधार स्मिथने सर्वाधिक ५७ धावा केल्या. त्याने ४८ चेंडू खेळताना ७ चौकार मारले. त्याला मॅक्सवेलने ३७ आणि स्टोनिसने नाबाद ४१ धावा करून चांगली साथ दिली.

कर्णधार फिंचला अवघ्या ८ धावा करता आल्या. तर सलामीवीर वॉर्नर पुन्हा अपयशी ठरला. त्याला अवघी १ धाव काढता आली. भारतातर्फे अश्विनने सुरेख मारा करताना अवघ्या ८ धावा देऊन २ बळी टिपले. तर भुवनेश्वर कुमार आणि रविंद्र जडेजा, राहुल चहरने प्रत्येकी १ बळी घेतला.

### विराटने केली गोलंदाजी

या सराव सामन्यात विराट कोहलीने चक्क गोलंदाजी केली. प्लेइंग इलेव्हनचे बंधन नसल्यामुळे कर्णधार रोहितने विराटला गोलंदाजी करण्यास सांगितले. त्याने २ षटकात अवघ्या १२ धावा दिल्या. हार्दिक पांड्या गोलंदाजी करणार नसल्यामुळे भारताला एक गोलंदाज कमी पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही दिवस आजी-माजी खेळाडू विराटला गोलंदाजी करण्याचा सल्ला देत आहेत.

## नामिबियाचा हॉलंडवर सहज विजय

■ अबुधाबी

**टी-२०** विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील पात्रता फेरीच्या सामन्यातील 'अ' गटातील लढतीत नामिबियाने हॉलंडचा पराभव करून आपल्या पहिल्या विजयाची नोंद केली. सलामीच्या लढतीत नामिबियाला श्रीलंकेकडून हार खावी लागली होती.

विजयासाठी नामिबियासमोर १६५ धावांचे लक्ष्य होते. ते त्यांनी ४ गडी गमावून १९व्या षटकात पार केले. विजयी संघाच्या डेव्हिडने नाबाद ६६ धावांची सुरेख खेळी केली. त्यानी ४० चेंडूत ४ चौकार आणि ५ षटकारांची आतषबाजी केली. त्याला गेहार्डने ३२ धावा काढून चांगली साथ दिली. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ९७ धावांची भागिदारी करून त्यांचा विजय निश्चित केला.

त्याअगोदर प्रथम फलंदाजी करणाऱ्या हॉलंडने देखील २० षटकात ४ बाद १६४ धावांची मजल मारली होती. त्यांच्या सलामीवीर मॅक्सने ५६ चेंडूत ७० धावा ठोकल्या. त्यात ६ चौकार आणि १ षटकाराचा समावेश होता. त्याला ॲकरमॅनने ३५, स्कॉटने नाबाद २१ धावा करून चांगली साथ दिली. नामिबियातर्फे जॅनने २ बळी टिपले. हॉलंडला दुसरा पराभव पत्करावा लागला. पहिल्या लढतीत त्यांना आयर्लंडनेदेखील पराभूत केले होते.



## अजिंक्य रहाणे कर्णधार

■ मुंबई

**आगामी** मुश्ताक अली चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत मुंबईचे कर्णधारपद परत एकदा अजिंक्य रहाणेकडे देण्यात आले आहे. पृथ्वी शॉकडे उपकर्णधार पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आदित्य तरे आणि सिध्देश लाडचे मुंबई संघात कमबॅक झाले आहे.

मुंबईचे साखळी स्पर्धेतील सामने गुवाहाटी येथे रंगणार आहेत. मुंबईचा संघ - अजिंक्य रहाणे (कर्णधार), पृथ्वी शॉ, आदित्य तरे, सिध्देश लाड, शिवम दुबे, तुषार देशपांडे, सर्फराझ खान, प्रशांत सोलंकी, शम्स मुलानी, अर्थव अंकोलेकर, धवल कुलकर्णी, हार्दिक तामोरे, मोहित अवस्थी, साईराज पाटील, अमन खान, अरमान जाफर, यशस्वी जैस्वाल, तनुष कोटियन, दीपक शेट्टी, रॉयस्टन डायस.

## ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज जेम्स पॅन्टिसन्सची निवृत्ती

■ व्हिक्टोरिया

**ऑस्ट्रेलियन** वेगवान गोलंदाज जेम्स पॅन्टिसन्सने आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांना अलविदा करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे डिसेंबर महिन्यात सुरू होणाऱ्या प्रतिष्ठेच्या ॲशेस मालिकेपूर्वी ऑस्ट्रेलियन संघाला मोठाच धक्का बसला. गेले काही महिने तो पाठ दुखीमुळे त्रस्त होता. भविष्यात कुटुंबियांना अधिक वेळ देण्यासाठी आणि आपल्या व्हिक्टोरिया संघातील युवा गोलंदाजांना तयार करण्यासाठी त्यानी निवृत्तीचा निर्णय घेतला आहे. २०११ मध्ये त्याने न्युझिलंडविरूद्ध पदार्पण केले होते. आपल्या पहिल्याच सामन्यात त्याने ५ बळी घेऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. तो ऑस्ट्रेलियातर्फे २१ कसोटी, १५ वनडे आणि ४ टी-२० सामने खेळला. त्यामध्ये अनुक्रमे ८१, १६, ३ बळी त्याने घेतले. शेवटचा वनडे सामना तो सप्टेंबर २०१५ मध्ये खेळला होता. त्यानंतर पाठ दुखापतीने बरेच वर्षे संघाबाहेर होता. २०१९ मध्ये त्याने ऑस्ट्रेलियन संघात 'कमबॅक' केले. आपण आता पूर्णपणे तंदुरुस्त नसल्यामुळे निवृत्तीचा निर्णय घेतल्याचे पॅंटिसनने स्पष्ट केले. त्याने आपल्या सहकाऱ्याचे आभार मानले. तसेच क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे देखील आपल्याला खेळायला संधी दिल्याबद्दल देखील आभार मानले. ऑस्ट्रेलियन निवड समितीचे अध्यक्ष जॉर्ज बेली यांनी पॅन्टिसनने दिलेल्या योगदानाला तोड नसल्याचे म्हटले आहे.



## जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धा संपन्न

■ मुंबई

**धारावी** येथील राजीव गांधी क्रीडा संकुलात पहिल्या मुंबई शहर जिल्हास्तरिय ज्युनियर आणि कॅडेड किकबॉक्सिंग स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. एकूण ६ प्रकारात झालेल्या या स्पर्धेत १०० पेक्षा जास्त खेळाडूंनी भाग घेतला होता. विजेते खेळाडू २९ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान नगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत सहभागी होतील. गुरुकुल कृती फाऊंडेशन ट्रस्टचे सहकार्य आयोजकांना मिळाले. संघटनेचे अध्यक्ष उमेश मुरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अथक मेहनत घेतली.


विजेते खेळाडू - अंशिका, प्रीशा विन्स पाटील, श्रितिका, इन्फाल खान, झैनब, झाहरा, मेहलम, गोल्डविन्सी, कांचन निकम, अरहान, प्रज्ञेश पटवर्धन, साईराज, आलोक, आशिष महाडिक, आफताब खान, मोमद, साहिल देवघरकर, शुभम आव्हाड, समर्थ सावंत, निशीत सिंग, आफताब, गौरव मांजरेकर, झोहेब, अब्बास, अलियाजर, आयमान, हमजा, असद

## श्रीनाथ, हरभजन सिंगचा गौरव

■ लंडन

**भारताचा** बुजुर्ग वेगवान गोलंदाज श्रीनाथ आणि फिरकीपटू हरभजन सिंग यांचा प्रख्यात मेरीलेबोन क्रिकेट क्लबने या खेळात त्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल क्लबचे आजीवन सदस्यत्त्व देऊन ह्या दोघांचा खास गौरव केला. क्लबने एकूण १८ पुरुष-महिला खेळाडूंना आजीवन सदस्यत्त्व दिले आहे. त्यामध्ये इंग्लंडचे ४, द. आफ्रिकेचे ४, वेस्ट इंडिजचे ३, ऑस्ट्रेलियाचे २, श्रीलंका, न्युझीलंड, झिम्बावे यांचे प्रत्येकी एका खेळाडूचा समावेश आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार कुक, बेल, टिस्कोथिक आणि माजी यष्टिरक्षक सारा टेलर यांना सदस्यत्त्व देण्यात आले. द. आफ्रिकेच्या गिब्स, कॅलिस, मॉर्कल, अम्ला यांना देखील हे सदस्यत्त्व मिळाले आहे. तर ऑस्ट्रेलियाच्या डेमियन मार्टिन आणि महिला खेळाडू ॲलेक्स ब्लॅकवेलचा देखील गौरव करण्यात आला.





## अव्वल १० खेळाडूंत जाबुर

**पॅरिस :** जागतिक महिला टेनिस क्रमवारीत अव्वल १० क्रमांकांत स्थान मिळविणारी ट्युनेशियाची ओनस जाबुर अरब देशातील पहिली महिला खेळाडु ठरली आहे. यंदाच्या वर्षाच्या सुरुवातीला ७०व्या क्रमांकावर असलेल्या जाबुरने ताज्या क्रमवारीत ८व्या स्थानावर झेप घेतली आहे. नुकत्याच झालेल्या इंडियाना वेल्स स्पर्धेत ती उपविजेती राहिली. त्याचा तिला अव्वल १० खेळाडुत स्थान मिळविण्यासाठी चांगलाच फायदा झाला.

## पारशी जिमखाना उपांत्य फेरीत

**मुबई :** पारशी जिमखाना आणि मुंबई पोलीस जिमखाना संघानी तालिम ढाल टी- २० क्रिकेट स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात पारशी जिमखान्याने डी. वाय. पाटील स्पोटर्स अकादमीचा ३० धावांनी आरामात पराभव केला. विजयी संघाच्या सचिन यादवने नाबाद ५३, आकर्षित गोमेलने ४४, आदित्य तरेने ३३ धावा केल्या. पराग खानापुरकरने ३ बळी घेतले. आणखी एका सामन्यात मुंबई पोलिस जिमखान्याने पार्कोफेन सीसीचा ८ गडी राखुन दणदणीत पराभव केला.

## ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू स्लेटरला अटक

**सिडनी :** ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू मायकल स्लेटरला घरगुती हिंसाचाराच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. गेल्या आठवड्यातील एका कथित घटनेच्या संदर्भात स्लेटरला अटक करण्यात आल्याची माहिती स्थानिक माध्यमांनी दिली. न्यू साऊथ वेल्स पोलिसांनी सिडनीच्या नॉर्थ बिचवर एका ५१ वर्षिय व्यक्तिला ताब्यात घेतल्याची पुष्टी केली आहे. घरगुती हिंसाचाराच्या घटनेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ईस्टन उपनगर पोलिस एरिया कमांडशी संबंधित अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला. त्यानंतर चौकशी अंती त्याला अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी निवेदनात म्हटले आहे. २००४ मध्ये निवृत्ती घेतल्यानंतर स्लेटर पूर्णवेळ क्रिकेट तज्ञ आणि समालोचक बनला. ऑस्ट्रेलियातर्फे ७४ कसोटी आणि ४२ वनडे सामन्यात तो खेळला.

# मी आहे नंदुरबार जिल्ह्याचा कलेक्टर

## डॉ. राजेंद्र भारुड

**माझा जन्म कोणाच्या घरात आणि कोणत्या समाजात व्हावा हे माझ्या हातात नव्हतं. मी साक्री तालुक्यातील सामोडे गावात भिल्ल जमातीत जन्म घेतला आणि माझं जगणं सुरू झालं. जगताना पावलो पावली संघर्ष होता, अडचणी होत्या. परिस्थिती प्रतिकूल होती; पण त्याचा बाऊच करत राहिलो असतो तर आज ही आयएएस ऑफिसर पर्यंतची मजल गाठता**



मला माझ्या आयुष्यात कोणतीच गोष्ट सहज मिळाली नाही, किंबहुना मिळालीच नाही. अभावाच्या या जगण्याला निसर्गाची भक्कम सोबत होती. निसर्गाचा सहवास होता म्हणून लढायला ताकद मिळाली. उसाच्या पालाची झोपडी म्हणजे माझं घर. मी मायच्या पोटात होतो तेव्हाच वडील वारले. घरची एवढी गरिबी की वडिलांचा साधा फोटो काढायलाही पैसे नव्हते. माझे वडील कसे होते हे मला कधीच कळलं नाही. आमच्याकडे ना जमीन होती ना शेती. घरात कर्ता पुरुषही नव्हता. मायवरच सगळी जबाबदारी येऊन पडली; पण ती डगमगली नाही की कधी रडली नाही. ती पोट चालवण्यासाठी मोहाची दारू गाळण्याचा व्यवसाय करत होती. घरातच चालायचा तो. पिणारेही घरीच यायचे. माय सांगते, मी लहान होतो. दुधासाठी रडायचो; पण दारू पिणाऱ्यांना त्रास नको म्हणून माझ्या तोंडात दुधाऐवजी दारूचे थेंब टाकायचे. म्हणजे मी गपगुमान झोपून घेईन. मोठा झालो आणि मग दारू पिणाऱ्यांना चणे, फुटाणे, चकना आणून देऊ लागलो. हे काम करणं भागच होतं. पण म्हणून मायनं आम्हाला फक्त याच कामाला जुंपलं नाही. मोठ्या भावाला आश्रमशाळेत घातलं आणि मला जिल्हा परिषदेच्या शाळेत. शाळेत जाऊन मन लावून शिकत होतो. घरी येऊन अभ्यास करत होतो. पेन, पेन्सिल घ्यायलाही पैसे नसायचे, पण शिकायला छान वाटत होतं. आमच्या जमातीत शिकायला जाणारी आमची ही पहिलीच पिढी होती. पण आमचं शिकणं इतर कोणाला महत्त्वाचं वाटण्याचं कारणंच नव्हतं. आमचा जन्म म्हणजे सांगितलेली कामं करण्यासाठीच. एकदा परीक्षा होती. ओटय़ावर बसून अभ्यास करत होतो. दारू प्यायला आलेल्या एकानं मला चकना आणून देण्यास सांगितलं; पण परीक्षेमुळे मी सरळ नाही सांगितलं. समोरचा चिडला आणि शिकून असा कोणता डॉक्टर - इंजिनिअर होणार असं म्हणून मला हिणवलं. मायला ते शब्द खूप लागले. आणि होईल माझं पोर डॉक्टर- इंजिनिअर असं ठामपणे म्हणून गेली.

त्या माणसाच्या हिणवण्यानं मला खूप वाईट वाटलं. आपली परिस्थिती आपल्याच बळावर बदलण्याचाही आपल्याला हक्क नाही का, असा विचार आला. पण क्षणभरच. मायनं माझ्यावर दाखवलेला विश्वास मोठा होता. हा विश्वास खरा करायचं ठरवलं.

**मुलाखत आणि शब्दांकन- माधुरी पेठकर**

पुढे अक्कलकुवा तालुक्यातल्या नवोदय विद्यालयात सीबीएसई अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला. गावापासून १५० किमी दूर होती शाळा. माय आली होती सोडवायला. मायपासून दूर कसं राहायचं या विचारानंच रडायला आलं. मायही खूप रडत होती; पण मायपासून दूर राहून शिकणं भाग होतं. मायची पाठ फिरल्यानंतर मी ठरवून टाकलं ही संधी अशी वाया जाऊ द्यायची नाही. संधीचं चीज करायचंच. मी घरापासून दूर राहून शिकत होतो. मन लावून अभ्यास करत होतो. दहावीला उत्तम गुणांनी पास झालो. बारावीला ९७ टक्के गुण मिळाले. आणि स्वतःच्या गुणांच्या जोरावर मुंबईतील जी.एस. मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळवला. कॉलेजच्या वसतिगृहात राहण्याची सोय झाली. वैद्यकीय शिक्षणासाठी खूप स्कॉलरशिप मिळाल्या. त्याच्या जोरावर शिक्षणाचा खर्च चालू होता. बारीकसारीक खर्चाचे पैसे माय पाठवत होती. मी वैद्यकीय शिक्षण घेत होतो; पण तरीही आईचा मोहाची दारू बनवण्याचा व्यवसाय चालूच होता. तो बंद केला असता तर मला पैसे कसे पुरवता आले असते.

एम.बी.बी.एस.च्या शेवटच्या वर्षाला होतो. एकीकडे इण्टर्नशिप चालू होती आणि दुसरीकडे यूपीएससीचा अभ्यास. मायचे कष्ट हीच माझी प्रेरणा होती. बाकी माझ्या मायला माझ्या शिकण्याचा काहीच गंध नव्हता. मायला तर मी फक्त डॉक्टरकीच करतो आहे असं वाटत होतं. यूपीएससीची परीक्षा काय असते? कशासाठी असते? कलेक्टर होण्यासाठी काय करायचं असतं हेच तिला माहीत नव्हतं. तिनं तर तोर्पयत तिच्या आयुष्यात गावात कधी प्रांत आणि तहसीलदारही आलेला बघितला नव्हता. आणि मी आयएएस ऑफिसरची तयारी करत होतो. वर्ष संपलं. आणि माझ्या एका हातात एम.बी.बी.एस.ची पदवी आणि दुसऱ्या हातात यूपीएससी क्रॅक केल्याचा निकाल होता. घरी मोठी मोठी मंडळी माझ्या अभिनंदनासाठी येत होती. कलेक्टर, तहसीलदार, पुढारी. मायला काही कळतच नव्हतं की इतकी लोकं का येताहेत. मी मायला सांगितलं की मी डॉक्टरकी पास झालो. मायला खूप आनंद झाला; पण मी लगेच सांगितलं की मी डॉक्टरकी सोडली. मायला काही कळेचना. मी म्हटलं की डॉक्टरकी सोडली कारण मी आता कलेक्टर झालो आहे. मायला एवढंच समजत होतं की आपलं पोरगं खूप मोठं काहीतरी बनला आहे. माझे नातेवाईक, गावातील भिल्ल समाजातील इतर माझे समाजबांधव यांनापण छान वाटलं. पण त्यांनाही कलेक्टरचा अर्थ काही कळत नव्हता. लोकांनी तर 'आपला राजू कंडक्टर झाला' म्हणत माझं कौतुक केलं.

माझी पोस्टिंग कलेक्टर म्हणून नंदुरबार जिल्ह्यात झाली आहे. २०१२ पासून माझी माय आता माझ्यासोबत आहे. इथे मला करण्यासारखं खूप आहे. नंदुरबार म्हणजे पूर्ण आदिवासी जिल्हा. शिक्षण, रस्ते, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सर्वच बाबतीत कामाची, सुधारणांची नितांत गरज आहे. आणि ते करण्यासाठीच मी या पदावर आहे.

आज मला अनेकजण विचारतात की माझं अख्खं बालपण, तरुणपण परिस्थितीशी दोन हात करता करता संपलं. या अवस्थेतलं जगणं मला अनुभवताच आलं नाही. पण मी म्हणतो की संघर्ष करत होतो म्हणूनच माझ्यात ताकद येत होती. अख्खं बालपण उघडय़ा आकाशाखाली निसर्गाच्या सोबतीनं गेलं. खेळायला आंब्याच्या कोयी होत्या. विटी-दांडू होते. नदीत पोहत होतो. डोंगर चढत होतो. शरीर आणि मन दोन्हीही घट्ट होत होतं. तेव्हा माझ्या आजूबाजूला तरी कोण होतं. माझी माय, माझीच माणसं. सगळेच गरीब. सगळ्यांच्या पोटाला अर्ध पोटी राहण्याची, पोटाला चिमटा काढत रात्र घालवण्याची सवय. त्यामुळे अमक्याला अमुक मिळतंय, चांगलं खायला-प्यायला मिळतंय आणि आपल्याला मात्र उपाशी राहावं लागतंय असं वाटण्याची परिस्थितीच नव्हती. सगळे सारखे. कोणाच्या आनंदानं स्वतःच्या परिस्थितीला, दैवाला दोष लावत बसण्याची गरजच नव्हती. काही नव्हतंच कोणाकडे. कमीपणा तरी मग कशाच्या बाबतीत बाळगावा?

छान वाटत होतं. गरिबीतपण आनंद वाटत होता.

पण मुंबईला शिकायला गेलो. आणि पहिल्यांदा गरिबीची जाणीव झाली. पण कोणाबद्दल मत्सर वाटला नाही आणि स्वतःच्या परिस्थितीचं दुःख मानलं नाही. पहाटे साडेचारला उठायचो. योग करायचो, अभ्यासाला बसायचो. कॉलेज, काम, यूपीएससीचा अभ्यास अशीच दिनचर्या संपूर्ण कॉलेज काळात होती. हातातल्या मोबाईलमध्ये डोकं खुपसून बसण्यासाठी वेळच नव्हता. तेव्हा जर फेसबुकवर पोस्ट्स लिहित राहिलो असतो, आपल्या वाटय़ाला आलेल्या संघर्षाची दुःखद कथा उगाळत राहिलो असतो तर इथवर पोहोचलोच नसतो. आपले दिवस पालटण्यासाठी मी कोणाच्या मदतीच्या हातांकडे पाहिलं नाही. मला इतकंच कळत होतं आपली परिस्थिती आपल्यालाच बदलायची आहे. तीही न कुढता आणि न थकता.

वयाच्या ३१व्या वर्षी मी कलेक्टर झालो आहे. कष्ट केले नसते, आयुष्यात आलेल्या छोटय़ा संधीचं बोट धरलं नसतं तर या वयात इतरांसारखी नोकरीच शोधत बसलो असतो. इथे पोहोचेपर्यंत मी काय गमावलं यापेक्षा माझ्या संघर्षानं मला आज काय दिलं हे मी महत्त्वाचं मानतो.

आज ३१ व्या वर्षी माझ्याकडे काय नाही?

जगण्याचे हरप्रकारचे अनुभव घेतले आहेत. पोटाला पीळ पाडणारी भूक अनुभवली आहे. आणि हे सगळं अनुभवणारा राजेंद्र भारूड नावाचा भिल्लं समाजातला तरुण जेव्हा आयएएस ऑफिसर होतो, भिल्ल समाजातला पहिलाच कलेक्टर होतो तेव्हा मग आजूबाजूच्या लोकांना जाग येते. इथंही काहीतरी बदलतंय, घडतंय याची जाणीव होते.

लढायचं ठरवलं तर काहीच अशक्य नसतं हे एवढं जरी माझ्या तरुण मित्रांनी या भिल्लाच्या पोराकडे पाहून ठरवलं तरी खूप आहे……

# घर नाकारणाऱ्या प्रकल्पबाधितांना ५० लाख रुपये आर्थिक मोबदला

**मुंबई** - शहरात विकासकामे करण्यासाठी महानगर पलिकेद्वारे विविध प्रकल्प राबविले जात आहेत. अश्या विकास प्रकल्पामुळे सामान्य मुंबईकरांची घरे बाधित होत आहेत. त्यामुळे पालिकेने त्यांना पर्यायी घरे देण्याची योजना आखली मात्र काही प्रकल्प बाधित या पर्यायी जागेत राहायला नकार देत असल्यामुळे त्यांना आर्थिक मोबदला देण्याच्या प्रस्तावाला काल स्थायी समितीमध्ये मंजुरी मिळाली. अशा प्रकल्पग्रस्तांना ३० लाख रुपये देण्याचा प्रस्ताव होता. मात्र यात वाढ करून ५० लाख रुपये पर्यंतच मोबदला देण्याच्या उपसूचनेला बहुमताने मंजुरी देण्यात आली. मात्र एसआरए योजनेच्या नियमानुसार ३०० चौरस फुटाच्या घराचा मोबदला द्या अशी मागणी भाजपने करीत आपला या प्रस्तावाला विरोध केला. बाधित कुटुंबांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आव्हानात्मक ठरतो आहे. रोजगाराच्या किंवा हव्या त्या ठिकाणी पुनर्वसन होत नसल्याने अनेक बाधित कुटुंबांकडून पर्यायी जागेत जाण्यास नकार दिला जातो. त्यामुळे अशा पात्र कुटुंबांसाठी महापालिकेने धोरण बनवले आहे. महापालिकेच्या अत्यावश्यक नागरी प्रकल्पांमध्ये संरक्षणपात्र आणि संरक्षित बांधकामांमधील निवासी बाधित कुटुंबांसाठी हे धोरण आहे. यात बाधित कुटुंब जर पर्यायी सदनिका स्वीकारण्यास किंवा तिथे जाण्यास तयार नसेल तर त्यांना त्या जागेच्या बाजारभावानुसार ठराविक टक्के रक्कम निश्चित करून सदनिकांऐवजी घराची किंमत अदा केली जाणार आहे. यामध्ये ३० लाख रुपये मूल्य देण्याचे धोरण पालिकेने स्थायी समितीत मंजुरीसाठी ठेवले होते. मात्र ३० लाख रुपये हा मोबदला कमी असल्याने एवढ्या किंमतीत घर घेणे शक्य नाही. त्यामुळे ही रक्कम वाढवून ५० लाख रुपये आर्थिक मोबदला द्या अशी उपसूचना सभागृह नेत्या विशाखा राऊत यांनी मांडली. याला भाजप कडाडून विरोध केला. काही प्रकल्पग्रस्तांचे १०० ते दीडशे चौरस फुटाचे घर असल्यास त्यांना त्यानुसार मोबदला मिळणार आहे. त्यामुळे अशा प्रकल्पग्रस्तांना घर त्याच ठिकाणी किंवा इतर मोक्याच्या जागी या मोबदल्यात घर घेता येणार नाही. त्यामुळे सर्वांना ३०० चौरस फुटाच्या घराचा आर्थिक मोबदला मिळेल अशा प्रकारचे धोरण तयार करा अशी मागणी भाजपने केली. मात्र याकडे दुर्लक्ष करीत बहुमताच्या जोरावर या धोरणाला मंजुरी देण्यात आली.


## PUBLIC NOTICE

It is for general information that I, RAJENDRA VISHNU CHAVAN S/O VISHNU NARAYAN CHAVAN R/O C/15, INDRAPRASTHA, ANUSHAKTI NAGAR, MUMBAI, MAHARASHTRA-400094 declare that name of mine has been wrongly written as RAJENDRA VISHNU CHAWAN in my Service Records and School leaving Certificate. The actual name of mine is **RAJENDRA VISHNU CHAVAN,** which may be amended accordingly.

It is certified that i have complied with other legal requirements in this connection.

**Sd/-**
**RAJENDRA VISHNU CHAVAN**


# कोविडच्या खर्चाचा अहवाल सादर करा - स्थायी अध्यक्ष

मुंबई - कोरोना काळात मुंबई महापालिकाद्वारे कोरोनावर उपाय योजना करण्यासाठी आणि कोरोनाचा प्रसार कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च केला जात आहे. हा पैसा सर्व सामान्य मुंबईकरांच्या करातून गोळा झालेला पैसा आहे त्यामुळे पालिकेकडून केल्या जाणाऱ्या या खर्चाची श्वेतपत्रिका काढून सर्वसामान्य मुंबईकरांना त्यांच्या कराच्या पैशाची कुठे काय तरतूद करण्यात आली याची माहिती मिळेल. त्यामुळे पालिकेने श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी भाजपकडून काल स्थायी समितीच्या बैठकीत करण्यात आली. त्याचबरोबर कोविडच्या नावाने केल्या जाणाऱ्या खर्चाचे ऑडिट करावे अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली. तर कोविडच्या नावाने करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील सादर करावा असे निर्देश स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी पालिका प्रशासनाला दिले आहेत. मुंबईत कोरोना महामारी आली तेव्हा पासून पालिका प्रशासनाद्वारे मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करून उपाय योजना करण्यात येत आहेत. यासाठी पालिकेने ठिकठिकाणी कोविड सेंटर उभारले आहेत. त्यापैकी बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील कोविड सेंटरसाठी करण्यात आलेल्या ७७ आणि ५२ कोटींच्या खर्चाचे दोन प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्यात आले होते.


## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, युनियन बँक ऑफ इंडिया, माहिम शाखा, मुंबई यांचे वर्ष २०१९ पासून **श्री. जितेंद्र मोहनलाल शाह** यांच्या कर्ज खात्यामध्ये खालील अनुसूचित केल्यानुसारच्या मालमत्तेमध्ये प्रतिभूती हितसंबंध होते.

खालील अनुसूचित मालमत्ता श्री. जितेंद्र मोहनलाल शाह यांच्या मालकीची आहे ज्यांनी दि. ०२.०२.२०१९ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था जय दर्शन सीएचएसएलद्वारे क्र. ३९१ ते ३९५ धारण केलेल्या ५ समभागांसाठी रु. २५०/- भागभांडवलाकरिता पारित केलेल्या मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ७९ सह मूळ शीर्षक करारपत्र युनियन बँक ऑफ इंडियाच्या नावे न्याय्य गहाणवट आणि संमती बनविण्याकरिता युनियन बँक ऑफ इंडिया, माहिम शाखा, मुंबई यांच्याकडे जमा केले होते. युनियन बँक ऑफ इंडिया, माहिम शाखा व्यवस्थितपणे त्याची नोंद ठेवीत होती, तथापि, दुर्दैवाने, मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ७९ सापडत नाही. युनियन बँक ऑफ इंडियाचे कर्मचारी आणि अधिकारी यांनी मूळ प्रमाणपत्र शोधण्याकरिता त्यांचे सर्वोत्तम प्रयत्न केले आहेत, तथापि ते शोधू शकले नाहीत. श्री. जितेंद्र मोहनलाल शाह यांनी त्यांच्या कर्जाचा परतावा केला आहे आणि गहाणवट सोडवले आहे आणि बँकेने मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ७९ व्यतिरिक्त सर्व मूळ शीर्षक करारपत्रे त्यांना परत केली आहेत. युनियन बँक ऑफ इंडिया, माहिम शाखा यांनी त्यासंदर्भात पोलीस तक्रार देखील दाखल केली आहे.

आम्ही सर्वसाधारण जनतेस सूचित करू इच्छितो की, श्री. जितेंद्र मोहनलाल शाह यांच्या नावे असलेले मूळ भाग प्रमाणपत्र क्र. ७९ हरवले आहे आणि जर कोणा व्यक्तीस ते सापडल्यास, त्यांनी ते खालील पत्त्यावर किंवा बँकेच्या शाखेमध्ये परत करावे अशी त्यांना विनंती आहे. सर्वसाधारण जनतेस याद्वारे सावध करण्यात येते की, खालील अनुसूचित मालमत्तेबाबत फक्त हरवलेल्या भाग प्रमाणपत्र क्र. ७९ च्या आधारे कोणताही व्यवहार करू नये आणि त्या मालमत्तेबाबत असा कोणताही व्यवहार रद्दबातल मानला जाईल.

**मालमत्तेची अनुसूची**

गाव जुहू, तालुका अंधेरी जिल्हा मुंबई उपनगर येथील सर्व्हे क्र. ४४, हिस्सा क्र. १(भाग) आणि २ (भाग) सीटीएस क्र. १०४ बी धारण करणाऱ्या जमिनीवर असलेल्या रुईया पार्क, जुहू, मुंबई ४०००४९ येथे स्थित "जय दर्शन सीएचएसएल" या इमारतीमधील सातव्या मजल्यावरील सदनिका क्र. ७०७ मोजमाप ३३० चौ.फू. क्षेत्रफळ.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २१.१०.२०२१

सही/-
मे. साई कन्सल्टन्सी सर्व्हिसेस
वकील उच्च न्यायालय, मुंबई
चेंबर क्र. २०१, २ रा मजला, जास्मिन गार्डन सीएचएसएल, जांभळी नाका, हॉटेल टाईम्स स्क्वेअरजवळ, ठाणे प-४००६०१. ९८२१००६३८४ / ९१६७६७५३२८ / २९



## PUBLIC NOTICE

Shrimati Kokila B. Shah a member of the A to Z Co-op Society Ltd. Having address at G. K. Marg, Lower Parel, Mumbai 400013 and holding Unit No. 227 in the building of the society, and holding share certificate no. 169 bearing no. 846 to 850 died on 10th April, 2020 and the legal heirs have applied by executing release deed.

The Society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants / objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital / property of the society within a period of 15 days from the publication of this notice with copies of such documents and other proofs in support of his / her their claims / objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital / property of the Society. If no claims / objections are received within the period as prescribed above the Society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital / property of the Society. In such manner as is provided under the Bye Laws of the society. The claims / objections if any if any received by the Society for transfer share and interest of the deceased member in the capital / property of the Society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the Society. A Copy of the registered bye-laws of the society is available for of inspection by the claimants / objectors in the office of the Society / with Manager of the Society between 10.00 A. M. To 05.00 P.M. from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place: Mumbai
Date: 20/10/2021

Sd/-
Hon. Secretary
**A to Z Co-op Society Ltd.**
Ganpatrao Kadam Marg,
Lower Parel, Mumbai 400013.



## FDC
### एफडीसी लिमिटेड
### जाहीर सूचना

या जाहीरातीद्वारे कळविण्यात येते की, एफडीसी लिमिटेड, सी.टी.एस नं.६७६, सर्व्हे नं.४१, प्लॉट नं. सी-११, सी-१२ दलिया इंडस्ट्रीयल इस्टेट, वीरा देसाई रोड, अंधेरी वेस्ट, मुंबई-४०००५३. या जागेचे क्षेत्रफळ मालमत्ता पत्रकानुसार २७१० चौ.मी एफडीसी लिमिटेड सी.टी.एस नं.६७६, सर्व्हे नं.४१, प्लॉट नं. सी-११, सी-१२ दलिया इंडस्ट्रीयल इस्टेट, वीरा देसाई रोड, अंधेरी वेस्ट, मुंबई-४०००५३,२०१४ मध्ये मेटालोय्स इंडस्ट्रीमधुन विकत घेतले होते. या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे जागेचे व्यवस्थापक व विकासाच्या विरुध्द असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्रांच्या पुराव्यासहित कामगार भवन, सी-२०, ईब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल,बांद्रा (पूर्व), मुंबई -४०००५१ यांच्याकडे जाहीर नोटीस / सूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही. व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

एफडीसी लिमिटेड करिता
सही/-
वर्षाराणी कात्रे
कंपनी सचिव

दिनांक २१.१०.२०२१
ठिकाण : मुंबई



## PUBLIC NOTICE

Shri Mahendra K. Patel & Mr. Jigar Mahendra Patel are members of the Madhuvan Co-operative Housing Society Ltd., bearing Regn No. MUM/W-R/HSG/TC/14596/2009-2010/Year 2009 dtd: 10/11/2009 having its registered office at CTS no. 374/B/2, Shimpoli, Village - Eksar, Borivali (w), Mumbai - 400 092 since they are owners of Flat no 305 on 3rd floor in A wing in the building of the society.

Shri Mahendra K. Patel & Mr. Jigar Mahendra Patel are holding the share certificate No. 17 for five fully paid up shares of Rupees Fifty each, bearing distinctive numbers from 81 to 85 (both inclusive).

That the original share certificate for the said Flat bearing no. 305 on 3rd floor in A wing is lost and hence Shri. Mahendra K. Patel & Mr. Jigar Mahendra Patel has applied to the society for issuing Duplicate Share certificate.

That the society hereby invites claims and objections from any claimants/objector or objectors for issuing duplicate Share certificate in name of Shri. Mahendra K. Patel & Mr. Jigar Mahendra Patel with respect to the said flat bearing no. 305 on 3r floor in A wing within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for issuing Duplicate Share certificate with respect to the said flat bearing no. 305 on 3rd floor in A wing. If no claims/objections are received within the period prescribed above, the society shall issue Duplicate Share certificate in the name of Shri Mahendra K. Patel & Mr. Jigar Mahendra Patel. A copy of the Bye-laws of the society and the concerned flat papers is available for inspection by the claimants/objectors, in the office of the society between 8.00 PM to 10.00 PM on.......... from the date of publication of this notice till the date of expiry of its period.

Place : Mumbai
Date : 18th October 2021

For and on behalf of
For Madhuvan CHS Ltd.
Mr. S. D. Korgaonkar
Hon. Secretary



## TENDER NOTICE FOR REDEVELOPMENT

Sealed Bids are invited from Reputed Builders / Developers for Proposed Redevelopment of
**SHREE PARAS CO-OP HOUSING SOCIETY LTD.**
Bearing CTS No. 15, Hissa 3 Paikee/ New CTS No. 351 of Village Located 11/12, Modi Patel Road, Bhayander (W) THANE: 401 101.
**SHREE PARAS CHSL**
consisting of 64 flats/shops in Total plot area is 9246.276 sq. ft.
Tender for Redevelopment is available in PMC's office from 22/10/2021 to 21/11/2021 between 10 am to 6 pm on all working days
**Submission of Bid till 27/11/2021 in consultants office up to 5 pm.**
Tender cost 7000/- Plus GST by pay order in the name of AARYAN CONSULTANTS
**The Bid document shall only be issued on submission of request letter to PMC.**
The Society reserves its right to accept or reject any or all Bids without assigning any reason whatsoever.
PMC
**M/s AARYAN CONSULTANTS**
104, Saylee Enclave,
Nadiadwala Colony No.1,
Off S.V Road, MALAD (W)
Mumbai: 400064.


# प्रियांका गांधींना आग्रा जाण्यास पोलिसांची परवानगी

**लखनऊ-** उत्तर प्रदेशातील आग्रा येथील जगदीशपूर भागात पोलीस कोठडीत असताना एका सफाई कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या सफाई कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी जात होत्या. त्याचवेळी उत्तर प्रदेश पोलिसांनी यमुना एक्सप्रेस वे वर त्यांना रोखले आणि ताब्यात घेतले. प्रियांका गांधी यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे समजताच काँग्रेस कार्यकर्त्यांनी पोलिसांनी केलेल्या कारवाईविरोधात निदर्शने केली. त्यानंतर प्रियांका गांधी यांना चार सदस्यांसह आग्रा येथे जाण्यास पोलिसांनी परवानगी दिली.अरुण वाल्मिकी असे मृत सफाई कर्मचाऱ्याचे नाव असून तो आग्रा येथील जगदीशपुरा पोलीस ठाण्यात सफाई करण्यासाठी येत होता.

## शुभ राशी
### गुरु. दि.२१/१०/२०२१

| | | |
|---|---|---|
| ३ | ८ | १ |
| ३० | ८० | १० |
| ३५ | ८५ | १५ |
| १४८ | १३४ | १४८ |
| १५७ | १७० | २९० |


## जाहीर नोटीस

माझे अशिल श्रीमती निरंजन प्रदिप साळुंखे हि. वय ३३ वर्षे, धंदा गृहिणी, रा.ठी. ५/७, बी.डी.डी. चाळ, शिवडी क्रॉस रोड, शिवडी, मुंबई ४०० ०१५ यांचे वतीने जाहीर नोटीस देण्यात येते की, माझे अशिल यांचे पती कै. प्रदिप रामचंद्र साळुंखे यांचे दिनांक १८/०८/२०१६ रोजी मुंबई येथे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मृत व्यक्तिस माझे अशिल व त्यांची मुले हेच फक्त खालील नमुद प्रमाणे कायदेशीर वारसदार आहेत.

| अ.क्र. | नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती निरंजन प्रदिप साळुंखे | ३३ | पत्नी |
| २ | कुमारी सानिका प्रदिप साळुखे | १४ | मुलगी |
| ३ | कुमार सनी प्रदिप साळुंखे | ११ | मुलगा |

माझे अशिल हे बृहन्मुंबई पोलीस दलामधून मिळणारी त्यांच्या पतीच्या पश्चात येणी तसेचं मयत व्यक्तिच्या नावे असलेल्या स्थावर वा जंगम मालमत्ते कामी तसेचं इतर कामी वारस दाखला मिळणेकामी अर्ज करत आहेत. तरी माझ्या अशिलांच्या व त्यांच्या वर उल्लेख केलेल्या मुलां व्यतीरिक्त त्यांना इतर कोणीही वारस नाहीत. ज्या कोणाचे सदर वारस हक्काबाबत काहीही हरकत/आक्षेप असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द् झाल्याच्या दिनांका पासून ७ (सात) दिवसाच्या आत माझ्या खालील पत्त्यावरती, मा. तहसिलदार कार्यालय, ओल्ड कस्टम हाउस, फोर्ट, मुंबई आणि माझे अशिलाचे वर नमुद पत्त्यावर यांच्याकडे लेखी कळवावीत.

पत्ता : १७/३, सहकार नगर कॉलणी,
वडाळा उद्योग भवन समोर, वडाळा, मुंबई ४०० ०३१.
मोबाईल क्र. ९८२०९८१९६८

सही/-
(श्री भास्कर गणपत उदावंत)
वकील मुंबई उच्च न्यायालय.



## महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता
### सा. बां. विभाग, पालघर,
### ई-निविदा सूचना क्रमांक १९ सन २०२१-२०२२

कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा. बां. विभाग, पालघर शासकीय विश्रामगृह आवार, जुना मनोर रस्ता, वेबुर रोड, पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता 'बी-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०३ (तीन) कामे समाविष्ट आहे.

**टिप** - या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**1) www.mahapwd.gov.in 2) https://mahatenders.gov.in**

| अ . क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम ₹ (जी.एस.टी. वगळून) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १ | तलासरी तालुक्यातील वेवजी वसा करजगांव आंबेसरी रस्ता प्र. जि. मा. क्रं. ०२ कि. मी. ७/००० ते ८/५०० रस्त्याची सुधारणा करणे. (रुंदीकरण) जि. पालघर. | ₹ १,०४,२७,२४०/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च, ०४ जिल्हा व इतर मार्ग ८०० व इतर खर्च |
| २ | डहाणू तालुक्यातील सायवन किन्हवली किरमीरा ओझर रस्ता रा. मा. क्रं. ७२ कि. मी. ११/००० ते १३/६०० रस्त्याची सुधारणा करणे. जि. पालघर (उपविभाग तलासरी) | ₹ १,४६,८०,५६४/- | ५०५४ मार्ग व पूल ०३ राज्यमार्ग |
| ३ | डहाणू तालुक्यातील वेवजी वसा करजगांव आंबेसरी रस्ता प्र. जि. मा. क्रं. २ कि. मी. १/८०० ते ५/००० रस्त्याची सुधारणा करणे. (रुंदीकरण) (उपविभाग तलासरी) जि. पालघर. | ₹ २,०९,२१,२४६/- | ५०५४ मार्ग व पूल ०४ जिल्हा व इतर मार्ग |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २१/१०/२०२१ ते दि. १५/११/२०२१ पर्यंत

वरील **(अ. क्र. ०३ डहाणू तालुक्यातील वेवजी वसा करजगांव आंबेसरी रस्ता प्र. जि. मा. क्रं. २ कि. मी. १/८०० ते ५/००० रस्त्याची सुधारणा करणे. (रुंदीकरण) (उपविभाग तलासरी) जि. पालघर. अंदाजित रक्कम ₹ २,०९,२१,२४६/-)** या कामाची निविदा पुर्व बैठक दि. ०९/११/२०२१ मा. अधिक्षक अभियंता सा. बां. मंडळ, ठाणे स्टेशन रोड, ठाणे ४०० ६०१ दुपारी २.३० वाजता.

ई-निविदा उघडणे - दि. १८/११/२०२१ शक्य झाल्यास दुपारी ३.०० नंतर

जा.क्र. सा.बां. वि/पालघर/निविदा/५०१८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा. बां. विभाग, पालघर
शासकीय विश्रामगृह आवार,
जुना मनोर रस्ता, वेबुर रोड, पालघर (पूर्व) - ४०१ ४०४
दिनांक : ११/१०/२०२१

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर**

आरओसी-2021-2022/क्र-5/C-2398

नवाकाळ
मुंबई । गुरुवार २१ ऑक्टोबर, २०२१
web:http://navakal.in | e-mail: navakal.1923@gmail.com

# चंदेरी च्वींगम

## ‘खेळू झिम्मा गं...’




‘झिम्मा’ कधी चित्रपटगृहात येतोय, याची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असतानाच आता या चित्रपटाचे शिर्षकगीत प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. हे जबरदस्त गाणे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. ‘खेळू झिम्मा गं.’ हे या गाण्याचे बोल असून या मोन्टाज सॉन्गचे शब्द आणि चाल संगीतप्रेमींना थिरकवणारे आहे. ट्रेलरमध्येच या गाण्याची झलक आपण पाहिली आणि ऐकली आहे. हे उत्स्फुर्तदायी गाणे वेगवेगळ्या वयोगटातील मैत्रिणींच्या प्रवासातील मजामस्तीवर चित्रित करण्यात आले आहे. त्यामुळे हे गाणे ऐकताना आपल्याला आपल्या सहलीची आणि मैत्रीची आठवण आल्यावाचून राहणार नाही. अमितराज यांनी या धमाल गाण्याला संगीत दिले असून वैशाली सामंत, मुग्धा कऱ्हाडे, आरती केळकर, सुहास जोशी यांनी हे गाणे गायले आहे. ‘चलचित्र कंपनी’ प्रस्तुत ‘अमेय विनोद खोपकर एंटरटेनमेंट’ आणि ‘क्रेझी फ्यू फिल्म्स’ निर्मित ‘झिम्मा’ चित्रपट १९ नोव्हेंबरला सर्व चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे.

## परीक्षकाने सर्व ट्रेण्ड्स तपासणे महत्त्वाचे!



भारतातील समकालीन डान्सचा इनोव्हेटर म्हणून प्रसिद्ध असलेला कोरिओग्राफर **टेरेन्स लुईस** सध्या सोनी मनोरंजन वाहिनीवरील ‘इंडियाज बेस्ट डान्सर-२’ या डान्स रिॲलिटी शोमध्ये परीक्षकाचे काम करतोय. परीक्षक नेमका कसा असावा यावरही तो बोलला. याच पार्श्वभूमीवर त्याच्याशी केलेली बातचीत...

**टेरेन्स, पुन्हा एकदा या शोच्या परीक्षकाच्या आसनावर विराजमान होताना कसे वाटतेय?**

- खूप आनंद होतोय. कारण मागचे सत्र खूप यशस्वी ठरले होते आणि या मंचावर काही अत्यंत अद्‌भूत प्रतिभा सादर झाली होती. मी खात्रीने सांगू शकतो की, हे सत्र त्याहीपेक्षा सुंदर असणार आहे आणि स्पर्धकांना हे लक्षात येईल की या सत्रात कसली कसोटी असणार आहे! सगळ्याच दृष्टींनी हे सत्र नवीन वाटा चोखाळणारे असेल.

**या सत्राची मुख्य थीम ‘बेस्ट का नेक्स्ट अवतार’ आहे. त्याबद्दल काय सांगाल?**

- ‘इंडियाज बेस्ट डान्सर-२’मध्ये आम्ही ‘बेस्ट का नेक्स्ट अवतार’चा शोध घेणार आहोत. आता सोशल मीडियामुळे अनेक प्रकारच्या डान्स शैली लोकांना माहीत झाल्या आहेत आणि देशभरातील लोक मुख्य व्यवसाय म्हणून डान्सकडे बघू लागले आहेत. लोकांना आता समजले आहे की स्वतःला इतरांपेक्षा वरचढ दाखवण्यासाठी काय करावे लागेल. त्यामुळे मला वाटते की, बेस्ट का नेक्स्ट अवतार हे या दुसऱ्या सत्रासाठी अगदी योग्य शीर्षक आहे.

**इतक्या मोठ्या डान्स रियालिटी शोमध्ये परीक्षक म्हणून काम करताना काय आव्हाने आहेत?**

- सगळ्यात अवघड गोष्ट म्हणजे या उदयोन्मुख डान्सरने आणलेल्या वेगवेगळ्या डान्स स्टाइल्सबाबत स्वतःला अपडेटेड ठेवणे. प्रत्येक फॉर्म, पॅटर्नमध्ये नावीन्य असावे लागते आणि जेव्हा हे स्पर्धक ते साध्य करतात, तेव्हा ते आणखीनच खास होऊन जाते. परफॉर्मन्स पारखताना त्यातील बारकावे, प्रशिक्षण, लॅंडींग, स्टाइल, सौंदर्यदृष्टी या सर्व गोष्टी आम्हाला परीक्षक म्हणून ध्यानात ठेवाव्या लागतात. टेक्निकच्या दृष्टीने परफॉर्मन्स अचूक असावा लागतो आणि बघणाऱ्यालाही तो परिपूर्णतेचा अनुभव देणारा असायला हवा. परीक्षक म्हणून आम्हाला सध्याचे ट्रेंड, गाणी आणि अशा अनेक गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. हे काम अत्यंत जबाबदारीचे आहे आणि प्रत्येक वेळी ते उत्तमपणे करण्यासाठी आम्ही तिघेही खूप प्रयत्न करत असतो.

**शोच्या इतर परीक्षक मलायका आणि गीता यांच्याशी तुमचे कसे जमते?**

- गीता आणि मी तर खूप जुने मित्र आहोत. मलायका वीस वर्षांपूर्वी माझ्याकडे शिकायला होती. गीता आणि मी या कारकिर्दीत एकत्रच वाढलो आहोत. त्यामुळे तिच्याबरोबर आणि मलायकाबरोबर परीक्षक म्हणून काम करताना मोकळेपणा वाटतो. आम्हा तिघांमध्ये छान नाते जमले आहे. आम्ही खूप मस्ती करतो. कित्येकदा प्रॉडक्शनच्या लोकांना आम्हाला शांत राहा असे सांगावे लागते.

**या सत्रातील स्पर्धकांना तुम्ही काय टीप्स द्याल?**


- मी फक्त इतकेच सांगीन की, एक डान्सर म्हणून स्वतःला जास्तीत जास्त प्रशिक्षित करत राहा. सोशल मीडियावर तर सगळ्यांना तुम्ही आवडता, ते तुमचे कौतुक करत असतात, पण तुम्ही स्वतःचा एक मापदंड तयार केला पाहिजे... आणि तो इतका उंच असायला हवा की, मग तुम्हीच तुमचे सर्वात चांगले परीक्षक ठराल.

## शूटिंग संपले अन् शिवांगी झाली भावूक




छोट्या पडद्यावरील ‘ये रिश्ता क्या कहलाता है’ या मालिकेत ८ वर्षांचा लीप आला आहे. अक्षरा आणि आरोही आता मोठ्या झाल्यात. पण लवकरच आणखी एक मोठा लीप येऊन नवनवे कलाकार मालिकेत दाखल होणार आणि जुन्यांना नारळ देण्यात येतोय. यातील नायक मोहसीन खान (कार्तिक) याने आधीच आपले शूटिंग पूर्ण करून तो निघून गेला आहे. आता नायिका शिवांगी जोशी (नायरा व सीरत) हिनेही आपल्या भागाचे शूटिंग नुकतेच पूर्ण केले. मालिकेतून जाताना शिवांगी भावूक झाली. इन्स्टाग्रामवर तिने आपल्या भावना व्यक्त केल्या. ती म्हणते, या मालिकेत नायरा आणि सीरत या भूमिका करून मला प्रेक्षकांचे भरपूर प्रेम मिळाले. त्यासाठी मी त्यांची कायम आभारी राहीन. स्टार प्लस वाहिनी, राजन शाही सर आणि माझे सर्व सहकलाकार यांचेही मी आभार मानते. त्यांच्या सहकार्याशिवाय मला हे काम करता येणे शक्यच नव्हते, असेही तिने स्पष्ट केले. या मालिकेचा पहिला भाग २००९ साली आला होता. आता प्रणाली राठौड ही नायराच्या मुलीच्या अक्षराच्या भूमिकेत दिसेल आणि हर्षद चोपडाशी तिची जोडी जमेल. दुसरीकडे करिश्मा सावंत ही सीरतची मुलगी आरोही म्हणून दिसू लागेल.

## फरहान अख्तर वन अधिकाऱ्याच्या भूमिकेत!



लगान, जोधा अकबर असे हिट चित्रपट बॉलिवूडला देणारे दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर सध्या आपल्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहेत. या चित्रपटात फरहान अख्तर आणि रकुल प्रीत सिंग झळकणार आहेत. फरहान याच्या एक्सेल एंटरटेनमेंट या कंपनीद्वारे चित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. पुकार असे या ॲक्शन चित्रपटाचे नाव आहे. जंगलाच्या पार्श्वभूमीवर घडणारी कथा यात आहेत. चित्रपटात फरहान वन अधिकाऱ्याच्या भूमिकेत झळकणार असून डिसेंबर महिन्यात शूटिंगला सुरुवात होणार आहे. रकुल सध्या रॉनी स्क्रूवाला यांच्या छत्रिवाली चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. हा प्रोजेक्ट पूर्ण झाल्यावर ती पुकारचे शुटिंग करणार आहे.

## अक्षयच्या 'सूर्यवंशी'चे पहिले गाणे आले



एकीकडे २२ ऑक्टोबरला सिनेमागृहे उघडली जाणार असतानाच बडे बडे चित्रपटही रिलीजसाठी लाईन लावून उभे आहेत. लवकरच येणाऱ्या दिवाळीच्या मुहूर्तावर रोहित शेट्टीचा ‘सूर्यवंशी’ हा सिनेमा ५ नोव्हेंबरला येतोय. या सिनेमाचे पहिले गाणे ‘आयला रे आयला’ आज २१ ऑक्टोबरला सोशल माध्यमांवर रिलीज करण्यात आले. या गाण्यात अक्षयकुमार आणि कतरीना कैफ सोबतच विशेष व्यक्तिरेखेतील अजय देवगन आणि रणवीर सिंह हेही चमकणार आहेत. ‘सूर्यवंशी’च्या आधी रोहित शेट्टीचे ‘सिंघम’ आणि ‘सिम्बा’ हे पोलिसी चित्रपटही तुफान गाजले होते. मुळात हा सिनेमा २०२० मध्येच प्रदर्शित होणार होता, पण कोरोना संकटामुळे तो रखडला होता. त्यावेळी अनेक निर्मात्यांनी ओटीटीवर आपले चित्रपट रिलीज करायला सुरुवात केली होती, पण रोहित शेट्टी थांबून राहिले होते.

## खरा पोलीस असल्यासारखे वाटले

‘तब्बरस हा रोमांचक हिंदी चित्रपट नुकताच सोनीलिव्हवर स्ट्रीम होऊ लागला आहे. यात पवन मल्होत्रा, सुप्रिया पाठक, गगन अरोरा, परमवीर चीमा, कंवलजीत सिंग आणि रणवीर शोरे यांसारखे कलाकार असलेला हा चित्रपट स्क्रीनसमोर खिळवून ठेवेल हे नक्की. यात एका असंतुष्ट पोलिसाची भूमिका साकारणाऱ्या अभिनेता परमवीर चीमा याने आपल्या भूमिकेसाठी केलेल्या तयारीबाबत नुकतीच प्रतिक्रिया दिली. तो म्हणतो, पोलिसाची भूमिका साकारणे हे माझ्यासाठी स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे. ही भूमिका मिळाल्यानंतर मी



काही दिवस माझ्या वडिलांच्या एसीपी मित्राशी चर्चा केली. शिवाय काही कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांसोबत राहून त्यांचे निरीक्षण केले, असे तो म्हणाला. शूटिंगदरम्यानचा आणखी एक रोचक किस्सा सांगताना तो म्हणाला, आम्ही रस्त्यांवर शूटिंग करत असताना मी खराच पोलीस असल्याचे सर्वांना वाटले. काही घटना घडल्या, ज्यामध्ये मला एका पोलीस अधिकाऱ्याने सॅल्यूट केला. त्याला वाटले की, मी त्याचा सहकारी आहे. खरेतर रस्त्यावरील प्रत्येक व्यक्तीला मी खरा पोलीस असल्याचे वाटले. एकूण त्यांचे धैर्य समजून घेत आत्मसात करण्याचा हा लक्षवेधक अनुभव ठरला आहे, असेही त्याने स्पष्ट केले. अजितपाल सिंग यांचे दिग्दर्शन आणि अजय राय निर्मित ‘तब्बर’ ही जेएसआर पिक्चर्सची वेबसीरिज आहे. हर्मन वडाला व संदीप जैन यांचे लेखन असलेल्या या सिरीजच्या संगीत निर्मात्या स्नेहा खानवलकर आहेत.

## कतरिनाला मिळाली पैठणीची भेट !




महाराष्ट्राचं महावस्त्र ‘पैठणी’ देऊन आदेश बांदेकर यांनी ‘होम-मिनिस्टर’ या कार्यक्रमाद्वारे गेली १७ वर्ष तमाम वहिनींचा सत्कार व सन्मान केला आहे. पण यावेळी झी मराठी अवॉर्ड्स २०२१ मध्ये बांदेकर भाओजींनी चक्क एका बॉलिवूड मधल्या सुप्रसिद्ध अभिनेत्रीचा पैठणी देऊन सन्मान केला. हि अभिनेत्री कतरीना कैफ आहे. कतरीनाने तिच्या अभिनय आणि सौंदर्याने फक्त भारतच नाही तर संपूर्ण जगभरातील तिच्या चाहत्यांना भुरळ पडली आहे. नुकतंच संपन्न झालेल्या झी मराठी पुरस्कार सोहळ्यात कतरीना कैफ आणि रोहित शेट्टी यांनी त्यांच्या आगामी सूर्यवंशी या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी हजेरी लावली त्यावेळी भावोजींनी कतरीनाचं स्वागत अगदी मराठमोळ्या पद्धतीत, महाराष्ट्राचं महावस्त्र तिला भेट देऊन केलं. इतका मोठा सन्मान दिल्याने त्या क्षणी कतरीना भारावून गेली. तिच्या चेहऱ्यावरील आनंदचं सगळं काही सांगून जातो. शनिवार ३० ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ७ वाजता झी मराठी अवॉर्ड्स पाहायला मिळेल.

## ‘सन मराठी’वर मनोरंजनाचा धमाका

SUN मराठी
सोहळा नात्यांचा!


सन टीव्ही नेटवर्कची सन मराठी ही वाहिनी १७ ऑक्टोबरपासून महाराष्ट्रात सुरू झाली आहे. ‘सोहळा नात्यांचा’ ह्या टॅगलाईनशी सुसंगत राहून वाहिनीने संध्याकाळी ६.३० ते रात्री ९. ३० या वेळेत ‘नंदिनी’, ‘सुंदरी’, ‘जाऊ नको दूर’बाबा!’, ‘आभाळाची माया’, ‘कन्यादान’ आणि ‘संत गजानन शेगावी’चे ह्या सहा नव्या मालिका सुरु केल्या आहेत. खास प्रेक्षकांसाठी ‘बघा रोज जिंका रोख’ ही स्पर्धा सुद्धा आयोजित केली आहे. दसरा ते दिवाळीच्या काळात ह्या स्पर्धेदरम्यान दररोज एक हजाराहुन अधिक प्रेक्षकांना रोख दोन कोटी रुपयांची बक्षीस मिळवण्याची संधी मिळणार आहे. प्रेक्षकांना स्पर्धेदरम्यान दररोज प्रत्येक मालिकेत एक प्रश्न विचारला जाईल. त्या प्रश्नाचे अचूक उत्तर कार्यक्रमादरम्यान दाखवल्या जाणाऱ्या फोन नंबरवर मिस कॉल देऊन नोंदवायचे आहे.

## 'स्पेशल ओप्स'चा प्रीक्वल १२ नोव्हेंबरला



कोरोना येण्यापूर्वी आलेल्या ‘स्पेशल ओप्स’ या नीरज पांडे यांच्या वेबसीरिजला चांगले यश मिळाले होते. त्याच सीरिजचा दुसरा भाग ‘स्पेशल ओप्स १.५ - दी हिम्मत स्टोरी’ येत्या १२ नोव्हेंबरला येतोय. पण हा या सीरिजचा पुढचा भाग नसून काही वर्षे आधीचा आहे. तो प्रिक्वेल आहे. ‘स्पेशल ओप्स’मध्ये दिसलेला एजंट हिम्मतसिंह नेमका हिंमतवान कसा बनला, त्याने कोणकोणत्या परिस्थितींचा सामना केला, हे या प्रिक्वेलमधून प्रेक्षकांना दिसणार आहे. आत्ता नुकताच या सीरिजचा ट्रेलर दाखल झाला आहे. त्यामुळेही उत्सुकता वाढली आहे. संसदेवरील हल्ल्यानंतर संरक्षणातील कमकुवतपणाबद्दल हिम्मतसिंहला कसे टार्गेट करण्यात आले, त्यातून तो कसा बाहेर पडला हे यातून स्पष्ट होणार आहे. ही भूमिका के. के. मेनन यानेच साकारली आहे. याशिवाय या प्रिक्वेलमध्ये त्याच्यासोबत आफताब शिवदासानी, गौतमी कपूर, विनय पाठक, परमीत सेठी, के. पी. मुखर्जी, ऐश्वर्य सुश्मिता, मारिया रयाबोशप्का, शिवज्योती राजपूत, विनय विक्रमसिंह आणि शंतनू घटक हेदेखील प्रमुख भूमिकेत आहेत.

# महाशब्दकोडे-२३६८



**आडवे शब्द -**

१. संख्यादर्शक चिन्ह, मांडी ३. बुद्धी ४. निकामी, खेळात आऊट झालेला ६. चाणक्याने राज्य मिळवून दिलेला राजा - xxxx मौर्य ९. कठीण ११. प्राथमिक अवस्था, लहानपण १२. महाकाय सर्प १४. आघाताची त्वचेवर उमटलेली खूण १५. पत्रास १६. मुंगूस १८. मोठा नगारा २०. वगळलेले २१. भस्म २३. हल्ली २५. धांदल २७. लसणाची पाकळी, कुडी, वैदुर्यमणी ३१. धाक ३३. पलटण ३४. तोकडा ३५. पोकळ प्रतिष्ठित ३८. बरगड्या ३९. सुंदर स्त्री ४१. विडंग, वायूविरंग, (जंत-कृमीवर घरगुती औषध) ४३. वायू ४४. घ्राणेंद्रिय ४६. पंजा व हात यांच्या मधला सांधा ४७. होऊन गेलेला काळ ५०. स्वामी ५२. जाड कागदाचा प्रकार ५३. वेणू ५५. कपी ५७. चंद्राची कोर, मुलींचे नाव ५८. फर्निचरसाठी मजबूत लाकडाचा प्रकार ६०. निरोगी स्पर्धा ६१. सवंगडी, पार्टनर ६३. अवैध प्रभाव, वट ६५. गार ६७. उपस्थित ६८. अडाणी ६९. बायको ७१. समाधी ७२. अनुराग ७४. उपकरण, यंत्र ७६. धारण करणारा ७७. बोध ७९. खोटेपणा ८१. लिंबाच्या जातीचे आंबट-गोड फळ ८२. तमाशाचा पूर्वरंग ८४. चंद्र ८५. भिंतीतले दूधदुभत्याचे कपाट ८६. शंकराचे वाद्य ८८. धागा ८९. आधला दिवस ९०. तुकडा ९२. व्यवस्थापक ९३. बैलाच्या मानेवरचा उंचवटा ९५. अत्यंत जुने ९७. लहान मुलींची कर्णभूषणे ९९. कोठेही गेले तरी याला पाने तीनच! १०१. जवळीक १०२. गज १०३. खंदक १०५. कण, बी १०६. रगेल १०८. सतत रडणे, तक्रारीचा सूर ११०. अपक्क आंबा १११. अननुभवी ११२. पादत्राणांचा दिखाऊ प्रकार ११३. तूप ११४. पूर्णपणे निर्धन

**उभे शब्द -**

१. महाभारतातील अंबिका व अंबालिकेची ज्येष्ठ बहीण २. हितकर, फायद्याचे ३. जाणे ४. नवारीने विणलेली खाट ५. शीण ७. पातळ पदार्थ ८. पुरणपोळीबरोबर दिला जाणारा एक पदार्थ ९. मोठ्या आकाराचे १०. वापरलेल्या वस्तूची किंमत घसरत जाणे १२. हळूवारपणे १३. विष्णूची पत्नी १७. घराणे १९. बेसन, कणीक, तूप, रबडी वगैरे वापरून केलेले पक्वान्न २२. कष्टांनी भरलेले आयुष्य २४. जलप्रवासाचे कामचलाऊ साधन २६. ताकदवान २८. उजळणी, अभ्यास २९. अनुरक्त ३०. अधोगती झालेला ३२. गर्दभ ३५. शेजारी ३६. पोवळे ३७. सुरुवात ४०. थांगपत्ता ४२. मुळ्याच्या शेंगांची भाजी ४५. तांब्या ४६. फोडणी दिलेले ताक ४८. जितक्यास तितके ४९. चर्चेतील विषयाची माहिती नसलेला, अजाण ५१. भरतकाम ५२. भाताचा विशेष प्रकार ५४. मैत्रीण ५६. रुदन ५८. पाषाण ५९. व्यक्तीला अंकित करण्याचा भोंदू उपाय ६०. स्वर्गलोक ६२. उत्तराखंडमधील शंकराचे तीर्थस्थान ६४. सुगरण मामी पूर्वी हा एकच गोड पदार्थ करायची ६६. आरतीचे ताट ६८. पिवळ्या फुलांचे झाड, बहावा ७०. धान्य साठवण्याचे मोठे पात्र ७१. गोड ७३. युग्म ७४. अतिशय मोठे ७५. सजगता, सावध असणे ७७. झोपताना डोक्याखाली असते ७८. नजरचूक ८०. बालपणीचे सुसंस्कार ८३. रहस्य ८४. शंभर ८७. मकरंद ८८. वचपा ८९. कलाकुसरीची कामे करणारा ९१. आरोळी ९४. घोड्याचे पिल्लू ९५. रोमांचित ९६. कालवा ९८. आश्वासन १००. ताकीद १०४. आवाज १०५. हे उघडल्याशिवाय घरात कसे येणार? १०७. नोकर १०९. चावी ११०. अनेक, पुष्कळ •

**महाशब्दकोडे क्रमांक २३६७ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. फक्त ४. बुगडी ७. वृकोदर ९. विष्णु शर्मा १०. अलेक्झांडर ११. तैलबुद्धी १२. समुदाय १४. खाजण १५. वाळूक १७. गुप्तता १९. खल २२. मौलिक २३. ठप्प २४. तरतरीत २७. मदन २९. समज ३१. वजीर ३४. कंकण ३५. कळक ३६. लष्कर ३८. साठा ३९. कसब ४०. रंग ४१. जिकीर ४२. खुमखुमी ४४. खोट ४५. रसद ४७. पाणीदार ४९. बालकांड ५१. बस्तान ५३. विणकाम ५५. तपस्या ५७. नस ५८. सारखा ६०. आगळेवेगळे ६३. नापास ६५. कहर ६६. तन ६८. कडवा ६९. दवा ७०. कुटील ७१. हरभरा ७३. पावनखिंड ७४. वधू ७६. पखवाज ७८. काकडआरती ८१. ताफा ८४. मालामाल ८६. सखा ८७. बेणे ८८. टसर ९०. सरोज ९२. लय ९४. झोपा ९५. विट ९६. वाकळ ९७. लाज ९८. मनोकामना १००. सहिष्णू १०२. नाट १०३. ईर १०५. बाही १०६. काज १०७. पारपत्र

**उभे शब्द** : १. विष्णुगुप्त २. फर्मास ३. शालेय ४. बुडखा ५. गरजवंत ६. आलय ७. वृद्धी ८. दयाळू १०. अदालत १३. मुख १५. वाकसळ १६. कमीज १७. गुरव १८. ताठर २०. श्रुत २१. धमक २२. मौन २५. रग २६. रीझ २८. दणकट ३०. मकरंद ३२. जीव की प्राण ३३. पुष्करणी ३४. कंठा ३५. कबरस्तान ३७. नेम ३८. सामील ४२. खुरपणी ४३. खुबा ४४. खोड ४६. सनसनाटी ४७. पामर ४८. दात ५०. कांबळे ५२. खडूस ५३. विटकर ५४. कासार ५६. भगवान ५९. खातरजमा ६०. आडदांड ६१. गवा ६२. वेदवती ६४. पालव ६७. नभ ७०. कुडता ७१. हवाला ७२. राका ७३. पारखा ७५. धूसर ७७. खमाज ७९. कढी ८०. आसपास ८२. फाटक ८३. वासलात ८५. ललकारी ८७. बेट ८९. सळई ९१. रोज ९३. यम ९५. विष्णू ९६. वाटप ९८. मही ९९. नाका १०१. हित १०२. नार १०४. रट्टा

# धुळे-नंदुरबार जिल्हा बँक निवडणूक सर्वाधिकार अमरिशभाईंना बहाल

■ धुळे

**बहुचर्चित** धुळे-नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची १७ जागांसाठीची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध होण्यासाठी धुळे जिल्ह्यातून प्रयत्न सुरु आहेत. यावेळी झालेल्या भाजप नेत्यांच्या बैठकीत या नेत्यांनी निवडणूक बिनविरोध करण्याचा विचार मांडला. पॅनेलबाबत सर्वाधिकार भाजप नेते आमदार अमरिशभाई पटेल यांना दिले असून, यंदा बँकेचे अध्यक्षपद नंदुरबार जिल्ह्याला मिळावे, अशी शिवसेनेचे माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी व नंदुरबारमधील काही नेत्यांची इच्छा आहे. ती किती फळास येते याकडे सर्वांचे लक्ष लागले असेल. जळगाव जिल्हा बँकेबरोबरच शेजारील धुळे-नंदूरबार जिल्हा बँकेचीही निवडणूक प्रक्रियेसह उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया



सुरु आहे. दरम्यान, सर्वपक्षीय पॅनेलसाठी नुकतीच महाविकास आघाडीसह भाजप नेत्यांची बैठक झाली. त्यात या नेत्यांनी निवडणूक बिनविरोध करण्याचा विचार मांडला. पॅनेलबाबत सर्वाधिकार भाजप नेते आमदार अमरिशभाई पटेल यांना दिले. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते देखील होते. त्यामुळे जळगावला भाजप राजकीयदृष्ट्या शत्रू तर शेजारच्या धुळे जिल्ह्यात मित्र कसा? अशी चर्चा सुरु आहे. येथे शिवसेना नेते, माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी ठाम भूमिका मांडत भाजपबरोबर जाणार नाही, असे सांगितले. त्यामुळे त्यांचे मन वळविण्यासाठी पुन्हा दोन्ही काँग्रेसचेच नेते प्रयत्नशील आहे. यंदा बँकेचे अध्यक्षपद नंदुरबार जिल्ह्याला मिळावे, अशी शिवसेनेचे माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी व नंदुरबारमधील काही नेत्यांची इच्छा आहे.

# पुण्यामध्ये महाविद्यालय खुली मात्र विद्यार्थ्यांचा अल्प प्रतिसाद

■ पुणे

**पुणे** शहरातील सर्वच महाविद्यालय बुधवारी सकाळी विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली. मात्र कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखातील विद्यार्थ्यांनी पहिल्याच दिवशी महाविद्यालयांकडे पाठ फिरवत अल्प प्रतिसाद दिला. बहुतेक महाविद्यालयांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने शिकवण्या चालूच ठेवलेल्या आहेत. तर काही महाविद्यालयांनी एक दिवस अगोदर विद्यार्थ्यांची ऑनलाइन मीटिंग घेत महाविद्यालय खुले करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. एच व्ही देसाई महाविद्यालयाच्या कला शाखेच्या उपप्राचार्य डॉ.नीता बोकील म्हणाल्या की, दोन डोसची पूर्तता, बाहेर गावच्या विद्यार्थ्यांचे जास्त प्रमाण आणि तोंडावर आलेल्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची अनुपस्थिती जास्त आहे. मात्र ऑनलाईन पद्धतीने सर्व विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांची आवश्यकता म्हणून लवकरच आम्ही महाविद्यालयात लसीकरण मोहीम राबवणार आहोत. पुणे शहरात बहुतांश विद्यार्थी बाहेर गावावरून येतात. बहुतेक विद्यार्थ्यांचे दोन डोस पूर्ण झाली नाहीत. तसेच काहींच्या राहण्याची व्यवस्था नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थितीकडे पाठ फिरवली.

# केजरीवाल सरकारकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई! प्रति हेक्टर ५० हजार

■ नवी दिल्ली

**अवकाळी** पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालांनी बुधवारी त्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली. नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात लवकरच जमा होईल,असे देखील त्यांनी सांगितले. त्यांच्या या घोषणेमुळे आता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांवर आर्थिक संकट काही प्रमाणात कमी होणार आहे.

पत्रकार परिषद घेत केजरीवाल म्हणाले की,

अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकरी दुः खी आहेत, दुः खी होऊ नका,



नेहमीप्रमाणे माझे सरकार तुमच्या पाठीशी आहे. मी आदेश जारी केले आहेत की ज्या शेतकऱ्यांची पिके गमावली आहेत त्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपये नुकसान भरपाई दिली जाईल, डीएम आणि एसडीएम हे नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामा करत आहे.

दोन आठवड्यात हे काम पूर्ण होईल. त्यानंतर थेट नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात लवकरच जमा होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान, दिल्ली सरकारचा हा आकडा महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या आकड्यापेक्षा तिपटीने जास्त आहे. महाराष्ट्रातील जिरायती शेतजमीनीसाठी हेक्टरी १० हजार तर, बागायतीसाठी हेक्टरी १५ हजारांची मदत महाराष्ट्र सरकारने जाहीर केली.

# टीव्ही पाहणेही महागणार डिसेंबरपासून चॅनल्सचे दर ५० टक्के वाढणार

■ मुंबई

**पेट्रोल,** डिझेलसह भाज्यांचे भाव कडाडलेत. या सातत्याने होणाऱ्या महागाईने सर्वसामान्य जनता मेटाकुटीला आली आहे. लॉकडाऊनमुळे अनेकांची आर्थिक परिस्थिती खचली आहे. असे असताना आता चॅनेल्स पाहण्यासाठी ५० टक्के अधिक खर्च करावा लागणार आहे. 'टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाच्या'च्या नवीन दर आदेशाच्या अंमलबजावणीमुळे किंमती वाढवण्यात येणार आहेत. ही दरवाढ १ डिसेंबरपासून लागू केली जाणार आहे. सातत्याने वाढणारी महागाई सर्वसामान्यांच्या डोक्याचा



ताप वाढवणारी आहे. अशातच आता चॅनल्सचे दर वाढल्यामुळे मनोरंजनाचे कार्यक्रम पाहणेही महागणार आहे. देशातील प्रमुख ब्रॉडकास्टिंग नेटवर्क्स झी, स्टार, सोनी आणि वियाकोम १८ ने काही चॅनल्स आपल्या बुकेतून बाहेर काढले आहेत. त्यामुळे टीव्ही पाहणाऱ्या ग्राहकांना ५० टक्क्यांपर्यंत अधिक खर्च करावा लागू शकतो. टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाच्या नवीन दर आदेशाच्या अंमलबजावणीमुळे या किंमती वाढवण्यात येणार आहेत. दरम्यान, यापूर्वी टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाने मार्च २०१७ मध्ये टीव्ही चॅनल्सच्या किंमतींबाबत नवीन टॅरिफ ऑर्डर जारी केल्या होत्या. त्यानंतर १ जानेवारी २०२० रोजी एनटीओ २.० जारी करण्यात आले. त्यामुळे त्यांच्या चॅनेलच्या किंमती बदलत आहेत. टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाचे म्हणणे होते की, एनटीओ २.० ग्राहकांना फक्त तेच चॅनेल निवडण्याचा आणि पेमेंट करण्याचे स्वातंत्र्य असेल. जे त्यांना पाहायचे आहेत. ब्रॉडकास्टिंग नेटवर्कच्या बुकेत ऑफर केलेल्या चॅनेलचे मासिक दर १५ -२५ रुपयांच्या दरम्यान ठेवले होते. परंतु, ट्रायच्या नव्या दरांनुसार, किमान १२ रुपये निश्चित करण्यात आले आहे.

# घरे रिकामी करण्याच्या हमीसाठी एअर इंडिया कर्मचाऱ्यांना मुदतवाढ

■ मुंबई

**खासगीकरणाच्या** ६ आठवड्यांच्या आत म्हणजे बुधवारी २० ऑक्टोबरपर्यंत घरे रिकामी करण्यासंदर्भात हमीपत्र देण्यासाठी एअर इंडियाच्या वसाहतीमधील कर्मचाऱ्यांना दिलेली मुदत कर्मचारी संघटना आणि व्यवस्थापन यांच्यात झालेल्या चर्चे नंतर वाढवण्यात आली. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

एअर इंडियाच्या वसाहतीमधील घरे रिकामी करण्यासंदर्भात हमीपत्र देण्यासाठी दिलेल्या मुदतीसंदर्भात कर्मचाऱ्यांच्या ३ संघटनांनी व्यवस्थापनासोबत चर्चा केली. या निर्णयाच्या विरोधात त्यांच्या कृती समितीने २ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा दिला आहे. अशाप्रकारे तातडीने घरे खाली करण्यास त्यांचा विरोध आहे. सोमवारी त्यांनी संपाची नोटीस कामगार उपायुक्तांना दिली आहे. त्यानंतर २७ ऑक्टोंबरला त्यांची बैठक होणार आहे.

एअर इंडियाने ५ सप्टेंबरला नोटीस पाठवून एअर इंडिया वसाहतींमध्ये राहणाऱ्या ७ हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना ६ महिन्यांच्या आत घरे रिकामी करण्याची नोटीस दिली होती. त्यासंबंधीचे हमीपत्र त्यांना २० ऑक्टोंबरपर्यंत प्रशासनाकडे देण्यास सांगितले होते. मात्र याला कर्मचारी संघटनांचा विरोध होता. याच्या विरोधात त्यांनी २ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा दिला आहे. त्यामुळे एअर इंडिया प्रशासन आणि कर्मचारी संघटना यांच्यात बैठक झाली. त्यात त्यांना हमीपत्र देण्यासाठी आणखी मुदतवाढ दिली आहे.


## kotak कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : २७, बी.के.सी., सी-२७, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई ४०००५१.
प्रादेशिक कार्यालय : ६वा मजला,फेज २, बी.के.सी., सी-२७, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई ४०००५१.

### सरफाएसी कायद्याच्या १३/२ कलमांतर्गत जाहीर नोटीस

नोटीस देण्यात येते की, खालील नमूद केलेले कर्जदार, हमीदार व तारणदार यांनी आमच्या बँककडून कर्ज सुविधा घेऊन मुद्दल व व्याजाची परतफेड करण्यात कसूर केली आहे. आणि त्यांची कर्जखाती नॉन परफॉर्मिंग असेट म्हणजे अनुत्पादक कर्ज खाते म्हणून वर्गिकृत करण्यात आलेली आहेत. सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस् ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफाएसी कायदा)च्या कलम १३ (२) अंतर्गत त्यांना त्यांच्या अलिकडील ज्ञात पत्त्यावर व आमच्याकडे उपलब्ध पत्त्यावर मागणी नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या. पण सदर नोटीसा न बजावताच परत आल्यामुळे त्यांना या जाहिरात नोटीसीने कळविण्यात येत आहे.

| कर्जखाते/कर्जदार यांचे नाव व पत्ता | हमीदार नाव व पत्ता | तारण मिळकतीचे वर्णन | मागणी नोटीस दिनांक | एनपीए दिनांक | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १)मे.अर्जुन रामभाऊ दावकर यांचे मालक श्री.अर्जुन रामभाऊ दावकर(कर्जदार) बँक नोंदणीनुसार ऑफीसचा पत्ता गाळा नं -व्ही-११६२, व्ही-ब्लॉक, व्हेजीटेबल मार्केट, प्लॉट नं. १७ बी आणि १७ सी, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई. ४००७०५. | १)श्री.निलेश दावकर २) श्रीमती. मंगला दावकर बँक नोंदणीनुसार दोघांचा ऑफीसचा पत्ता गाळा नं -व्ही-११६२, व्ही-ब्लॉक, व्हेजीटेबल मार्केट, प्लॉट नं. १७ बी आणि १७ सी, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई. ४००७०५. | श्री.अर्जुन रामभाऊ दावकर यांच्या मालकीची दुकान व गोडावून क्र. ११६२ व्ही ब्लॉक क्षेत्रफळ २८.१२५ चौरस मीटर. ३०० चौरस फुट आणि १५० चौरस फुट पहिला मजला ऑफीस कामासाठी प्लॉट क्र. १७ बी , १७ सी, आणि १८ सेक्टर -१९, तुर्भे गांव, तालुका व जिल्हा ठाणे एकूण ६०५१.२३ चौरस मीटर सर्व फिक्चर्स, फिटींग्ज, इमारती व मजिनीवर बसवलेल्या रचनेसह सर्व वर्तमानकालीन, भविष्यकालीन सर्व इजमेंट्री/मॅमूल राईट्स यांसह सर्व काही. | १६ ऑगस्ट २०२१ | १५ एप्रिल २०२१ | रु. २९,३१,०२३.८१(अक्षरी रुपये एकोनतीस लाख एकतीस हजार तेवीस रुपये आणि एक्यांशी पैसे.) |

उपरोक्त कर्जदार व त्यांचे हमीदार व तारणदार (संदर्भानुरूप) यांना सदर नोटीसीने बजाविण्यात येते, की त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६० (साठ) दिवसांच्या आत वर उल्लेखित थकीत रक्कम बँकेत जमा करावी आणि तसे न केल्यास ६० दिवस पूर्ण झाल्यावर बँक सरफाएसी कायदा कलम १३ (४) नुसार व आवश्यक त्या इतर तरतुदीनुसार पुढील कायदेशीर कारवाई करेल.

दिनांक : २१/१०/२०२१
ठिकाण : नवी मुंबई.

अधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लि.



## kotak कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : २७, बी.के.सी., सी-२७, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई ४०००५१.
प्रादेशिक कार्यालय : ६वा मजला,फेज २, बी.के.सी., सी-२७, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई ४०००५१.

### सरफाएसी कायद्याच्या १३/२ कलमांतर्गत जाहीर नोटीस

नोटीस देण्यात येते की, खालील नमूद केलेले कर्जदार, हमीदार व तारणदार यांनी आमच्या बँककडून कर्ज सुविधा घेऊन मुद्दल व व्याजाची परतफेड करण्यात कसूर केली आहे. आणि त्यांची कर्जखाती नॉन परफॉर्मिंग असेट म्हणजे अनुत्पादक कर्ज खाते म्हणून वर्गिकृत करण्यात आलेली आहेत. सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस् ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफाएसी कायदा)च्या कलम १३ (२) अंतर्गत त्यांना त्यांच्या अलिकडील ज्ञात पत्त्यावर व आमच्याकडे उपलब्ध पत्त्यावर मागणी नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या. पण सदर नोटीसा न बजावताच परत आल्यामुळे त्यांना या जाहिरात नोटीसीने कळविण्यात येत आहे.

| कर्जखाते/कर्जदार यांचे नाव व पत्ता | (तारणदार) नाव व पत्ता | तारण मिळकतीचे वर्णन | मागणी नोटीस दिनांक | एनपीए दिनांक | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १)मे.शिवांस सी फूड्स यांचे मालक श्री. सोमनाथ पठारे (कर्जदार) २)श्री.पोपट पठारे (सहकर्जदार) बँक नोंदणीनुसार पत्ता दोघांचा राहण्याचा पत्ता बी. १०१, आशापूरा रीजन्सी, सेक्टर ६, प्लॉट नं. २५, कामोटे, नवी मुंबई-४१०२०९. | १)श्री.पोपट पठारे (सहकर्जदार) बँक नोंदणीनुसार पत्ता दोघांचा राहण्याचा पत्ता बी. १०१, आशापूरा रीजन्सी, सेक्टर ६, प्लॉट नं. २५, कामोटे, नवी मुंबई-४१०२०९. | श्री.पोपट पठारे यांच्या मालकीची सदनिका क्र. १०१,आशापूरा रीजन्सी, सेक्टर ६, प्लॉट नं. २५, कामोटे, नवी मुंबइ, क्षेत्रफळ ५०७.४८ चौरस फुट कारपेट आणि फ्लोअर बेड क्षेत्रफळ ७१.८२३ चौरस फुट +२६० चौरस फुट टेरेस. सर्व फिक्चर्स, फिटींग्ज, इमारती व मजिनीवर बसवलेल्या रचनेसह सर्व वर्तमानकालीन, भविष्यकालीन सर्व इजमेंट्री/मॅमूल राईट्स यांसह सर्व काही. | १६ ऑगस्ट २०२१ | २९ जुन २०२१ | रु. ४७,८१,५२१.४८(अक्षरी रुपये सत्तेचाळीस लाख एक्यांशी हजार पाचशे एकवीस रुपये आणि अठ्ठेचाळीस पैसे) |

उपरोक्त कर्जदार व त्यांचे हमीदार व तारणदार (संदर्भानुरूप) यांना सदर नोटीसीने बजाविण्यात येते, की त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६० (साठ) दिवसांच्या आत वर उल्लेखित थकीत रक्कम बँकेत जमा करावी आणि तसे न केल्यास ६० दिवस पूर्ण झाल्यावर बँक सरफाएसी कायदा कलम १३ (४) नुसार व आवश्यक त्या इतर तरतुदीनुसार पुढील कायदेशीर कारवाई करेल.


दिनांक : २१/१०/२०२१
ठिकाण : नवी मुंबई.

अधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लि.

# नवा काळ

मुंबई ■ गुरुवार २१ ऑक्टोबर, २०२१ ■ पान- ८


## उल्हासनगर डम्पिंग ओव्हरफ्लो असह्य दुर्गंधीने नागरिक हैराण



**उल्हासनगर** - कॅम्प नंबर-५ येथील खडी खदान डम्पिंग ग्राऊंड ओव्हरफ्लो झाले आहे. तेथे कचरा गाड्यांना कचरा टाकण्यास जागा नाही. याशिवाय पायथ्याशी चिखल झाला असल्यामुळे गाड्यांना तेथे पोहोचण्यास व कचरा टाकण्यास जास्त वेळ लागतो. परिणामी शहरातील कचरा वेळेवर उचलला जात नाही. त्यामुळे शहर आणि डंपिंग ग्राऊंड परिसरात असह्य दुर्गंधीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. दिवाळी तोंडावर आली असताना ही परिस्थिती निर्माण झाल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. उल्हासनगरच्या खडी खदान डम्पिंग ग्राऊंड परिसरात चिखल झाला आहे. यामुळे डम्पिंग ग्राउंडवर कचरा टाकण्यासाठी जाणाऱ्या गाड्यांना उशीर होत आहे. याशिवाय हे डम्पिंग ग्राउंड ओव्हरफ्लो झाले आहे. या सर्वाचा परिणाम म्हणजे शहरातील कचरा कुंड्यांमधील कचरा वेळेवर उचलला जात नाही. त्यामुळे या कचराकुंड्या ओव्हरफ्लो झाल्या आहेत. त्यामुळे शहरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. त्याचा त्रास नागरिकांना होत आहे. दिवाळी तोंडावर आली असताना शहरात निर्माण झालेले हे चित्र दुर्दैवी आहे. तेव्हा पालिकेने याकडे लक्ष देऊन शहर स्वच्छ ठेवण्यावर भर द्यावा, अशी मागणी नागरिक आणि लोकप्रतिनिधी करत आहेत.

## आता वेळ चिनी स्मार्टफोनची! वनप्लस, व्हिवो, ओप्पो, शाओमीला मोदी सरकारची नोटीस

■ नवी दिल्ली

**भारतीय** स्मार्टफोन बाजारपेठेत आज चिनी ब्रॅण्ड्सचा प्रचंड दबदबा आहे. कमी किंमत आणि चांगले फिचर्स यामुळे हे फोन धडाधड विकले जातात. मात्र हे फोन भारतीयांसाठी खरोखर सुरक्षित आहेत की नाही, याची खात्री करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीने आता केंद्र सरकारने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. मोदी सरकारने वनप्लस, व्हिवो, ओप्पो, शाओमी या चिनी स्मार्टफोन कंपन्यांना नोटीस पाठविली असून स्मार्टफोनमध्ये वापरला जाणारा डेटा, सुटे भाग आणि यंत्रणा आदीची माहिती मागवली आहे. यामुळे चिनी कंपन्यांमध्ये पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. यापूर्वी चिनच्या सैन्याने लडाखमध्ये



भारतीय जवानांवर हल्ला केल्यानंतर भारत सरकारने मागील वर्षी २०० हून अधिक चिनी ॲपवर बंदी घातली होती. हे ॲप भारतीयांची माहिती आणि गोपनियता चोरत असल्याचे आढळले होते. 'द मॉर्निंग कॉन्टेक्स्ट'ने दिलेल्या वृत्तानुसार, आता चिनी स्मार्टफोन कंपन्यांनी पहिल्या नोटीसमध्ये मागवलेली माहिती दिल्यानंतर भारत सरकार या कंपन्यांना त्यांचे स्मार्टफोन तपासणीसाठी पाठविण्याची मागणी करणारी नोटीस देण्याच्याही तयारीत आहे. त्यामुळे दुसरी नोटीस ही या चिनी कंपन्यांवर मोठी कारवाई असेल. दरम्यान, चिनी ॲपवरील बंदीनंतर चिनी स्मार्टफोन कंपन्यांनी 'आम्ही कसे भारतीय आहोत', हे प्रामुख्याने दाखविण्यास सुरुवात केली. तसेच देशातील त्यांचे उत्पादन आणि गुंतवणूक वाढवण्यावर अधिक भर दिला.

## शोपियानमध्ये दोन दहशतवाद्यांचा खात्मा

■ श्रीनगर

**जम्मू** -काश्मीरमधील शोपियानमधील द्रगड परिसरात भारतीय जवान आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले आहेत. जवानांचे संयुक्त पथक संशयित जागेच्या दिशेनं निघाले असता, लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलावर गोळीबार केला, त्यानंतर चकमक सुरु झाली. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यानं या वृत्ताला दुजोरा दिला आहे की, दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. आणखी दोन ते तीन दहशतवादी लपून बसल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. लष्कराच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक मशिदींमधून मुनादी द्वारे लोकांना सतर्क करण्यात आले. सुरक्षा दल दहशतवाद्यांविरोधातील अंतिम हल्ल्याची तयारी करत आहेत.

## ऊस दरावरून मिरजेत शिवशक्ती कारखान्याची ऊसतोड बंद पाडली

**सांगली** - मिरज तालुक्यातील वड्डी येथे ऊस आंदोलनाची पहिली ठिणगी पडली. ऊसाला प्रति टन ४ हजार रुपये दर मिळावा आणि एफआरपी जाहीर करावा, या मागण्यांसाठी रघुनाथदादा पाटील प्रणित शेतकरी संघटनेने मंगळवारी शिवशक्ती कारखान्याची ऊस तोडणी बंद पाडली. आम्ही मागणी केलेला दर मिळाल्याशिवाय ऊस तोडणी सुरू होऊ देणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतल्यामुळे हे आंदोलन चिघळण्याची शक्यता आहे. यंदा उसाचा गाळप हंगाम सुरू झाला तरीही त्याची एफआरपी अद्याप जाहीर झालेली नाही. त्यामुळे ती जाहीर करावी आणि उसाला ४ हजार



रुपयांचा दर द्यावा, अशी मागणी रघुनाथ दादा पाटील यांच्या शेतकरी संघटनेने केली आहे. त्यासाठी त्यांनी काल वड्डी येथे फडात जाऊन शिवशक्ती कारखान्यांची ऊस तोड थांबवली. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी फडातील मजुरांना पळवून लावले. मिरज तालुक्यातील वड्डी येथे घडलेल्या या घटनेमुळे तिथे काहीकाळ तणाव पसरला होता. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आम्ही ऊस तोडणी सुरू होऊ देणार नाही, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे. त्यामुळे कारखान्यासमोर पेच निर्माण झाला आहे.

## नागपुरात बांधकाम सुरू असलेला पूल कोसळला

■ नागपूर

**भारतनगर** चौकात बांधकाम सुरू असलेल्या उड्डाणपुलाचा एक भाग मंगळवारी रात्री ९.३० च्या सुमारास कोसळला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, या घटनेला जबाबदार असलेल्यांवर कारवाई केली जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

कळमना मार्केटकडे जाणाऱ्या मार्गावर भारतनगर चौकात पारडी-कळमना या उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू आहे. या उड्डाणपुलाच्या पीलरवरील स्पॅन बेरिंग करण्यासाठी हायड्रॉलिक जॅकने उचलण्यात येत होते. मंगळवारी रात्री ९.३० च्या सुमारास हे काम सुरू असताना जॅकवरून पॅन घसरले. त्यामुळे उड्डाणपुलाचा एक भाग कोसळला. विशेष म्हणजे तेथून

### जीवितहानी नाही

काही सेकंदांपूर्वीच एक मोटार गेली होती. ही घटना घडली तेव्हा तेथे कोणतेही वाहन नव्हते. त्यामुळे सुदैवाने त्यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. परंतु यामुळे नागरिकांमध्ये रोष पसरला आहे. नैवेद्यम हिस्टोरीयाच्या पाठीमागील भागात बांधल्या जात असलेल्या या उड्डाणपुलाच्या पी-७ आणि पी-८ स्पॅनला उचलण्याचे काम सुरू असताना ही दुर्घटना घडली. याची माहिती मिळताच एनएचएआयचे क्षेत्रीय अधिकारी राजीव अग्रवाल, प्रकल्प संचालक एन. एल. येवतकर, आमदार कृष्णा खोपडे



आदींनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. अगोदरच धीम्या गतीने बांधकाम सुरू असलेल्या या उड्डाणपुलाचा भाग कोसळल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. गेल्यावर्षी कामठी रोडवर डबल-डेकर पुलाचे स्पॅन तुटले होते.

## मुंबईतील सायनमधून २२ कोटींचे ड्रग्ज जप्त! महिला तस्कर गजाआड

■ मुंबई

**ड्रग्स** प्रकरणी एनसीबीकडून बॉलिवूड व सेलिब्रिटींवर कारवाईचा धडाका सुरू असताना मुंबई पोलिसांनीही धडक कारवाई सुरू केली आहे. सायन परिसरातून एका महिला ड्रग्ज तस्करला तब्बल २२ कोटी रुपये किंमतीच्या हेरॉइनसह गजाआड करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून एनसीबीने मुंबईत अनेक ठिकाणी अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या तस्करांवर कारवाई केली आहे. यानंतर आता मुंबई पोलिसांच्या अँटी नार्कोटिक्स पथकाने सायन परिसरात मोठी कारवाई केली आहे.या प्रकरणात मुंबईसह राजस्थानमध्ये अमली पदार्थाचे मोठे रॅकेट असल्याचे उघड झाले असून यामध्ये एका महिला ड्रग्ज पेडलरला गजाआड करण्यात आले आहे. राजस्थान, प्रतापगड परिसरातून देशभरात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ पाठवले जातात. मुंबईत देखील तब्बल ७ किलो हेरॉइन येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मंगळवारी रात्री मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी घाटकोपर पथकाने सायन परिसरात छापा टाकला.यावेळी सायन परिसरातून ड्रग्ज पेडलर महिलेकडून ७ किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले. ज्याची किंमत जवळपास २२ कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या नेतृत्वाखाली घाटकोपर पथकाने ही कारवाई केली आहे. दरम्यान २ ऑक्टोबरच्या रात्री एनसीबीने मुंबईहून गोव्याला जाणाऱ्या क्रूझवरील ड्रग्ज पार्टीवर छापा टाकला. यामध्ये अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानसह अनेक जणांना अटक करण्यात आली.

## अमित शहा २३ ऑक्टोबरपासून काश्मीरच्या ३ दिवसीय दौऱ्यावर

**नवी दिल्ली** - ३७० कलम रद्द केल्यानंतर पहिल्यांदाच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे २३ ते २५ ऑक्टोबर या कालावधीत जम्मू आणि काश्मीरच्या तीन दिवसीय दौऱ्यावर जाणार असून ते जम्मू काश्मीरच्या प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, पोलीस अधिकारी आणि सेंट्रल पॅरामिलिट्री फोर्सेसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. या



दौऱ्यात शहांकडून विविध विकास प्रकल्पांची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे दहशतवादी हल्ले सुरु असल्याने जम्मू आणि काश्मीरमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. सध्या जम्मू काश्मीरमध्ये परप्रांतीय नागरिकांवरील दहशतवादी हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. गेल्या १८ दिवसांमध्ये दहशतवादी संघटनांकडून ११ नागरिकांची हत्या करण्यात आली आहे. त्यामुळे अमित शहा यांनी केंद्रीय तपास संस्था, राज्यांचे पोलीस महासंचालक आणि गृहमंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची सोमवारी बैठक घेतली. त्यानंतर गृहमंत्र्यांनी दुसऱ्याच दिवशी जम्मू आणि काश्मीरमधील सुरक्षेविषयी पंतप्रधानांना माहिती दिली. सध्याच्या हिंसाचारावर कडक कारवाई करण्याची शहा यांनी सुरक्षा संस्थांना सूचना दिली आहे. जम्मू काश्मीरमध्ये परप्रांतीय नागरिकांवर दहशतवादी हल्ले वाढल्याने स्थलांतरित मजुरांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## तमाशा कलाकाराचा मुलगा एमपीएससी उत्तीर्ण

■ भंडारा

**महाराष्ट्र** लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी वर्षानुवर्षे दिवसरात्र अभ्यास करतात. अशीच जीवापाड मेहनत करून भंडारा जिल्ह्यातील तमाशा कलाकाराचा मुलगा निलेश रमेश बांते (वय २६) हा एमपीएससीची पूर्व आणि मुख्य परीक्षा उत्तम गुणांनी पास झाला. आता नोव्हेंबर महिन्यात मुलाखतीत बाजी मारण्यासाठी तो सज्ज झाला होता, मात्र काळाच्या मनात काही वेगळेच होते. दसऱ्याच्या दिवशी त्याचा मोठा अपघात झाला. त्यात त्याच्या दोन्ही हातांना, खांद्यांना आणि तोंडाला गंभीर इजा झाली असून सध्या तो रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहे. त्याच्यावर तब्बल सहा ते सात शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. त्यामुळे आता तो बरा झाल्यानंतरही



मुलाखतीला मुकणार, याबाबत चिंता निर्माण झाली आहे. शिवाय घरची परिस्थिती बेताची असल्याने त्याच्या शस्त्रक्रियांसाठी एवढे पैसे कुठून आणणार, असा प्रश्न त्याच्या कुटुंबीयांसमोर उभा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निलज बु. येथील रहिवासी निलेशचे वडील हे शेतकरी आहेत. यासह ते गावागावात होणाऱ्या मंढई आणि जत्रांमध्ये तमाशातून कला सादर करतात. तर निलेशला लहानपणापासूनच अभ्यासाची प्रचंड आवड आहे. त्याचे इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण गावातच झाले. यावेळी प्रत्येकवर्षी तो वर्गातून अव्वल आला. त्याची ही प्रगती पाहून वडिलांनी त्याला पुढील शिक्षणासाठी तुमसर शहरातील जनता विद्यालयात पाठवले. तिथे दहावीपर्यंतचे शिक्षण घेऊन निलेश शहापूर येथील नानाजी जोशी महाविद्यालयातून बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाला. तो दहावी आणि बारावी दोन्ही

### मात्र मुलाखतीपूर्वी मृत्यूशी झुंज

वेळी गुणवत्ता यादीत झळकला. त्यामुळे वडिलांनी त्याला पुढे अभियांत्रिकी शाखेचे शिक्षण घेण्याचा सल्ला दिला. त्यानुसार निलेशने अमरावती येथील स्थापत्य अभियांत्रिकी शाखेच्या बी-टेक अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. २०१८ साली त्याने उत्तम गुण मिळवत अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्याला महाविद्यालयातील कॅम्पसमधून एका खासगी कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. मात्र निलेशला गावाचे नाव मोठे करण्याची तीव्र इच्छा होती.

## संताजी घोरपडे कारखाना एफआरपी व कामगारांना वेजबोर्ड

■ कोल्हापूर

**सरसेनापती** संताजी घोरपडे साखर कारखाना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एकरकमी एफआरपी २,९६० रुपये देणार असून कारखान्याच्या कामगारांनाही १ जानेवारीपासून वेजबोर्ड लागू करील, अशा २ महत्त्वाच्या घोषणा कारखान्याचे संस्थापक आणि राज्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी येथे केली. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यांच्यासाठी ही एकप्रकारे दिवाळी भेटच आहे.आजरा तालुक्यातील संताजी घोरपडे साखर कारखान्याच्या सातव्या गळीत हंगामाच्या शुभारंभाचा कार्यक्रम काल आयोजित करण्यात आला होता. बिद्री कारखान्याचे ज्येष्ठ संचालक गणपतराव फराकटे यांच्या


### ■ मुश्रीफांची घोषणा

अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला मुश्रीफ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी बोलताना त्यांनी या घोषणा केल्या. एकरकमी एफआरपी शेतकऱ्यांना दिली म्हणजे आम्ही त्यांच्यावर मेहरबानी केली नाही.

## भावना गवळी यांना चिकनगुनियाची लागण

**मुंबई** - शिवसेनेच्या खासदार भावना गवळी यांना चिकनगुनियाची लागण झाली आहे. त्यामुळे त्यांनी चौकशीसाठी हजर राहण्यासाठी ईडीकडे १५ दिवसांची मुदत मागितली असून आज त्या ईडीच्या कार्यालयात हजर राहणार नाहीत. भावना गवळी यांचे वकील इंद्रपाल सिंग यांनी याबाबत माहिती दिली आहे. भावना गवळी यांच्याकडून ईडीला प्रकृतीच्या अस्वास्थाबाबतचं पत्रं देण्यात येणार असून मेडिकल सर्टिफिकेटही देण्यात येणार आहे. ट्रस्टमधील गैरव्यवहारप्रकरणी भावना गवळी यांना ईडीकडून दुसऱ्यांदा समन्स बजावण्यात आलं होतं. याआधी ४ ऑक्टोबर रोजी त्यांना समन्स बजावण्यात आले होते.

### ईडीच्या समोर हजर राहणार नाही



पण, अन्य प्रशासकीय कामकाज असल्याचे सांगत त्या उपस्थित राहिल्या नव्हत्या. आजही त्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ईडी चौकशीला गैरहजर राहणार नाहीत. तसं पत्रही भावना गवळी यांच्याकडून ईडीला देण्यात आलं आहे. खासदार भावना गवळी यांच्या ट्रस्टमध्ये घोटाळा झाल्याचा 'ईडी'ला संशय आहे. याअंतर्गत 'ईडी'ने सप्टेंबर महिन्यात गवळी यांच्याशी संबंधित ठिकाणांवर छापे टाकले होते. त्यानंतर या प्रकरणात सईद खान या व्यक्तीला अटक करण्यात आली होती. गवळी यांच्या ट्रस्टमध्ये सईद खान हे संचालक आहेत. या ट्रस्टला बेकायदेशीररित्या कंपनीमध्ये रुपांतरित करण्यासाठी सईद खान यांनी मध्यस्थी केली.

## बौद्ध स्थळ कुशीनगर विमानतळामुळे संपूर्ण जगाशी जोडले गेले - नरेंद्र मोदी



■ कुशीनगर

**कुशीनगर** हे प्राचीन शहर भगवान गौतम बुद्धांचे शेवटचे विश्रांतीस्थान होते. याच ठिकाणीला बुद्धाचे महापरिनिर्वाण झाले होते. आता हे बौद्ध स्थळ कुशीनगर विमानतळामुळे संपूर्ण जगाशी आज जोडले गेले असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले. आज बुधवारी नरेंद्र मोदींनी उत्तर प्रदेशाच्या कुशीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकार्पण केले. त्यावेळी ते व्यासपीठावर बोलत होते. या विमानतळाच्या उद्घाटन समारंभाला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, श्रीलंकेचे कॅबिनेट मंत्री नमल राजपक्षे यांच्या नेतृत्वाखाली १३० सदस्यीय शिष्टमंडळ उपस्थित होते. या विमानतळावर बौद्ध भिक्षूंसह कोलंबोहून पहिले विमान उतरले होते. या उद्घाटनप्रसंगी मोदी म्हणाले की. भगवान बुद्धांच्या ज्ञानप्राप्तीपासून ते त्यांच्या महापरिनिर्वाणाची साक्षीदार असलेले हे स्थळ आता संपूर्ण जगाशी जोडले गेले आहे. श्रीलंकन एअरलाईन्सचे विमान कुशीनगरमध्ये लँडिंग होणे म्हणजे याभूमीला वंदन करण्यासारखच आहे, कुशीनगर विमानतळ हे जगभरातील बौद्धांसाठी आहे, याचा मला आंनद आहे. हे विमानतळ उत्तर प्रदेशमधील तिसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. कुशीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळ हे केवळ हवाई जोडणी म्हणून राहणार नाही, तर ते व्यवसाय आणि स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करेल. कुशीनगरचा विकास उत्तर प्रदेश सरकार तसेच केंद्र सरकारसाठी प्राधान्य आहे.

## आघाडी द्या अन् गाव जेवण घ्या! चंद्रकांत पाटलांची देगलूर कार्यकर्त्यांना ऑफर

■ नांदेड

**देगलूर** विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीवर राज्यातील राजकीय वातावरण तापायला सुरुवात झाली असतानाच देगलूर-बिलोली विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी आयोजित कार्यकर्त्यांच्या बैठकीत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी एक अनोखी ऑफर दिली आहे. भाजपला आघाडी देणाऱ्या गावांना माझ्यातर्फे गाव जेवण देणार असल्याचे चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे या गाव जेवणात आपण स्वतःही सहभागी होणार असल्याचे पाटील यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे आता चंद्रकांत पाटील यांच्या गाव जेवणाच्या ऑफरची चांगलीच चर्चा रंगली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चंद्रकांत दादा नेहमीच एखादी ऑफर देत असतात. हे जगजाहीर आहे. त्यांनी सांगली महापालिकेत महाविकास आघाडीच्या नेत्यांना मोठा शॉक द्या, तुम्हाला सोन्याचा मुकुट घालेन, अशी ऑफर दिली होती. त्यानंतर त्यांनी आता पुन्हा एकदा कार्यकर्त्यांना ऑफर दिली आहे. देगलूर-बिलोली विधानसभेच्या पोटनिवडणुकीत भाजपला आघाडी द्या, मी तुम्हाला गाव जेवण देईन, अशी खुली ऑफरच चंद्रकांत पाटील यांनी देगलूरच्या कार्यकर्त्यांना दिली आहे.

## अकोल्यात धुमाकूळ घालणारा बिबट्या अखेर जेरबंद

■ अकोले

**तालुक्यातील** वारंघुशी गावात मागील काही दिवसांपासून बिबट्याने प्रचंड धुमाकूळ घातला होता. सतत गुरांवर हल्ला करून त्यांच्यावर ताव मारत होता. बिबट्याच्या वावरामुळे नागरिकही अतिशय दहशतीत राहत होते. त्यामुळे या बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करण्याची मागणी जोर धरू लागली होती. अखेर शनिवारी मध्यरात्री त्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. आता या बिबट्यास संगमनेर येथील निंबाळेमधील वनविभागाच्या रोपवाटिकेत हलवण्यात आले आहे. वारंघुशी गावातील सामाजिक कार्यकर्त्यांकडून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी सातत्याने वनविभागाकडे पाठपुरावा करण्यात येत होता. त्यानंतर अखेर तीन दिवसांपूर्वी वारंघुशी गावाबाहेर हल्लेखोर बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आला. यावेळी पिंजऱ्यात त्याला आमिष म्हणून एक कुत्रे ठेवण्यात आले होते. शेवटी शनिवारी मध्यरात्री बिबट्या या पिंजऱ्यात अडकला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. त्यानंतर जेरबंद झालेल्या बिबट्याला पाहण्यासाठी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.